साळअखेर १ ७ १८८
किरकोळ अंकास ............ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०१०६
दुसरे खेपेस ........ ०१

Single copy.............................. 4 as

Advertisement
Below 10 lines... 2 Rs.
per line over 10... 4 as.
Repetition Per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX — AKOLA MONDAY 1 APRIL 1895 — NO. 12

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख १ माहे एप्रील सन १८९५ इ० — अंक १२

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत ना. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धाशीशि, मस्तकशूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा-गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहा-वांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरें झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केंबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक मालाबरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असुन आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शुद्ध मराठी व इंग्रजींत ( उच्चारासह ) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०१०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलारी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

नमुना ( जी )

नादारी मुकदमा नंबर ६ सन १८९५
विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हे अकोला.

सर्व धनकोयांस नोटीस देण्यांत येते कीं मोतया वल्लद आवया बेडर हा नादारी आहे असा आज तारीख १६ माहे ३ सन १८९५ इसवी रोजी ठराव झाला आहे. आणि तारीख ६ माहे ४ सन १८९५ हा दिवस नादाराचें सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्से करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदाराचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदाविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. ता० २३।३।९५ इ०

P. Govindraj.
Judge
B. Court
Akola District.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यास

विनंती विशेष आपले मराठी औषधी पासून व वैद्य पासून किती फायदा आहे हें खालील उदाहरणांवरून ध्यानीं येईल पाळधी तालुका जामनेर जिल्हा खानदेश येथें श्रीमंत रा. रा. नारायण दामोदर नाईक हे आजारी होऊन त्यांची प्रकृती इतकी बिघडली कीं अखेर दानधर्म होऊन त्यांस भुईवर घातलें व ते वेळेस त्यांचे वाड्यासमोर शेंदोनशे लोक जमले होते. एवढी स्थिती झाली ! पण त्यांचे उपचारा करितां पुणेंकर रा. रा. सखाराम दामोदर दातेखेडकर वैद्य यांस आणिलें होतें त्यांनीं फार युक्तीनें महत्वाच्या औषधीचा उपयोग करून त्यास हल्लीं आराम दिला आहे हें पाहून फार आनंद होत आहे. व आपले मराठी वैद्यकात अशा औषधी व असे शोधक वैद्य अजून आहेत असे ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. अशा वैद्य लोकांस राजाश्रय नाहीं मात्र भरंवसा डाक्तर लोकांवर फार होता परंतु वरील मजकूर झालेला मी प्रत्यक्ष पाहिल्या वरून मराठी औषधीची तारीफ माझ्याच्यानें करवल्या वाचून राहवेना ह्मणोन हा मजकूर पुढें मांडला आहे. ता. २६।३।९५

वामन विष्णु ओक

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ८१७

मुंबई इलाख्यांत गोकुळदास तेजपाल हें नांव फार प्रसिद्ध आहे. हे एक उदार व धर्म-

सन १८९५ सालच्या जमाखर्चांचा खर्डा हिंदुस्थानच्या कायदे कौंसिला पुढें मांडण्यांत आला आहे. या अंदाजपत्रकावर कौंसिलदाराचा वादविवाद होईल तव्हां त्यांतील भिन्नभिन्न भागांचा योग्य विचार करण्यांत येईल. हिंदुस्थानचे फडनीस सर वेस्टलांड कबूल करितात कीं जरी जमाखर्चाच्या तोंड मिळवणींत साडे अठेचाळीस साडेचार लक्ष रुपये शिलकींत राहतात तथापि या हिंदुस्थानाची केव्हां अनवस्था होईल याचा नियम नाहीं. कोणतीही लहानशी खर्चाची बाब निघाली कीं हा शिलकेचा भ्रम दूर होईल. आह्मास या जमाखर्चाच्या खर्डांचें स्वरूप निराळेंच दिसतें. लढायांचे प्रसंग फार कांहंच नाहींत कांहीं राजपतृष्णा उत्तरोत्तर अमर्याद होत चालली आहे. नुकतीच आयात मालावर जकात बसविली आहे. आणि तिनेंही खर्चाचें तोंड मिळून येईना ह्मणून गेल्या डिसेंबरांत विलायतच्या कापडावर व सुतावर जकात बसविण्यांत आली. लोकांच्या उत्पन्नावर कर बसविण्याची सीमा होऊन गेली आहे. नवीन कर बसविल्यास ते सोसण्याची लोकांच्या पाशीं माया नाहीं. मीठा सारख्या पदार्थावर भारी कर पूर्वीच बसलेले आहेत. तेव्हां अशा स्थितीला हिंदुस्थानच्या वार्षिक खर्चांत फक्त नांवाचीच साडेचार लक्षाची जमा अधिक भासे हेच गोष्ट भावी संकटे दर्शवित. यंदाच्या जमा खर्चांत एक खर्चाची बाब मात्र समाधानकारक आहे आणि ती बाब ह्मणजे नेटीव फौजेतील शिपायास पगार यापुढें दरमहा नऊ रुपये मिळत जाईल. महागाईच्या दृष्टीनें ही गोष्ट कित्येक वर्षांपूर्वीच व्हावयास पाहिजे होती.

## The Berar Samachar

MONDAY APRIL, 1, 1895

A very important bill is before the Legislative Council in connection with the prevalent laws of usury in India. The Hon'ble Mohiny Mohun Roy has introduced the 'Award of Interest Bill' with a view to lend a helping hand to the sinking debtors who borrow money in their urgent need and are forced to continue the debt to accumulate to an enormous amount. Ever since the beginning of civilization. there has been a struggle between money-lenders and their debtors. Shakespeare's Shylock is a type of the money-lenders and men have been found with the genius of Shylock to trade upon the weaknesses of their fellow-men. On the other hand, a moderate profit in the form of interest for the sums others have lent to us in our sore need be allowed as a matter of right. What is wanted in India is an effective check upon the heavy interests that the Civil Courts will allow as a rightful claim of the creditors. The Hindu Law sets a limit to the total profit allowable upon a loan. The well known rule goes by the name of Dam Dupat and it is attempted to make the rule applicable to all irrespective of their creeds and to remove some defects in the rule itself. We are not sanguine about the result of this legislation but we welcome it as a tentative method. The following quotation from Sir Griffith Evan's speech will point out the condition of the people which makes the present bill an imperative necessity:—

"The people of this country—particularly the uneducated classes—do not very often realise the frightful rapidity with which compound interest accumulates. Although they have, as a matter of fact agreed to the contract with their eyes open, they have not really grasped the extremely fearful result which would take place after two or three years had passed. It goes further there because there is a grave question concerned not only that the rates of interest are so high, but that the peasantry are being divorced from the land. If they are allowed to till their ancestral holdings at all, it is as serfs of the moneylenders. In the old days the usurer could only take the crop and not the land. Under our laws both are taken.

"It matters little to these men, if they lose their land, whether we or somebody else governs them. For their lands the peasantry have always been ready to fight and die. We are ousting the warrior peasant by our laws and courts to put in the usurer. We shall want our army some day to keep him in. It is one of the grave political dangers of the future. It can only be averted by timely action."

The financial statement for 1895-96 shows a most unstable equilibrium. The year shows a surplus of Rs 4,62,000. No sound financier will warrant the solvency of the Indian exchequer. The last year presented an acute crisis which drove Govt. to renew the import duties and to convert the public loans of four and half percent interest. When almost every resource is utilized to the utmost extent and when the country puts forth no further possibilities of a new margin in taxation it is no hopeful prospect to depend upon a budgetted balance-sheet which leaves a nominal surplus or rather no surplus at all. The current of events and affairs of the administration as foreseen and provided for in the financial statement will admit of no change and it will be a serious problem to meet the contingencies which untoward circumstances and accidents of a daily routine will entail. We quote below a para from the succinct and clear summary which the Hon'ble Mr. Westland presents of his financial statement. It gives a bird's eye—view of the present state of the Indian finances in round figures of Rupees with the last four digits omitted:—

"Increase of expenditure dependent on exchange, 2,501, cessation of temporary relief obtained last year by Provincial contributions and by reducing Civil and Military Works, 685, increased opium payments arising from necessity of enhancing the price paid to cultivators, 460. These added to last year's deficit give an amount of 3,951 to be made up. The Government get by diminution of payments due to conversion operation, 525, by better Customs Revenue, including Cotton Duties, 1,883, better Railway Revenue, 786, better Land Revenue, due partly to postponements from last year, 403, better Opium Revenue,, 467, better Stamps and Excise Revenue, 192: numerous other differences, net, 69. These improvements produce a surplus of 376. A general increase is announced in the scale of sepoys' pay, to take effect on July 1st. For a hundred and ten thousand men this will cost 260 a year, and the charge adds 180 to new year's estmates. The charge is accepted as long foreseen and now urgent. A sum of 150 is provided for military preparations due to disturbances in Chitral. These charges of 180 and 150 reduce the surplus of 376 to 46, which is the declared surplus in the Budget."

Hence the question arises whether India is solvent or bankrupt. The facts speak for themselves and leave to our plain mind no doubt as to the sinking and helpless state of the Imperial finance. But we have met with a masterly stroke of ultra optimism when the Secretary of State Mr. Fowler emphatically denounces the talk of bankruptcy in connection with India as 'absurd and untrue'. We do not know whether we shall count upon him as a friend or foe. We shall simply say we pity ourselves because Mr. Fowler has got into his head such a rosy picture of the solvency of India. Fortunately however Sir Auckland Colvin explodes the delusive optimism of the Secretary of State. His letter to the London Times brings home conviction with the invincible array of arguments and stern facts. His way of refuting his opponent's argument is very interesting and instructive and we make no apology to give below the closing portion of his letter from the columns of 'India':—

"If Indian assets at present do not fail greatly short of Indian liabilities, it is certain that she is living beyond her income. But does she pay her debts? What of her gold liabilities? Has not the Secretary of State borrowed largely in 1893 and 1894 in England to meet his gold engagements? Does anyone suppose these loans will prove temporary only—mere accomodation loans? Can the gold liabilities of the coming year be met by the Secretary of State's drawings, or will further loans or kindred expedients be needed? As to the credit of India, it is high for borrowing purposes, because the ultimate responsibility for the administration of India rests on Great Britain. It may be that the investing public attach undue importance to the connection; but the credit of India will remain high so long as their estimate of the value of such connection continues whatever may be the state of its finances. "Pessimists" hold that in the crisis through which India is passing it is necessary to reduce expenditure to a *minimum* and to nurse every possible item of receipt. Railways, if not, as Sir Juland Danvers puts it in his letter published in your issue of February 2nd, the sheet anchor of Indian finance, furnish, next to land revenue, the most elastic item among Indian receipts. At a time when taxation is being constantly added to; the railway account in the Budget, in consequence of constant construction of new lines some of which are upproductive, adds nearly two million to the deficit, No one doubts the stimulus given to trade and industry by railway construction. No one on the other hand, can fail to see that when such construction is accompained by recurring taxation ( by import duties, for example ), and when current revenue is diverted from administrative needs to meet or to lessen deficit, trade and industry are liable to be hampered. The same financial difficulties which have unhappily compelled the Indian Government to place an import duty on English piece goods seem to disqualify it at present from continuing to be England's customer for large consignments of railway plant. Not only is capital annually borrowed for extension of railway construction works, but ( deficit recurring annually ) interest on such capital must be also borrowed. All this time expenditure exceeds income. There is no visible chance of any relief from the pressure of exchange; and the fiscal reserves of the Government are approaching a point when they will no longer be able to furnish much increased supply."

## वऱ्हाड

रा. रा. भवानीदास संतो हे या महिन्या पासून पेनशन घेणार आहेत अशा समयीं त्यांचे चिरंजीव राजश्री दत्तात्रयपंत यांस नायब तहशिलदारी देणार असल्या विषयीं ऐकून आनंद वाटला.

वऱ्हाडांतील जुन्या आधकाऱ्यांच्या मुलांस त्यांच्या योग्यते प्रमाणें लहान मोठ्या चाकऱ्या देण्याचा नियम उत्तम आहे आणि त्या प्रमाणें रा. रा. गोपाळ वामन बापट व कृष्णराव पुरुषोत्तम भट यांस एकस्ट्रा आसि. क. च्या जागा दिल्यास न्यायखात्याचा फायदा होऊन सर्वजणास आनंद होईल.

रा. रा. कृष्णाजी अनंत तहशीलदार यांची आकोटास नेमणूक होती पण तसें न करितां त्यास दर्यापुरास पाठविलें आणि तेथील आफिटग तहशिलदार रा. रा. विनायक अप्पाजी यांस आकोटास बदललें.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए. यांनीं गेल्या सोमवारीं येथील स्मालकाज कोर्टाचा चार्ज घेतला.

आणि रा. रा. गोविंदराज अय्या हे आज उद्या वाशिमास सिव्हिल जजाचें कामीं रुजू होतील.

मि. अहमदला, हिंदुस्थानी शिक्षक ट्रेनिंग कालेज यांस या महिन्या पासून पेनशन मिळालें आणि यांस कामठी येथें १०० रुपयांवर खानगी शाळेंत शिक्षक नेमण्यांत आलें आहे.

मि पुसी पोस्टल सुपरिंटेंडंट यांची रजपुतान्यांत बदली झाली.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं, रानशेंडु ( Lantana scandens ) नांवाचें झाड मोठें विषारी आहे करितां कोणीही आपले बागिच्यांत अगर कंमर्टांचे हद्दीत कोणतेही जागीं लावू नयेत. लाविल्यास कायदेशीर तजवीज करण्यांत येईल. कळावें ता० २६-३-९५

D. G Patwardhan
Secratary

नोटीस.

रा. रा. गणु वल्लद कृष्णाजी गवळी पाटील राहणार पातुर नंदापूर ता. आकोला यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तू माझा लग्नाचा नवरा असून मी वयांत येण्यास ६ वर्षें झालीं तेव्हां पासून मी माझे आईचे घरीं कष्ट करून उदर पोषण करिते. तूही मजला घेऊन जात नाहीं. माझा जन्म व्यर्थ जात आहे. नवऱ्यापासून बायकास जें सर्व प्रकारचें सुख तें तुजपासून आजवरपर्यंत होत नसल्यामुळें मी तुमचे येथें राहण्याय खुष नाहीं. एक दोन वेळ चपार लोकांनीं तुह्मास फारकत देण्याचें सांगितलें तेही ऐकत नाहीं. याकरितां मुद्दास नोटीसीनें कळविलें कीं ही नोटीस पावले दिवसापासून आठ दिवसांत पाच वर्षांचे अन्नवस्त्राबद्दल रुपये २५० आणून देऊन पावती द्यावी व पुढें दर साल्ची व्यवस्था ठेवावी. तुह्मी मजला घेऊन जाऊन बरोबर संसार योग्यपणें कराल अशाबद्दल खात्री करून द्यावी. या प्रमाणे न केल्यास रितीप्रमाणें तजवीज केली जाईल. पुरवी ही नोटीस दिली परंतु त्या प्रमाणें व्यवस्था तुह्मी केली नाहीं. आता या नोटीशीप्रमाणें अमलदारी खरोखर होणार. कळावें. तारीख ३०-३-१८९९.

तानाई मर्द गणु गवळी रा० देचळी नि० बांमडी.

## वर्तमानसार.

शोल अंस गृहस्थ होऊन गेले. कर्णाप्रमाणे हे दानशूर होते आणि त्यांच्या धर्मादायांनी त्या प्रांतीं अनेक संस्था अव्याहत चालल्या आहेत. पित्याप्रमाणें त्यांचे पुत्र रा. रा. गोवर्धनदासही मुंबईस लौकिकवान आहेत. त्यांच्या धर्मादाय फंडानें हल्लीं मुंबईस तीन संस्था चालल्या आहेत. एक हायस्कूल, दुसरी संस्कृत पाठशाळा, तिसरी, विद्यार्थ्यांचें अन्नछत्र. गेल्या दहा दिवसापूर्वीं त्यांच्या शाळागृहांत बक्षीससमारंभ झाला त्या समयीं मुंबईचे गव्हरनर लार्ड सांडहर्स्ट हे अध्यक्ष होते. अदमासें पंधरा लक्षांची रकम विद्यादानाप्रीत्यर्थ आरंभीं निराळी ठेविली आहे आणि त्या फंडाला मागाहून प्रसंगोपात निराळी भर पडत असते हें विशेष आहे. चांगल्या होतकरू गरीब विद्यार्थ्यांच्या खाण्यापिण्याची व राहण्याची सोय या धर्मफंडातून होत असते या संस्थेंत राहून विद्याभ्यासानें उदयास आलेले गृहस्थ पुष्कळ आहेत.

ही गोष्ट सांगण्यांत आमचा हेतु दोन प्रकारचा आहे. उदार चरित्रें ऐकून श्रीमंत लोकांच्या मनास बोध व्हावा व त्यांच्या मनांत अनुकरणाची इच्छा प्रेरित व्हावी. वरील उभय पितापुत्रांची कीर्ति श्रवण करितांच प्रत्येकांस आपापल्या वाडिलांचा नांवलौकिक द्विगुणित करण्याचा छंद लागावा आणि लार्ड सांडहर्स्ट यांनीं एक उत्कृष्ठ विचार कळविला तोही सर्वांनीं ध्यानांत धरावा. धर्मादायाचे प्रकार बहुत असतात परंतु ज्या धर्मदायाचा विनियोग व्यापाराच्या तत्वानें होत नाहीं तो पैसा धर्मादाय या संज्ञेस पात्र नाहीं. व्यापाराचें तत्व ह्मणजे असें कीं जो पैसा आपण खर्चितो त्याचा योग्य मोबदला आपणास मिळतो किंवा नाहीं हें क्षणोक्षणीं आपण तपासून पाहिलें पाहिजे. ज्या व्ययापासून असा फायदा दिसत नाहीं तो खर्च फुकट व निरर्थक होय. व्यापाराचे तत्वानें दान सत्पात्रीं व सन्मार्गीं वेंचलें जातें. नाहीं तर, पुष्कळ दानधर्म अन्यथा केल्या पासून पैशाचा दुरुपयोग होतो आणि आळस किंवा व्यसन यांस उत्तेजन मिळतें. उदाहरणार्थ सांप्रत भिक्षेकऱ्याचा एक धंदाच मानला आहे व त्या मुळें भीक बरी पण कामधंदा नको असें ह्मणणारे कित्येक हरीचे लाल पैदा झाले आहेत. गोरक्षणचा पाया तरी व्यापाराच्या तत्वावर न बसविल्या मुळें पुष्कळ अंशीं चुकला आहे. लार्ड सांडहर्स्ट यांच्या अभिप्राया प्रमाणें अन्योन्य मदत व परोपकार हे प्रत्येक सज्जनाचे मार्ग आहेत पण त्याचें अवलंबन यथाकाल व यथायोग्य व्हावें अशीं साठा बनियेशाही प्रत्येकास शिकली पाहिजे.

---

औद्योगिक शिक्षणाची, आपल्या देशाला अत्यंत गरज आहे पण त्या शिक्षणा विषयीं सर्वत्र अनास्था व निष्काळजीपणा दृष्टीस पडतो. पूर्वीं यांत्रिक कला नव्हती आणि जे हस्त कौशल्याचे धंदे उपलब्ध होते ते पिढ्यानुपिढी ज्ञातिविशिष्ट लोकामध्यें चालत आले होते. परंपरागत ते धंदे चालल्यामुळें फारशा सुधारणा झाल्या नाहींत व त्यांचा प्रसारही संकोचितच व बातावेताचा होता. पूर्वीं च्या गरजा थोड्या होत्या आणि त्या मानानें या देशांतील उद्योगधंदा त्या गरजा भागविण्या सारखा होता परंतु मध्यंतरीं या देशांत राज्यक्रांत्या झाल्या आणि इंग्रजी राज्य स्थापनेमुळें द्विपान्तराहून चीजवस्तु येऊं लागल्या आणि यांत्रिक कला युरोपांत वाढल्यामुळें आमच्या गरजा युरोपियन राष्ट्रें भागवूं लागलीं व त्याच्या परिणामीं देशी उद्योग धंदे सब ठार बुडाले. या देशांतील लोकांचे जीवनमार्ग अधिक चैनीचे होऊं लागले, गरजा नानाविध होऊन कोल्याावधि वाढल्या आणि आमचे लोक स्वकीय धंदे बुडवून इंग्लिश राष्ट्राच्या कलाकौशल्यास व उद्योगधंद्यास उत्तेजन देऊं लागले. तशांत यांत्रिक कलेचा प्रचंड हत्ती इंग्लिशांच्या हातीं आला तेव्हां पासून तें राष्ट्र सांपत्तिक वैभव शिखरास चढलें आहे इंडियाचें खरें चित्र कित्येक मार्मिक चित्रकार असें काढितात कीं, हा देश ह्मणजे एक उघड्या पुरुष आहे आणि तो आपल्या उघडपणानें युरोपियन राष्ट्राच्या उद्योगधंद्याचा पोशिंदा बनला आहे.

औद्योगिक स्पर्धा हल्लीं जगभर चालू आहे. आणि त्या चरचढी मध्यें आपल्या देशाचा निभाव लागणें में [illegible]. आपल्या देशाचें उद्योगस्वातंत्र्य कायम राहावें अशी उत्कट इच्छा असेल तर ही वेळ मोठी आणिबाणीची आली असून आतां जर औद्योगिक शिक्षणा संबंधानें चळवळ होऊन उद्योगशाळा सर्वत्र निघाल्या नाहींत तर हा देश सांप्रतच्या उद्योगक्रांतीमध्यें नामशेष होईल! देशांत गरीबी व भिकारपणा फार वाढला आहे अशा समयीं प्रजासमूहास उद्योगशिक्षण मिळेल अशी व्यवस्था सरकारनें केलीच पाहिजे. या जबाबदारीला जर अंतर दिला तर राज्याच्या स्थैर्याला व चिरायुपणाला देखील धक्का पोंचेल.

परमेश्वराच्या कृपेनें सर्व जगास पुरेल इतकें साधनवैपुल्य या देशांत आहे. खनिज, उद्भिज आदि करून सर्व पदार्थ या देशांत पुष्कळ आहेत. हे पदार्थ परद्वीपीं जाऊन नंतर रूपान्तरानें या देशीं येतात तें बंद झालें पाहिजे. उद्योग इतके या देशीं चालतील कीं सर्व लोक एकत्र झाले तरी निपूर वांटेल. हाताला व नेत्रांला कलाकौशल्याचें वळण लागून मानसिक कल्पनाशक्तीनें सर्व लोक यांत्रिक कलाभिज्ञ व उद्योगनिमग्न असे बनले पाहिजे आणि हाच हेतु Technical School उद्योगशाळेचा असतो. सर दिनशा माणिकजी पेटिट यांच्या उदार कृपेनें मुंबईस एक वरील प्रकारची संस्था गेल्या सात वर्षापासून चालू आहे. त्या संस्थेच्या वार्षिक समारंभाच्या वेळीं गव्हरनर लार्ड सांडहर्स्ट साहेब गेले होते तेव्हां ते या संस्थेस उद्देशून बोलले कीं. ही संस्था ह्मणजे भावी कलावृद्धि व उद्योग वृद्धि यांचे मूळ पाया आहे. उद्योगशाळेचें महत्व इतकें असून ही विरळा दृष्टीस पडते हें या देशाचें दुर्भाग्य व सरकारची कर्तव्यशून्यता होय. व्हिक्टोरिया टेक्निकल इनस्टयूट सारखी संस्था सर्व देशांत एकटी दुकटी आढळेल. तीस कोट प्रजाजनांचा अशानें निभाव कसा लागणार! या संस्थेचे मुख्य अध्यक्ष मि. काटन ह्मणाले कीं, युरोपांतल्या इतर राष्ट्राचें उद्योगवैचित्र्य व उद्योगसमृद्धि पाहून इंग्लंडचें राष्ट्र उद्योगशिक्षणा विषयीं जागृत झालें तेव्हां पासून सालिना या शिक्षणाकडे कोट्यवधि पौंड खर्च सरकारांतून होऊं लागला आहे आणि त्या शिवाय खानगी सुखवस्तु लोकांच्या देणग्या मिळतात त्या निराळ्याच आहेत. इंडियांतला प्रकार अगदीं सापत्नपणाचा दिसतो. अदमासें ६३००० रुपये यांचें सर दिनशा पेटिट यांनीं उत्पन्न करून दिलें आहे त्यांचवावर ही मुंबईची उद्योग संस्था चालते. सरकारची मदत शब्दद्वाराच आहे. ही शोचनीय गोष्ट आमच्या उदार राज्यकर्त्यांस शोभत नाहीं. आणि त्या शिवाय इंडियन प्रजाजन उद्योगरहित आहेत, त्यांच्या उदरनिर्वाहार्थीची सोय सरकारानेच केली पाहिजे व [illegible] उद्योगशि[illegible] ठेविली तर राज्या[illegible] [illegible] उपनीका [illegible] रिया टेक्निकल [illegible] १३०२ विद्यार्थी शिकले आणि तें [illegible] मधून व यंत्रालयामधून चांगल्या रोजगारावर आहेत. या संस्थेला नवी उद्योगमाळा [illegible] डण्याचा विचार असून त्यासाठीं सर दिनशा पेटिट यांनीं चाळीस हजार रुपयाची देणगी दिली आहे.

अलिकडे शिक्षणाचा ओघ असा वाहतो कीं, ज्यास अनुकूलता असेल त्यानें वकील, डाक्टर किंवा शिक्षक होण्याचा हव्यास धरावा. इंजिनिअर फार थोडे होतात आणि उद्योगशाळांच्या अभावामुळें वरील शिक्षणमार्गा शिवाय अन्य मार्गच खुला नाहीं असें झालें आहे. प्राथमिक शिक्षणाचा जसा प्रसार अत्यावश्यक आहे तसा त्याच्या बरोबरीनें किंबहुना अधिक प्रमाणानें औद्योगिक शिक्षणाची जरूरी आहे. आणि ही गरज भागल्या शिवाय आमच्या देशाला सुदीन प्राप्त व्हावयाचा नाहीं.

---

गेल्या पाडव्याच्या मुहूर्तावर पुण्याच्या फर्ग्युसन कालेजच्या नव्या इमारतीचा प्रवेश समारंभ झाला. कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपति महाराज यांच्या अध्यक्षते खालीं हा समारंभ झाला. मुंबईचे गव्हरनर लार्ड सांडहर्स्ट यांच्या हातून कालेजची इमारत उपयोगांत आणण्यांत आली. फर्ग्युसन कालेज व न्यू इंग्लिश स्कूल या दोन संस्था डेक्कन एजुकेशन सोसायटीच्या आहेत. ही सोसायटी आपल्या नांवाप्रमाणें दक्षिण महाराष्ट्रांत शिक्षणवर्धक मंडळी आहे. या मंडळीचा मूळ उगम कैलासवासी विष्णुशास्त्री चिपळूणकर व त्यांच्या हाताखालील गृहस्थ यांच्यापासून निघाला. न्यू इंग्लिश स्कूलाची उत्तरोत्तर भरभराट होऊं लागली आणि वरिष्ठ प्रतीचा पाठशाळांतील शिक्षणक्रम वरील मंडळीनें हातीं घेतला तेव्हां कायमची एक मंडळी स्थापित केली आणि तिचें अग्रेसरत्व त्या प्रांतांतल्या विद्वान व प्रमुख गृहस्थांच्या हातीं दिलें. या मंडळीची कार्यमाला उत्तरोत्तर विस्तृत होत आहे आणि तिचे बहुतेक चालक स्वल्प वेतनावर संतुष्ट राहून आपल्या देशाच्या कल्याणार्थ कायावाचामनें आपापले देह झिजवीत आहेत ही गोष्ट ध्यानांत ठेवण्या सारखी व कित्ता घेण्या सारखी आहे. या मंडळीनें विद्यामृत फार स्वस्त, उत्कृष्ट, व सुखसेव्य करून सोडलें आहे आणि तिच्या विद्यामृतानें राष्ट्रभक्ति, राजनिष्ट, व उत्क्रमणेच्छा यांची प्रेरणा बहुत शिष्यवृंदामध्यें नैसर्गिक झाली आहे या मंडळींतील शिक्षकसमूहाचा स्वार्थत्याग व कर्तव्यतत्परता हीं उत्साहजनक व देशाभिमान प्रवर्तक आहेत.

फर्ग्युसन कालेजच्या नव्या इमारतीस अदमासें दोड लाख रुपयावर खर्च लागला. गोंडळच्या श्रीमंत ठाकूर साहेब सारखे उदार नेटिव संस्थानिक, सुखवस्तु विद्याभिलाषी गृहस्थ इत्यादिकांच्या देणग्यांनीं हा कालेजचा फंड जमला होता. फर्ग्युसन कालेजास सर्व वर्गी जोडण्याची कायमची परवानगी मिळाली असून पुष्कळ विद्यार्थी या पाठशाळेंतून यशस्वी होऊन बाहेर पडले आहेत. वऱ्हाडांतील पुष्कळ गृहस्थांचा संबंध या कालेजाशीं पडण्याचा संभव आहे ह्मणून आह्मीं त्याच्या इतिहासांतील हा सोन्याचा दिवस सर्वांस विदित केला. चांगल्या गोष्टी लोकांपुढें आल्या ह्मणजे त्यांची थोरवी कळून घेण्याची बुद्धि होते आणि तिच्या योगानें सत्कृत्याचें अनुकरणही सहजगत्या होऊं लागतें.

---

गेल्या वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचें अध्यक्षस्थान रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांस मंडळीनें दिलें होतें. दोन दिवस त्यांनीं आपल्या वक्तृत्वानें, व गायनकलेनें जमलेल्या मित्र मंडळीस आनंद दिला व त्या योगें ते लोकांस अधिक सन्मान्य वाटले. समारंभ बरखास्त करिते वेळीं त्यांनीं दोन दिवसांत घडलेल्या गोष्टींचा उपसंहाररूपानें उल्लेख केला व व्यक्तिमात्राचे कार्यमानानें आभार मानले. इतिवृतान्त फार गोड झाला पण अखेरिस त्यांनीं मंडळीच्या दोषस्फोटनास आरंभ करून सर्वांचीं मनें कलुषित केलीं. अध्यक्ष या नात्यानें त्यांचे बोल ग्राह्य होते व त्यांत घेण्या सारख्या गोष्टी नव्हत्या असें नाहीं. परंतु उत्तरार्ध अगदीं व्यक्तिनिर्देशरूप होता आणि त्यामुळें त्यांच्या बोलण्यांतला बोधाचा भाग अगदीं लोपला. राजश्री व्यंकटराव यांस कांहीं गोष्टींत अध्यक्षांची मानखंडना वाटली पण खरा प्रकार काडीमात्र तसा नव्हता. चुकया घडल्या ह्मणजे त्यांचें पृथक् पृथक् स्पष्टीकरण करण्यांत फायदा नसतो तर डिमास्थनीस या ग्रीक पुरुषाच्या ह्मणण्या प्रमाणें मागील चुका दुरुस्त करणें ह्मणजे पुढें त्यांची पुनरावृत्ति न होऊं द्यावी एवढेंच. राजश्री व्यंकटराव यांना हा पहिलाच प्रसंग असल्या मुळें त्यांचा चांगला विचार असा विकोपाच्या दृष्टीनें बाहेर पडला तथापि ते वरील थोर पुरुषाची उक्ती लक्ष्यांत घेतील आणि मोठ्या विनययुक्त व आदरपूर्वक दोषदिग्दर्शनानें दुसऱ्यास व स्वतांस शहाणे करून चांगले लोकप्रिय होतील असें आह्मी इच्छितों. आणि ही ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं कोणत्याही प्रकारचा समाज ह्मटला ह्मणजे त्या मधील निरनिराळ्या घटकावयवांनीं निदान तेवढ्या काला पुरता तरी अन्योन्य एकत्व अथवा अन्योन्य वर्गक्रम हीं विसरून परिणत स्नेहसारा मध्यें लज्जाभयादि विकारांचा व्ययगम होईल तरच अशा समाजांचा इष्ट हेतू सिद्धीस जाईल व प्रसंग विशेषीं अतिक्रमण झालें असतां त्याबद्दल खेद वाटण्याचें कारण राहणार नाहीं.

---

**४६ लक्षांचा हिरा—** निजाम साहेबांनीं हा बहुमोल हिरा विकत घेतला, व त्या संबंधींच ज्याच्यापाशीं तो होता त्या पासून तो घेण्यासाठीं फौजदारींत फिर्याद होऊन निजाम व हिऱ्याचा मालक कित्येक लक्ष रुपयांस बुडाले ही गोष्ट आह्मी मागें प्रसिद्ध केली आहे. तो हिरा बंगाल ब्यांकेपाशीं आहे. तिच्या जवळून तो हैदराबादेस आणण्या साठीं निजाम साहेबांनीं मि. ह्युगफ या पोलिस आफिसरास कडेकोट पहारा देऊन पाठविलें आहे.

**तोंडांतून ज्वाला काढणारे—** अमेरिकेंतील दोन मनुष्यें फ्रेंच राजधानी जें पारिस शहर येथें आले आहेत. ते तोंडांतून आणि बोटांच्या अग्रापासून मोठमोठ्या ज्वाला सोडतात. पण त्यांचें तोंड व बोटें भाजत नाहींत. पारिस मधील शास्त्रज्ञाचें मत ह्यांच्या ह्या कृतीकडे लागलें आहे. त्यांचें ह्मणणें ज्वाला उत्पन्न करणारे पण निरुपद्रवी असें कांहीं रसायन त्यांच्यापाशीं आहे किंवा विद्येच्या योगानें त्यांना असें करितां येतें. अशीं माणसें इकडे आलीं असतां आमच्या लक्षावधि भोळ्या भाविक बायका व पुरुष त्यांच्या नादीं लागून त्यास देव बनवतील.

**हवा आणि उजेड अडविल्या बद्दल नुकसानी—** मुंबईस सुलतान नवाज जंग ह्यांचें घर आहे. त्यांच्या शेजारींच दुसऱ्या एकाचें घर आहे. हें दुसरें घर आजपर्यंत ल्हान होतें, पण आतां तें उंच करण्यासाठीं नवीन तो बांधूं लागला. हें पाहून घर उंच केल्यानें माझ्या उजेडास आणि हवेस हरकत होईल सबब घर उंची बांधूं नको अशा दोन वेळ ताकिदी दिल्या असून तो शेजारी ऐकेना. ह्मणून त्यास प्रतिबंध करण्यासाठीं त्यावर दावा करून मनाई घेतली होती. परवां जस्टिस क्यांडी ह्यांनीं ह्या दाव्याचा निकाल केला. तेव्हां प्रतिवादीनें वादीचा उजेड आणि हवा अडवून वादीचें नुकसान केलें असें ठरवून प्रतिवाद्यानें वादीस नुकसानी बद्दल ४५०० इतके रुपये द्यावे आणि इमारत वाढवूं नये असा निकाल दिला. शु० सू०

भरतपूरचे महाराज अत्यंत मद्यपानासक्त होऊन आपल्या राज्याचें कामकाज करण्यास असमर्थ झाल्यामुळें, ते आपलें राज्य चालविण्यास योग्य होत तों पर्यंत त्यांस आपल्या राज्याधिकार वरून दूर करून सर्व राज्याधिकाराची व्यवस्था तेथील रेसिडेंट यांच्या हातीं ठेविली आहे.

**समाजास घातक ठराव—** कोणा स्त्रियेची बेअदबी केल्यास त्या बद्दलची फिर्याद तिनें स्वतः कोर्टांत येऊन केली पाहिजे; तिच्या दादल्याला, बापाला, भावाला किंवा कुटुम्बांतील कोणत्याही पुरुषाला फिर्याद करतां येत नाहीं, असा एक निवाडा मद्रास कोर्टानें नुकताच केला आहे.

**स्तुत्य काटकसरः—** आजपर्यंत मुंबई, मद्रास आणि बंगाल पंजाब असें तीन इलाख्यांत तीन कम्यांडर इन्चीफ असून सर्व हिंदुस्थानचे सेनाध्यक्ष ह्मणून चौथे एक अधिकारी असत. तिन्ही इलाख्यांच्या कम्यांडर इन्चीफाचे पगार प्रत्येकीं ६,४०० रुपये प्रमाणें असून, हिंदुस्थानच्या मुख्य सेनाधिपतीस ८००० रुपये प्रमाणें दरमहा देत असत. पण येत्या महिन्या पासून प्रत्येक इलाख्याचें कम्यांडर इन्चीफचा हुद्दा रद्द करून त्या बद्दल "जनरल आफिसर कम्यांडिंग धी फोर्स" हा हुद्दा ठेवण्यांत येईल व वर लिहिल्या प्रमाणें चार इलाख्यांत हे चार आफिसर नेमून त्यांचे पगार प्रत्येकी ४५०० रुपये प्रमाणें करून हिंदुस्थानच्या मुख्य कम्यांडर इन्चीफचा पगार मात्र ८००० रु० कायम ठेवण्यांत येईल, अशी नवीन व्यवस्था करण्यांत आली आहे. क० त०

**उरावर दौलत नेणें—** आपल्यामध्यें तशाच प्रसंगानुसार ह्मणत असतात कीं, 'मग काय उरावर न्यावयाचे आहे! तर याची प्रत्यक्ष प्रचिती "मेक्सिको" प्रांतांत कोणी जोनेको या नांवाच्या साहेबानें करून दाखविली व ती तेथील न्यायकोर्टांत खरी ठरली! ह्या विषयाचा चमत्कारिक मजकूर विलायतेंतील एका वर्तमान पत्रांत येणें प्रमाणें लिहिला आहे— हा साहेब जातीचा चितारी होता. त्यानें मरणापूर्वी आजारी असतांना सारांशरूपानें थोडक्यांत आपलें मृत्युपत्र स्वहस्तें काळी शाईनें आपल्या नाभीपासून हृदयापर्यंत मुकाम्यानें सुरेख रीतीनें लिहून त्यावर सही केली होती व तारीख महिना आणि सनही लिहिला होता. पुढें तो मरण पावल्यावर त्याच्या आंगातले कपडे बदलावे लागले तेव्हां हा प्रकार दृष्टीस पडला, व तेथें जमलेल्या मंडळीनें वाचतांच सर्वांनुमतें त्यांस मूठमाती देण्यापूर्वीं तेथील बडे न्यायाधिकारी यांस विदित करण्यांत आलें. त्यांणीं हें चमत्कारिक वर्तमान ऐकून कोर्टाचे मुख्य कारभाऱ्यांस सदरील लेखाची अक्षरशहा नक्कल उतरून आणण्यास हुकूम केला, व याणें त्याप्रमाणें नक्कल आणतांच तो लेख खरा ठरवून त्यांत लिहिल्या प्रमाणें व्यवस्था करण्याचा शिरस्त्या प्रमाणें हूकुम दिला. सू०

**मुलाचा खून—** बऱ्हाणपूर येथें गेले आठवड्यांत एका तांबोळणीनें मूल वांचावें या करितां तीस कोणी मुलाचें काळीज खालें पाहिजे असें सांगितल्यावरून ह्या धाडसी स्त्रीनें ७-८ वर्षांचें पोर मारून हें अघोर कृत्य केलें असल्याचें समजण्यांत आलें आहे. बाईला पकडलें असून तिला सेशन सुपूर्द केलें आहे. सु. सि.

**नेटिवाचा खून—** ढाका शहरांत एका युरेशियनानें भर रस्त्यांत निर्लज्जपणें इंद्रियकर्म केलें, ह्मणून जवळून जात असलेला एक बंगाली मनुष्य त्याला बोलला. त्यावरून त्या साहेबानें त्याच्या डोकींत एक मोठासा कोळसा घालून त्याला जागच्या जागीं ठार केला; पण चमत्कार असा कीं ह्या खुनी मनुष्यास अजून पकडला नाहीं किंवा त्याबद्दल कोणी चौकशीही चालविल्याचें ऐकण्यांत येत नाहीं!

**पोलिटिकल ऑफिसर व राजा यांची मारामारी—** पंजाबांतील एका नेटिव संस्थानिकाचें व तेथील इंग्रेज पोलिटिकल आफिसरांचें एका समारंभाच्या वेळीं तोंड वाजलें. त्याचा परिणाम उभयतांनीं एकमेकांवर गोळ्या घातल्या येथपर्यंत झाला, अशी बातमी अमृतबझार पत्रिकेच्या बातमीदारानें कळविली आहे. दी. बं.

रेल्वे ऑफिसरांच्या पाजीपणाची एक गोष्ट लखनौ ॲडव्होकेट' पत्रांत प्रसिद्ध झाली आहे, ती खरी असल्यास तिकडील सरकारानें त्याबद्दल नीट चौकशी करून गुन्हेगाराला योग्य शासन जरूर केलें पाहिजे. ती गोष्ट अशी:— एका सुशिक्षित व वजनदार गृहस्थाला एका रेल्वे स्टेशनावर आगगाडींत बसून प्रवास करावयाचा होता त्याचें कुटुंबही त्याजबरोबर होतें. तो टिकिटें ऑफिसांत टिकिटें काढीत असतां ज्या डब्यांत त्यानें आपल्या बायकोला नेऊन बसविलें होतें त्यांत एक टिकिट कलेक्टर शिरला व वरील गृहस्थाच्या बायकोवर जुलूम करूं लागला. त्या दांडगाईंत त्या बाईच्या छातीवर त्या टिकिट कलेक्टराच्या माराच्या कांहीं खुणा राहिल्या होत्या. याबद्दल तक्रार करण्यासाठीं जेव्हां त्या बाईचा नवरा पुढें स्टेशन मास्तराकडे गेला त्या वेळीं त्या अधिकाऱ्यानें त्याला सांगितलें कीं, माझ्या हाताखालच्या मनुष्याच्या गुन्ह्याबद्दल चौकशी सुरू करण्याच्या अगोदर प्रथम मला स्वतःच्या आपल्या डोळ्यांनीं तिच्या छातीवर झालेल्या खुणा प्रत्यक्ष पाहिल्या पाहिजेत. हा विचित्र जबाब ऐकून त्या गृहस्थाला लज्जेने व दुःखानें आपली मानच खालीं घालावी लागली. मुं० वै०

सरहद्दीवरचा चीनचा जो प्रांत जपान मागत आहे तो त्यानें घेऊं नये अशा बद्दल रशिया व जर्मनी यांनीं मध्यस्ती करावी असें रशियाचें ह्मणणें आहे.

पुष्कळ लढाऊ सामान भरलेली एक चिनी बोट जपानी फौजेनें कैद केली.

जपानाशीं आमचा तह व्हावा ह्मणून तुह्मी खटपट करा अशी चीनच्या बादशहानें इटालीच्या राजास विनंती केली आहे.

तह करण्यास गेलेला चिनी ली हुंग चंग याच्या बरोबर अमेरिकन वकील असून त्याची जपानी प्रधानांनीं सिमसकी येथें सत्कारपूर्वक भेट घेतली.

जपानच्या दरबारांत लष्करी लोकाचें प्राबल्य जास्त असल्यामुळें तह करण्याचें काम शेवटास जाईल असें वाटत नाहीं.

जें पिंको ठिकाण जपानी लोकांनीं नुकतेंच घेतलें तेथील एक खिस्ती स्त्री ह्मणते कीं, बहुतेक चिनी शिपायी अगदीं वाईट आहेत. त्यांस योग्य शिक्षण नसून त्यांचे पगार वेळच्या वेळीं मिळत नाहीं. ते जागोजाग लुटी करून गरीबांस त्रास देतात. जपान्यांचा पगार वेळच्या वेळीं मिळत असून ते लोकांस त्रास देत नाहींत. या वरून जपानची पद्धत चांगली ठरते व त्यामुळेंच ते जागोजाग जय मिळवतात; तरी ही लढाई निष्कारण व अन्यायाची आहेच. आणि त्याकरतां सर्वांचें मन चीनाच्या बाजूस आहे.

चित्रळ येथून निघून जाण्याबद्दलचें इंग्रजसरकारचें सांगणें उमराखान ऐकत नसल्यामुळें इंग्रजसरकारच्या फौजेची एक मोठी टोळी लवकरच त्याच्यावर चाल करून जाण्याच्या तयारींत आहे.

चित्रळस्वारीकरतां झेलम येथें कमिसरी खात्यांतून उन्टें जमा करण्याचा झपाटा चालू असून १५० उन्टें भाड्यानें घेणार आहेत.

**चित्रळवर जाणारी फौज.**

१ ली बटॅलियन, २९ वी पंजाब, ३० वी पंजाब देराजत तोफखाना व इस्पितळ व इतर लढाऊ इस्पितळ. डेपुटी अडजु व कार्टरमास्तर जनरल—क्या. हामिल्टन, व क्या. हरबर्ट ब्रिगेट मेजर्स— क्या. बाठण, स्टाकवेल व स्टाटन; कमिसरी आफीसर्स—क्या. विलियम, थाकवेल व साटन; ब्रिगेड डिविजन—स्टाफ क्या. मगहूतबेड, ले क अटकीन, क्या. होल व निकलसन, क. मामंड, मे ह्रेमर, सर ज थामसन व मे बरो.

तेथून निघून जाण्याची उमराखानाची इच्छा दिसत नाहीं व त्याची तेथील छावणी व तयारी मोठी मजबूत दिसते.

सरकारानें उमराखानास जी शेवटची नोटीस दिली त्याबद्दल शंका राहूं नये ह्मणून त्या नोटिशीच्या पुष्कळ प्रती तिकडे प्रसिद्ध केल्या शेर अफझुल यानें डा. राबर्टशीं बोलण्याचें बंद केलें असावें.

डा. राबर्टसन किल्यांत असून शेर अफझल हा आपले लोक व उमराखानाचे ४०० लोक यांसह चित्रळ शहरांत आहे.

नार्थ वेस्टर्न रेल्वेवर ता. २५ मिनहूपासून दुसरा हुकूम होईपर्यंत रावळपिंडी व पेशावर यांच्या दरम्यान उतारू लोकांस टिकिटें मिळणार नाहीं असें ठरलें आहे.

चित्रळ येथें असलेला इंग्रजकामदार डा. राबर्टसन यांची तेथून सुटका करण्याकरतां लागणाऱ्या तजविजी करण्यास गव्हरनर जनरलांस आह्मी मुखत्यारी दिली आहे असें स्टेट सेक्रेटरी यांनीं वेडरबर्न यांच्या प्रश्नास पार्लमेन्ट सभेंत ता. २१ रोजीं जबाब दिला. यावरून उमराखानावरची स्वारी हा राबर्टसनच्या सुटकेकरतां आहे असें होतें, पण हें कारण आजपर्यंत इकडे कोणास ठाऊकही नसून माझें रक्षण करण्यास मी समर्थ आहे असें डा. राबर्टसन याजकडून लिहून आल्याचें मात्र प्रसिद्ध आहे.

इंग्रज कामदार कांहीं फौजेसह चाल करून जात असतां कारग येथें शत्रूशीं मागून मारा सुरू केला तेव्हां त्या इंग्रज कामदारांस परत बनी येथें येणें भाग झालें पण शत्रूनीं तो रस्ता बंद केल्याचें आढळलें. त्या रस्त्यावर शत्रूचे १००० लोक आहेत असें आढळलें. क्या. रोज याच्या टोळींतले ४६ शिपाशी व ८ बिगारी मेले ले. जोन जखमी होऊन फक्त १४ लोक घेऊन परत बनी येथें आला. ले. मोबर्ले व जोन्स यांनीं पुढें जाण्याचा नाद सोडून दिला व बनी येथेंच राहिले. डसन किल्यांत लोकांचा मोठा जमाव झाला आहे. ३२ साव्या पायोनियरचा कमांडिंग क्या. केनडी हा फौजेच्या जोरावर पुढें चाल करणार आहे.

काबूलच्या अमिराचें विलायतेस जाणें अजून जरी कायम झालें नाहीं तरी अमिराचा सत्कार करण्याची विलायतेस मोठ्या जारीनें तयारी सुरू आहे. येत्या मे महिन्यांत अमीर विलायतेस येईल असें अधिकाऱ्यांचें अनुमान आहे.

रशिया व अफगाण यांनीं एक होऊन इंग्रजांशीं लढाई करण्याचें ठरविलें अशी मीरत येथें फार दाट बातमी आहे. ठा. अ.

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Single copy........................ 4 as

किरकोळ अंकास ................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ........ ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines... 2 Rs.
per line over 10... 4 as.
Repetition Per line 3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX | AKOLA MONDAY 8 APRIL 1895 | NO. 13

वर्ष २९ | आकोला सोमवार तारीख ८ माहे एप्रील सन १८९५ इ० | अंक १३

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळ्या, कर्डी, लेखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

२१०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशीशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुखें निर्विघ्नपणानें निघतात लेखणी— हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तुंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इंग्लिशस्थळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक मालाबरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे वंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असुन आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस सुतारी, कापड, फरनीचरचें जातींचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्का प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रकम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

## आठवण

अस्ताला दिननाथ एक दिवशीं जायास बेगें निघे.
आरक्तांबर चित्रितांबुद नवे दिक्तास हरूनि घे
पक्षी आक्रमिती स्वकोटरपयोल्हासें नभाभीतरीं
क्षेपी सूर्य करां, धरा पट वरीं हेमापरी भर्जरी ! १
हर्म्याग्रीं बसलों विकासित मनें पाहे प्रभेतें नभीं.
वेल्हा ती रमणीय, त्यांत रमणी बाजूस माझ्या उभी.
कंठीं घालुनि पुष्पहार रमणी नेसूनि श्वेतांबर
पाहे मत्सम विश्वविभव मुदें जें गारवीं अंतर २
आम्रा पासूनि मंजुनाद करूनी गेली पिकाली वर
राव्याचा समुदाय जाय आमुच्यापासूनि मेदातुर
आधी कोण गणी कितीक ह्मणुनी मोजी विहंगा वरी
लीलायुक्त विनोद सत्य सुविलेलाक्षी करी यापरी ३
हर्म्याग्रीं बसतां दिसे सुनगरी हेमांबर व्यापलीं
झाडें दाट ह्मणूनि त्यांत दिसलीं सारीं घरें लोपलीं.
होतीं ऊंच सुरालयें कळसही त्यांचे करूनि वर माना,
विश्वचमत्कृतीस बघण्या ते भासले तत्पर ४
मैदानावरती तृणें उगवलीं चोहींकडे सुंदर.
घेतां पर्वत सांवरूनि गमलें माथ्यावरी भास्कर.
झाली पश्चिम लाल लाल अवघी संधि प्रकाशें अशी
जातां नाथ परस्थलीं सुललना संतप्त होते जशी । ५ ।
जातो प्राणसखा त्यजूनि जग हें भोगावया अक्षम
आहे कीं विरहव्यथा, ह्मणुनिया ही कामिनी पश्चिम
खोवी स्वीय उरीं सुरी, गळतसे शोणीत पृथ्वीवर
झालें विश्व ह्मणूनि लाल, नसती हे भास्कराचे कर । ६ ।
येतांना उदयास भास्कर जसा आरक्त तेजा धरी,
जातांना विलयास त्याच पहिल्या कांतिप्रती आदरी,
थोरांना विधिचा प्रभाव कसली नीचोच्च देवो स्थिति
रीतीचा पहिल्या न त्याग करिती; ही स्तुत्य त्यांची कृति. ७
सूर्याचें रमणीय बिंब बघुनीं, पाहूनि मूर्तिमत
होती सुंदर भिन्न भिन्न असले चित्तीं विचारोद्भव
होवो दुःख, असोत कष्ट कसले, रोगें कसो ग्रासला
वृत्ती तन्मय होउनी जन नसे तो कोण संतोषला ? ८
जाती लोकपथें अनेक, दिसती ते अल्प पक्षापरी
गाई पुच्छ उभारूनी परतती त्या आपुल्या घरीं
मार्गीं धुरळा उडे, वर पडे, अस्तार्क रक्तद्युति
वाटे खेळतसे गुलाल ललना पृथ्वी जणो ये रिती ! ९
वृक्षाग्रीं खगयुग्म बैसुनि करी क्रीडा अनेकापरी,
उत्कंठें पिक झाडितो स्वरमणीगात्रांस वृक्षावरी,
ऐसें प्रेम बघूनि होय रमणी प्रेमाकुला सुंदरी
ये आलिंगन द्यावया, दुर सर, तो लागली अंतरीं ! १०
गेला सूर्य लयास. नष्ट सगळी झाली प्रभा अंबरीं.
होतों पहात विश्वविभव अशी गच्चीवरी तों घरी.
गेला तो दिन ! ती प्रिया जवळही आतां न..रतसें यावया !
ज्यांच्या प्रेमळ भामिनी, मम दशा ते शक्य जाणावया । ११ ।

अकोला BEE.

## हिंदुस्थानची राजनीती

आर्यावर्तांत इंग्रजांचा प्रवेश झाल्यापासून शिक्षणाचा प्रसार झाल्यानें होत असल्यानें, राजकीय हक्क संपादन करण्याची महत्वाकांक्षा उत्पन्न होऊन लोकांत जिकडे तिकडे चळवळ उडालेली दृष्टीस पडते. इंग्रजी कामदारास आज एक शतकावर हिंदुस्थानांत बादशाही अम्मल गाजविण्याची गोड संवय आंगवळणी पडल्यामुळें प्रस्तुत चालू असलेल्या चळवळीपासून राज्यक्रांति होऊन अत्यंत श्रमानें संपादन केलेल्या विस्तीर्ण हिंदुस्थानास फारकत देऊन सप्तशृंगी कडे ( लंदन ) आपल्यास धूम ठोकावी लागते कीं काय अशी धास्ती उत्पन्न झाल्यानें "आंग्लो इंडियन" प्रभृति लोकांचे निरर्गल प्रलाप ऐकू येत आहेत, स्थानिक स्वराज्य, सायमलटेनीयस एक्झामिनेशन, कायदे कौसिलांत एतद्देशीयांचा प्रवेश इत्यादि विषयांचा उहापोह चालला असतां हे "आंग्लो इंडियन" लोक आकांड तांडव करून हिंदुस्थानचे लोकांवर असतील नसतील ते दोषारोप करून त्यांच्या आंगीं कर्तृत्व शक्तीचा रोप, जो हल्लीं जोरानें फोंफावत आहे, त्यास जागच्या जागीं खुटून टाकून नष्ट करूं पाहण्याचा प्रयत्न करीत आहेत. पार्लमेंट सभेनें हिंदुस्थानच्या प्रश्नाकडे किंचित लक्ष दिलें असतां १८५७ सालची पुनरावृत्ति होते कीं [illegible] असा धाक पडून हे लोक निराशेनें, पण आवेशानें बो-

क्याचे केस उपटून टाकीत आहेत. अशा निकाराच्या प्रसंगीं इंग्लंदांतील थोर थोर दूरदर्शी मुत्सद्यांचे काय, विचार आहेत. हें समजून घेणें फार अगत्याचें झालें आहे. तेणें करून प्रयत्न कोणत्या दिशेनें केला पाहिजे, कोणत्या गोष्टी प्राप्त करून घेण्यास झटलें पाहिजे. आणि आपल्या आशांचें नियमन किती अंशांनें केलें पाहिजे हें समजून घेण्यास, अफाट महासागरांतील नौकेस जसें होकायंत्र तसें ते विचार आपल्यास साधनी भूत होतील.

हिंदुस्थानचा राज्यकारभार कोणत्या धोरणानें चालविला पाहिजे या विषयीं मेजर इव्हान्स बेल साहेबांनीं आपल्या लेखांत वारंवार प्रदर्शित केलेले विचार, अनुभविक असल्यानें फार मोलाचे आणि मुत्सद्दीपणास शोभण्या सारखे आहेत. ह्या विचारांचे एकीकरण करून इंग्रजींत नुकतेंच एक पुस्तक "इंडियन पॉलिटि" या नांवानें मि. डी. इ० वाचा यांनीं प्रसिद्ध केलें आहे हे मेजर बेल साहेब एकवेळ म्हैसूर संस्थानचे रेसिडेंट होते. त्यांचे अनुभव जन्य विचार किती महत्वाचे आहेत हें सांगण्यापेक्षां वाचले असतां त्यांच्या महत्वाची जास्त साक्ष पटणारी आहे. मराठी वाचकांचा वर्ग फार मोठा असल्यानें त्यांस हे विचार कळण्याची जरूरी आहे असें वाटल्यावरून वरील पुस्तकाचा भाषांतररूपें सारांश देण्याचा प्रस्तुतचा प्रयत्न केला आहे.

हिंदुस्थानच्या शासन पद्धतींतील व्यंगें नाहींशीं करण्याकरितां पार्लमेंटची सत्ता अत्यावश्य आहे— १. हिंदुस्थानच्या शासनपद्धतींत पडून तींत, अनिश्चित आणि संशयोत्पादक तत्वांचा प्रवेश होण्यास पार्लमेंट कारणीभूत झाली ह्मणून तिची निंदा केली जात आहे; पण मला वाटतें कीं, ती ह्या कारणामुळें निंदेस पात्र न होतां उलट अत्यंत प्रशंसेस पात्र झाली आहे. राज्यशकट चालविणाऱ्या व्यक्तीच्या अगर वर्गाच्या हातून चुका होत नाहींत ह्या तत्वावर माझा मुळींच भरंवसा नाहीं. स्थाईक "सिव्हील सर्विस" पासून उत्पन्न होणारे दोष, अधिक सूत्र दीर्घ काळ हातीं राहिल्यानें, मुत्सद्दी लोकांच्या अंगीं खिळून जातात.

हिंदुस्थानची सुधारणा होण्यास राज्यकारभारा संबंधीं पक्ष प्रतिपक्ष उत्पन्न झाले पाहिजेत—१. पार्लमेंट समेंत राजपक्ष आणि प्रजापक्ष ह्मणून जे मोठे दोन भेद आहेत त्यांत हिंदुस्थानासंबंधी चर्चा चालूं झाली असतां हलकल्लोळ माजून जाईल असें कित्येकांनीं भविष्य कथन करून ठेवून त्यास फार भय उत्पन्न झालें आहे. असा जर निकराचा प्रसंग कधीं काळीं येऊन ठेपलाच तर त्यापासून भयंकर परिणाम निष्पन्न होतील असें मला वाटत नाहीं. असा प्रसंग आला असतां सांप्रत हिंदुस्थानच्या कारभाराविषयीं जी असहिष्णुता आणि निष्काळजी दाखविली जाते ती जरी निदान दाखविली जाणार नाहीं, आणि हिंदुस्थानच्या कारभाराकडे सर्वांचें लक्ष वेधलें जाऊन त्यासंबंधी सार्वत्रीक चर्चा चालूं होईल.

[ पुढें चालूं ]

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र १४ शुद्ध शके १८१७

## प्राणिजीवन शास्त्र

( १० वे अंकावरून पु० चा० )

निद्रावस्थेंत असतांना ज्या काल्पनिक व्यवहारामध्यें आपण एकसारखें गुंतलेले असतो असें आपणास वाटतें आणि जे विचार आपणामध्यें सपाट्यानें चालले असतात त्यास स्वप्न असें ह्मणतात. मनुष्यानें ज्या अनंत विषयावर विचार केला आहे त्यांत स्वप्नावर जितका विचार झाला आहे इतका दुसऱ्या कोणत्याच विषयावर झाला नसेल.

परंतु इतका विचार करूनही तत्वज्ञानास निर्णयात्मक निकाल असा कांहींच आढळून आला नाहीं. आरिस्टाटलचें ह्मणणें असें आहे कीं प्रत्येक इंद्रियात्मक विषयाचा मानवी ज्ञानेंद्रियावर ज्ञानविषय निघून गेल्यावर बराच काळपर्यंत परिणाम घडलेला असतो आणि झोंपेमध्यें विषयावगमन-शक्तीचे योगानें किंवा विषयग्रहणसमर्थन- शक्तीचे योगानें त्या पदार्थाचा आभास पुनः होतो आणि त्यावरून आपणास भिन्न भिन्न पदार्थ आपले पुढें उभे आहेत असें दिसूं लागतें. इंग्रजी ग्रंथकारामध्यें ब्याक्सटरनें या विषयावर जितकें लिहिलें आहे तितकें दुसरें कोणीच लिहिलें नाहीं. त्याचें ह्मणणें असें आहे कीं कांहीं विविक्षित अपदेवतांच्या प्रभावानें प्राण्याच्या मनावर स्वप्नसंचार होतो. या मताच्या योगानें हवें तेवढें ढोंग आणि धर्मवेडाचें खूळ सर्व जातींच्या लोकांमध्यें अद्याप पर्यंतही मान्य आहे.

प्रोफेसर ड्युगल्टुअर्ट ह्याचें मत अधिक ग्राह्य दिसतें. झोंपेमध्यें मनाची स्थैर वृत्ति बंद असते. आणि त्यामुळें मनाचा निरनिराळ्या इंद्रियावरील दाब नाहींसा झालेला असतो ह्मणून इंद्रियावर दाब ठेवणाऱ्या सर्व मानसिक क्रिया झोंपेमध्यें बंद असतात परंतु मनाची विश्रांति पुरी झाल्यावर जरी शरिरास विश्रांति मिळत असते तरी मनाचा व्यवहार सुरू होतो व त्याच्या कल्पना चालूं होतात. स्वप्नांत आणि उन्मद अवस्थेमध्यें बरेंच साम्य आहे असें दिसतें. स्वप्नामध्यें, मनुष्याच्या व्यवहारामध्यें अथवा वर्तनामध्यें कायमचा ठसा उमटत नाहीं आणि जागे झाल्यावर स्वप्नांतील सर्व दृश्यमान पदार्थाचा लोप होतो परंतु वेडेपणाच्या स्थितीमध्यें आपल्या मनोवृत्तींतील फरक कायमचा असतो आणि त्याचा आपल्या वर्तनावर परिणामही घडतो. स्वप्नामध्यें कोणत्यां ना कोणत्याही रूपानें पूर्वीं ज्या गोष्टींचा आपल्यावर थोडाफार परिणाम झाला असेल त्याच गोष्टींचा सुसंबद्ध देखावा दिसतो. या गोष्टी उदाहरणानें सिद्ध करून देतां येतील. स्वप्नामध्यें कल्पनाशक्ति मात्र नष्ट झालेली नसते. एखादे वेळीं आपण मृत मनुष्या बरोबर बोलतों आहों असें दिसतें. अशा वेळीं स्मरण शक्ति जागृत असते आणि विचारशक्ति नष्ट झालेली असते. क्वचित प्रसंगीं आपण मृता बरोबर कडाक्याचा वाद करीत असतों. या वेळीं सारासारशक्ति जागृत असते. विचारशक्ति नष्ट झालेली असते. ईश्वरी भविष्य कथनाला हीच गोष्ट लागूं आहे. एथवर स्वप्न ह्मणजे काय आणि त्या बद्दल निरनिराळ्या तत्ववेत्यांचे काय अभिप्राय आहेत हें सांगितलेंच आहेत. वारंवार स्वप्नामध्यें असें होतें कीं, आपले कांहीं मानसिक व्यापार बंद पडतात व दुसरे सुरूं असतात. त्या वेळीं एका मागून एक आपल्या मनामध्यें तरंग उठतात. अशा वेळीं त्या मध्यें थोडा फार संबद्धपण ही असतो. ह्या स्थितिमध्यें बाहेरल्या वस्तु बद्दल आपणास बिल्कूल ज्ञान नसतें. आणि आपल्या विचाराच्या ओघात दाबण्याचेंही आपणास अवसान नसतें. ह्मणून विचारमालिकेचा आपणावर पुरा अंमल असतो. ह्मणजे एका विचारा मागून दुसरे विचार सारख्या प्रमाणानें अव्याहत एकसारखे येत असतात. क्वचित् काळीं ते सुसंबद्ध आणि ढळढळीत असतात. पण एकंदर रितीनें पाहूं गेलें असतां त्यांत कमजास्त विसंगता आणि गोंधळ असतात. वारंवार असेंही घडून येतें कीं आपण मोठ्या धोक्यांत पडलों आहोंत आणि त्या पासून सुटण्याची आपली मोठी इच्छाही असते. परंतु आपण सर्वथैव लाचार असून आपल्याच्यानें तसें करवत नाहीं असें आपणांस वाटत असतें. या स्थितीला इंग्रजींत In cubus किंवा Night mare किंवा ( संस्कृत ) दुःस्वप्न स्थिति असें ह्मणतात. दुसरी विशेष लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही आहे कीं ज्या वेळेस आपण स्वप्नस्थितींत असतो त्या वेळेला आपली विचारमालिका फारच सपाट्यानें चालूं असते; ती इतकीं कीं थोड्या पळाच्या अवकाशामध्यें आपल्याला कित्येक वर्षांची हकीकत दिसून येते. मनाला अत्यंत क्षुब्ध करणाऱ्या स्वप्नांनीं कधी कधीं निद्रावस्थेंतच अस्वास्थ्य, विभ्रम, अंगविक्षेप, अथवा हस्तचालनादि व्यापार स्वप्नगोचर प्राण्यांस दृष्टीस पडतात तरी पुष्कळांच्या स्नायु शिरादिकांच्या हालचालीमध्यें व्यक्त होते. पण ज्या वेळेला स्वप्नामध्यें आपण हालचाली करितों अथवा दुसऱ्या बरोबर आपण बोलत असतों. आणि आपली मानसिक शक्ति इतकी बंद पडलेली असते कीं स्वप्नावस्थेंत आपण काय केलें याची जागृत अवस्थेंत अगदीं आठवण रहात नाहीं त्या स्थितीस Somnambulism ( निद्रा भ्रमण ) असें ह्मणतात.

निद्राभ्रमण; — या स्थितीची विशेष गोष्ट ही आहे कीं विगलितवेद्यान्तर गोष्टीहून फक्त एक संकल्प अथवा एक विचारमालिकेने मनन सर्वथैव व्याप्त असतें. ज्या साधारण गोष्टीवरून ह्मणजे प्रकाशाच्या तेजानें किंवा मोठमोठाल्या आवाजानें किंवा शारीरिक संस्पर्शानें मनुष्याचे शरीरव्यापार सुरुं होतात. त्यांचा निद्राभ्रमण करणाऱ्यांवर कांहींही परिणाम घडत नाहीं परंतु झोंपें मध्यें बाळगणारा जागृत अवस्थेपेक्षां देखील अधिक सूक्ष्मपणानें ज्या विषयावर तो बोलत असतो त्या विषयावर अतिशय तीक्ष्ण पणानें आणि स्पष्टतेनें बोलत असतो. त्याच प्रमाणें झोंपेंमध्यें तो चालू लागल्यास जागृतावस्थेंत जितक्या सावधगिरीनें चालतो त्यापेक्षांही अधिक सावधगिरीनें आपल्या समान सुमानाची ठाक ठाकीनें व्यवस्था लावून तो चालू लागतो. त्याच प्रमाणें या स्थितीमध्यें एका मानसिक कल्पनेवरील मनुष्याचे विचार पूर्ण झाल्यावर जर त्याच्या मनांत दुसरा विचार घोळूं लागला तर ह्या दुसऱ्या विषयावर ही पूर्वीच्या विषयाच्या विचारसरणीचा कांहीं ही गोंधळ न होऊं देतां त्याचे विचार चालूं होतात. उदाहरणार्थ उमरावतील एखाद्या मनुष्याचे लक्ष सातार्‍यांतील वस्तूवर लागलें असेल आणि तो सातार्‍यास जाण्याच्या तयारींत असेल तर मार्गांत त्यास धक्के वगैरे जरी लागले तरी त्यास जागृतावस्था प्राप्त होत नाहीं. तसेंच निद्रावस्थेंत एखाद्या मनुष्यास आपणास त्वग्राग झाला आहे असें वाटेन जर तो वैद्याकडे जाण्याच्या तयारींत असेल तर तशा स्थिती मध्यें त्यास त्याच्या अंगावरील कपड्यांचा स्पर्श देखील सहन होत नाहीं इतके त्याचे त्वगेंद्रिय संक्षुब्ध झालेलें असेंत. हाच नियम इतर इंद्रिया संबंधानेंही आहे. याच प्रमाणें एखाद्या विशेष गोष्टी वर विचारशक्तीचें एकीकरण झालें असतां अशा मनुष्याच्या हातून कैक गोष्टी घडतात आणि असे कैक व्यापार तो करितो कीं ते त्याच्या हातून जागृतावस्थेंत कधींही घडले नसते. या मुळेंच निद्रास्थितीमध्यें एखाद्या इंद्रिय शक्तिचा व्यापार संक्षुब्ध झाल्यावर तो तज्जन्य व्यापार करूं लागतो. आणि इतर गोष्टींचें त्यास ध्यान नसतें अशा वेळीं कल्पनाशक्तीचा जोर विशेष झाल्या असल्यास त्याच्या मनानें त्यापुढें जी वस्तू आली असेल त्या वस्तूचेच तो सूक्ष्म तऱ्हेनें वर्णन करूं लागतो आणि एकवार मनामध्यें जी गोष्ट करावी असें त्यास वाटतें त्या गोष्टीच्या अनुपपत्तिच्या सर्व सिद्धतेच्या साधनाचा तो परिश्रम करीत राहतो. यावरून इतकें सिद्ध होतें कीं निद्राभ्रमण करणाऱ्या मनुष्यास आपण मनावर घेतल्यास एखाद्या विषयावर आपण विचार करावयास लावूं शकूं

---

सन १८९३ च्या आगष्ठ महिन्यांत एक आठ ग्रहस्थांचे कमिशन नेमण्यांत आले होंतें. तें कमिशन गांजा कमिशन या नांवानें प्रसिद्ध आहे.

गांजाची लागवड कोठें व कसकशी होते त्याचे कोण कोणते मादक पदार्थ तयार होतात, त्यांच्या सेवना पासून लोकांच्या शरिरावर, मनावर व नितिवर काय काय परिणाम घडतात आणि गांजाची लागवड व तज्जन्य मादक द्रव्यांची विक्री यांची बंदीं कितपत केली पाहिजे असें चार ठोकळ प्रश्न कमिशना समोर होतें कमिशनचे लोक प्रांतोप्रांतीं हिंडले व त्यांनीं कांहीं माहिती अशी फिरण्यानें मिळविली, आणि कांहीं कांहीं लोकांस लेखी प्रश्नमाला धाडून त्याच्या कडून उत्तरें बोलाविली. या कमिशनचा रिपोर्ट गेल्या सालीं अगष्टच्या ७ वे तारखेस हिंदुस्थान सरकारच्या हातीं आला आणि त्या रिपोर्टांतील बहुविध व विस्तृत माहितीचें योग्य परिशीलन करून सरकारी ठराव व्हाइसराय साहेबांनीं गेल्या महिन्याच्या अखेरीस प्रसिद्ध केला आहे. हा ठराव फार उपयुक्त असून माहिती पुष्कळ आहे.

त्यांतील कांहीं कांहीं ठोकळ गोष्टी सारांशानें आह्मी आज देणार आहोंः—

एकंदर हिंदुस्थानांत ५७६९ एकर जमिनीवर गांजा उत्पन्न होतो, हिमालयाच्या पायथ्याशीं ही वनस्पती आपोआप उगवते आणि तिची वाढही त्या प्रदेशांत फार मोठी आहे. वऱ्हाडांत गांजाची लागवड करण्यास दर एकरी सन १८७६ साला पासून ८ रुपये सरकारी द्यावा लागत असे आणि तोच कर हल्लीं १० रुपये आहे. एकंदर ५८ एकर जमिनींत गांजा पेरतात आणि हा पेरा प्रांताच्या मानानें मोठा नाहीं पण अलिकडे गेल्या तीन वर्षांत लोकांच्या गरजेच्या मानानें गांजा थोडा थोडा उत्पन्न होऊं लागला ह्मणून त्यांच्या पेऱ्याचें प्रमाण थोडें वाढलें आहे. ठिकठिकाणच्या पेऱ्यांची व्यवस्था पाहून हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे कीं, सर्व देशभर गांजाच्या लागवड सरकारी परवान्या शिवाय होऊं नये आणि गांजाच्या लागवडीसाठीं प्रांतेप्रांतीं कांहीं जमीन नियमित करून वेगळी ठेविली जावी. नेटीव संस्थानांतून अशाच प्रकारची योजना करण्यांत येणार आहे.

गांजाच्या झाडा पासून तीन मादक पदार्थ निघतात. गांजा, चरस, व भांग. भांगेला सिद्धी, सबझी अथवा पत्ती अशींही नावें आढळतात हे तिन्ही पदार्थ लोक उपयोगांत आणितात व त्यापासून थोडा बहुत अमलही येतो. गांजा व चरस यांचा उपयोग ओढण्याकडे फार असून भांगेचा पिण्याच्या घोट्याकडे होत असतो. ही मादक द्रव्यें स्वस्त मिळतात. लोकसंख्येच्या वाढीच्या मानानें पाहतां गांजाच्या उपयोगाची मोठीशी वाढ नाहीं. आणि पूर्वी जे आंकडे ठाऊक नव्हते ते एकदम कळल्यानें वाढ झाल्या विषयीं खोटा भ्रम वाटत असतो, सन्यासी बैरागी वगैरे लोक आणि इतर लोकही भांगेचा उपयोग धर्मकृत्यांतील बाब या समजानें करित असतात. गांजाच्या व भांगेच्या संबंधानें बंदी केली तर धर्मकृत्यांत सरकारनें हात घातला असें लोकांस वाटून चळवळ होण्याचा संभव आहे.

गांजाचा परिणाम अपकारकारक किंवा पिडाकारकच असतो असें ह्मणवत नाहीं. भांग हा पदार्थ निरुपद्रवी असून उन्हाळ्यांत त्याचा घोटा प्याल्यानें हुशारीही वाटते. भांग पुष्कळजण पितात आणि तिची बंदी करावी किंवा तिच्यावर कर बसवावा असे दोघा कमिशनरांस वाटत देखील नाहीं पण त्यांचें ह्मणणें आहे कीं गांजा बंद करण्याविषयीं सक्तीचे हुकूम पाहिजेत. प्रत्येक पदार्थाच्या सेवनाला मर्यादा पाहिजे. अति सेवनामासून गांजाच काय पण पुष्टिदायक पदार्थही अपाय करील तेव्हां परिमित व नियमित सेवनाची व्यवस्था प्रत्येकानें आपआपल्या खानगी वर्तनांत ठेविली पाहिजे. गांजा, भांग वगैरेच्या सेवनानें वेडेपण येतें ह्मणून ह्मणतात तें कांहीं यथार्थ नाहीं आणि वेडेपण आलें तरी तें इतर कारणामुळें उद्भवलेल्या वेडेपणापेक्षां थोडा वेळ टिकतें आणि त्याचें स्वरूप कायमचें नसतें. लोकांच्या नीती वरही वरील सेवनानें कांहीं वाईट परिणाम होतात असें सांगवत नाहीं. गांजेकस व भांगवाले लोक अपराध अधिक करितात असें पाहण्यांत नाहीं.

---

The Berar Samachar

MONDAY APRIL, 8, 1895

## LEADERS OF MASSES
### NO. IV
(Communicated)

It is neverthless entirely our fault; when powers above over whom we have no control conspire to crush us, resources of the human mind receives a disastrous stroke. It is a trite remark which has been historically illustrated that the gigantic mainfestations of nature subdued into pusillanimous quit the natural vigour of the Hindu minds. They say thunder appalled us, the thunderbot struck us into dumb amazement. Immensə heights cowed us into a sense of utter weakness. Lengths induced us to leave the race. Depths struck terror into us. It is not my present object to scan this argument; suffice it to say that looks plausible. But we ought to know how did it happen that mind, did not rise with the grandeur of these manifestations of Nature. If the mind adapts itself to its environment, how was it that it did not rise to stature of giant mind capable of clinching the lofty altitudes, penetrate the deepest depths, longest lengths, broadest breadths; how was it that it did roar with the thunder, strike with the power of the thunderbolt, and assert its own immaterial and therefore powerful potency, over the material uproar and tumult. It ought to have done this. The mind should have been stimulated by admiration rather than with fright. It ought to have felt terrified love for the grand; in the great abyss and altitudes sublimity rather than hideousness; and ought to have recognised a marvel rather a monster in the great achievements of nature. It should have been its destiny. But for our present purposes the fact is here; we developed an imagination feeble enough to revel in Myth and Felistism. An arm unnerved enough to give the cobra its death blow, an eye weak to see the real purports of a flash of lightening and a mind timid to burn incense at the imaginary shrine of a deity. We are here a sinking, skulking, cowering, timid mass ready to resign every thing to fate and destiny, when we say that where ought we to go for redress when rain has pelted us or a king has thrashed us, we express our national development in all its totality. At the present day we are orphans of real meaning. Our proginators have left us a patrimony of small value; we have begun to see that new wants, new yearnings, other than those which satisfied our forefathers are enveloping us on all sides. The patrimeny is of small value at this crisis; we are destitute in the real sense of the term. We are neither clothed with the glory of the past nor fed by ideas to do battle with the new order of things which the conflict has conjured up before us. We are thrown upon the world or more accuratly speaking, we feel we are thrown upon the world ill equipped, ill provided, ill prepared to fulfill the extended range of human distiny, as the present exhibits to our view. In this helpless condition who takes us in hand, who feeds who guides us, who elevates us? And supposing an extraordinary genius transcending all of that immortal class of beings happens to alight on this land, with an arm of Hercules, mind of a Jupiter, enthusiasm of a cause most dear to Gods and men, with a determined purpose to take us in hand, what can he do? What one cord can he touch so as to infuse his enthusiasm in us. If the success of his mission depends on antecedent causes, if his activity should have a field of operation on universal ideas of the people he wishes to lend what such idea can he take hold of? An idea that has a basis in the universal popular mind. It is said we are in a transition state; that is to say we are in a condition when great ideas are being formed.

You cannot therefore be in a position to take up the ultimate leadership of masses, that is to say you cannot, all other things being equal, lead a great idea to its logical fruition, for unfortunately for us we are not in a position to present a grand universal idea. But for your want of great and ennobling ideals a primary leadership is possible. You can endeavour to impart to masses a preliminary discipline which will ultimately end in the production of grand ideas. Your task therefore is both extremely difficult and extremely tender.

---

## वऱ्हाड

मि० सुब्रायलू नायडू ए० असि० कमिशनर यवतमाळ हे अकोटच्या तहशिलीचा चार्ज रा० रा० विनायक आपाजी काणे यांस देऊन नव्या बढतीच्या जागीं रुजू होण्यासाठीं या जिल्ह्यांतून रवाना झाले.

मुनसी सादत मीरखा साहेब तहशिलदार यांस तारीख १ माहे एप्रील सन १८९५ इ. पासून पेनशनींत काढून त्यांचे जागीं रा. रा. लक्ष्मण नारायण गोखले नायब तहशिलदार मंगरूळ यांस पुसदचे आफीशिएटिंग तहशिलदार नेमलें.

मि० एफ. सी. क्राफर्ड रेलवे पोलीस सुप्रिंटेंडेंट साहेब याणी ता० १६ एप्रील सन १८९५ पासून किंवा ते घेतील त्या तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा घेतली. त्या रजेंत त्यांचे जागी मि. आर. म्याकूगील असि.सुप्रि. पोलीस शिकंदराबाद यांस रेलवे पोलीस सुप्रिंटेंडेंट नेमिलें व त्यांचे जागीं मि० एफ. एल- क्राफर्ड असिस्टंट पोलीस सुप्रिंटेंडेंट वऱ्हाड यांस शिकंदराबादेस असि० पोलीस सुप्रिंटेंडेंट नेमलें आहे.

हायर लोअर परीक्षा गेल्या सोमवार पासून उमरावतीस सुरू होऊन समाप्त झाली.

वऱ्हाडांतील वकीलीचे परिक्षेची तारीख ४ सप्टेंबर सन १८९५ ची नेमिली आहे.

क्यापटन माहिट अ. क. यांस ता. १६ एप्रील सन १८९५ पासून किंवा ते घेतील त्या तारखे पासून ३ महिन्याची हक्काची रजा मिळाली आहे.

मि सिंपसन व क्यापटन हार्सबरो अ. कमिशनर यांना वऱ्हाड पाटील पटवारी कायद्या प्रमाणें डेप्युटी कमिशनरचे सर्व अधिकार दिले आहेत.

मुनशी अझिजुद्दीन ए. अ. कमिशनर उमरावती यांस असिस्टंट कमिशनर नेमिलें.

सरकारनें धंदेशिक्षणाची शाळा उमरावतीस सुरू करण्या करितां मंजुरात दिली आहे.

वऱ्हाडांतील पोस्टाचे सुप्रिंटेंडेंट मि. पुसी यांस राजपुतान्या कडे बदललें.

मि. रा. ए. सिंपसन व क्याप्टन रा. पी. हार्सबरो अ. कमिशनर यांना सन १८७९ चा आक्ट २१ यांतील कलम ६ अन्वयें मुलुक अमानी हैद्राबादमध्यें जस्टिस ऑफ धी पीस नेमिलें आहे.

रा. रा. त्रिंबक गणेश परांजपे यांस अ. कमिशनरचे मुलकीचे सर्व अधिकार दिले आहेत.

येथील पोलीस स्टेशन मधील मवतगार रा. रा. रामभाऊ यांस एका लबाड चोरानें तरवारीच्या वारानें बेदम घायाळ केलें होतें. पण ते हल्लीं ईश्वरकृपेनें चांगले सुधरत आहे. वरील तरवार फेकीच्या वेळीं रा० रा० शंकर सखाराम यांनीं बहादरीनें तलवार पकडली ह्मणून एका मनुष्याचा प्राण वांचला. नाहीं तर वेळ मोठी कठीण होती! अशा शूरपणा बद्दल त्या खात्यांत राजश्री शंकरराव यांची योग्य संभावना होईल अशी खात्री आहे.

---

नमुना (जी)

नादारी मुकद्दमा नंबर ९ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हे अकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येते कीं मारुती गोविंदा लांडगे राहाणार अकोट हा नादारी आहे असा आज तारीख २० माहे ३ सन १८९५ इसवी रोजी ठराव झाला आहे. आणि तारीख २६ माहे ४ सन १८९५ हा दिवस नादाराचें सावकारांनीं नेमण्या क[illegible] रुजवात करत आणि सावकारांना आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटिशींत ज्या आधारावरून तकार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नावें नमुद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. ता० २९।४।९५ इ०

B. B. Sule
Judge
B. Court
Akola District.

---

## वर्तमानसार.

दंगा— रंगून येथील पोलिस ट्रेनिंग स्कुलांत नवीन आणलेल्या रिक्रुड भरतीचे मुसलमान व हिंदु उमेदवारांनीं गेल्या आठवड्यांत बराच दंगा केल्याचें समजतें.

हत्यारांचा संग्रह—मथुरा जिल्ह्यांत देहरा येथें एका देवळांत २०० हत्यारांचा साठा करून ठेविलेला सांपडल्यामुळें पोलिस जारीनें चौकशी करीत आहे असें लखनौ आ. मध्यें लिहिलें आहे.

पोरांची होळी—लाहोर येथें गेल्या शिमग्यास होळी पेटली असतां प्रदक्षणेचे वेळीं कांहीं फाजील शहाण्यांनीं दोन पोरास होळींत लोटलें. त्यामुळें तीं वांग्यासारखीं होरपळून बाहेर पडलीं.

झार साहेब इन्फ्लुएंझानें आजारी असल्याचें समजतें.

लंडन शहरांत हल्लीं इन्फ्लुएंझा तापानें फारच कहर करून सोडला आहे गेल्या आठवड्यांत त्या शहरांत फक्त याच आजारानें चवदासें मनुष्यें मेलीं.

नुकसान--मौलवी इलाहीबक्ष यांना आगगाडीच्या धक्यामुळें इजा झाली होती त्याबद्दल त्यानीं स्टेट सेक्रेटरीवर ५॥ लाखांचा दावा मांडला होता. त्याबद्दल त्यांस २०,००० रुपये व थोडासा खर्च मिळाला असें समजतें. वे. श.

ग्रेटब्रिटन मध्यें दरसाल १३०००० दुचाकी गाड्या तयार होऊन बाह्य देशीं जातात असें तिकडील व्यापारी माहितीवरून सम…

ह्मातारे विद्वान, कारागीर आणि नाटक्ये यांस ह्मातारपणी अन्नाच्छादन मिळण्यासाठीं एक आलय स्थापावें असा तरुण झार साहेबांचा उद्देश असल्यामुळें त्या संबंधानें चौकशी करण्यासाठीं झार साहेबांनीं एक कमिशन नेमलें आहे. उद्देश इतका स्तुत्य व उदार बुद्धीचा आहे कीं त्याचें वर्णन करावें तितकें थोडेच.

खोट्या कागदा बद्दल अमिरी शासन— अफगाणिस्थानांतील राहणारे महमद गुलखान, अबदुल मानन, आणि इस्मायल ह्यांनी अमिरच्या अकौंटट जनरलच्या व दुसऱ्याच्या नावाच्या खोट्या सह्या करून ते कागद अमिरापुढें आणिले पण त्या सह्या खोट्या आहेत असें चोकशी अंतीं ठरल्यावरून त्या तिघांस खोट्या सह्याचे कागद त्यांच्या छातीवर बांधून फाशी द्यावे आणि ३ दिवस तसें फासावर ठेवावें. असा ठराव करून अमिर साहेबांनीं तो अमलांत ही आणिला. आणि या पुढें असे खोटे दस्त करतील तर त्यांस असेंच शासन होईल असा एक जाहिरनामाही अमिरसाहेबांनीं प्रसिद्ध केला आहे असें तिकडून आलेल्या बातमी वरून समजतें.

पार्लमेंट मेंबरास नेमणूक—पार्लमेंट मेंबरास कांहीं नेमणूक द्यावी ह्मणून मि. अलन यांनीं ता. २२ मार्चच्या रात्रीं हौस आफ कामन्स सभेंत एक ठराव आणिला होता त्यास पुष्कळ मतें मिळून नेमणूक द्यावी असा हौस आफ कामन्स सभेनें ठराव केला. हा ठराव अमलांत आणिला असतां सरकारास सालिना २००००० पौंड खर्च लागेल. शु. सू.

हिंदुस्थानच्या फारेस्ट खात्यांतील जे अंमलदार विलायतेस चाकरीत शिरतील त्यांस [illegible] नियमांच्या ६१३ व्या कलमा प्रमाणें पेन्शन देण्याचें ठरलें.

गिलजेतची कांहीं फौज कांहीं तोफासह मस्तज येथें रवाना झाली.

निजाम सरकारानें आपल्या जमाखर्चाची नीट व्यवस्था लावण्या करितां मुंबईच्या म्युनासिपाल कामिशनरा पासून मि. कावला नांवाच्या गृहस्थास मागून नेलें होतें व ते व्यवस्था लाऊन परत आले.

आपल्या आरमारी फौजेंत ५०,००० लोक जास्त केले पाहिजेत असें विलायतच्या लार्ड सभेंत एकानें व्याख्यान दिलें व तें बाकीच्यांस मान्य झालें.

चीन सरकाराकडून तहाचें बोलणें करण्या करितां गेलेला ली हंग चंग हा सिमोनास्की येथें तहाचें बोलणें करण्याच्या दरबारांतून उठून आपल्या बिऱ्हाडीं येत असतां रस्त्यांत त्यांच्यावर एका माणसानें पिस्तुलाची गोळी घालून ली हंग चंग यांस घायाळ केलें.

या गोळी घालण्याच्या प्रकारा वरून लोकांत मोठी चळवळ सुरू झाली आहे.

कुबा येथें लोकांनीं दांडगावा सुरू केल्या वरून गरज लागल्यास तेथील आपली योग्यता कायम राखण्या करितां स्पेन सरकार एक लाख फौज पाठविण्यास तयार झालें आहे.

आफ्रिकेंतल्या इंग्रज कंपनीचा हक्क इंग्रज सरकार विकत घेत आहे.

बेलजमच्या हद्दींत सुधारकांनीं दांडगावा चालविला असल्या मुळें त्यांस शांत करण्या साठीं सरकारनें फौज बोलावली आहे.

फ्रेंच व इंग्रज या सरकारच्या दरम्यान फ्रेंचांच्या आगळीकी करून कांहीं बेबनांव होण्याचा रंग दिसत आहेत. ठा. अ.

बडोदा संस्थानांतील वाघोडिया येथील वहिवाटदार रा. सा. माधवराव नारायण गोडबोले हे अडीच वर्षांची रजा घेऊन कापड धुण्याचें व रंगविण्याचें काम शिकण्या करितां जर्मनीकडे गेल्याचें समजतें. परदेशी हुन्नर देशांत आणण्यासाठीं असेच प्रयत्न झाले पाहिजेत.

नवीन तऱ्हेचा दिवा— बडोदे येथील हायस्कूलांतील ड्रॉइंग मास्तर रा. रा. शंकर सखाराम घोडके यांनीं 'श्री शंकरदीप' नांवाचा विलायती रॉकेलाच्या दिव्या प्रमाणें प्रकाशांत उत्तम, दिसण्यांत सुरेख व विलायती स्क्रू वगैरे बाबतींत अधिक सोपस्कर असा एरंडेल तेलाचा एक नवीन प्रकारचा दिवा तयार केला आहे. तो भिंतीला अडकवितां येतो, टेबलावर ठेवितां येतो व नुसता टांगतांही येतो, ही त्यांत विशेष खुबी आहे. सदरहू गृहस्थ हे या दिव्या बद्दल एक पेटंटही मिळविणार आहेत. रॉकेलचा भयंकरपणा सर्वांना माहित आहेच तेव्हां लोक त्या तेलाच्या दिव्याबद्दल हेच देशी दिवे वापरूं लागतील, अशी आशा आहे.

पारिस येथें एक लावण्याची खाण होती आणि तिला आपल्या रूपाचा मोठा अभिमानही वाटत होता. एकदां तिचे बुचड्यांत रुप्याचा केंस आढळला. तेवढ्या वरून तिला आतां आपलें गालित पिंड झालें असें वाटून तिनें विष खाऊन आत्महत्या केली ! स्वरूपाचा केवढा अभिमान हा.

मेमिर्डः— श्री. स. महाराज यांनीं दोन दक्षणी, दोन गुजराथी व एक पार्शी असे पांच इसम एल. एल. बी. च्या परिक्षेंत पास झालेले, त्यास दरमहा १५० रु० पगारानें अम्लाची तरीके या राज्यांत ठेविण्याचा हुकूम केला असें समजतें.

मुंबईचे नवीन गव्हर्नर ह्यांच्या पत्नी लेडी सॅन्डहर्स्ट ह्या 'फॅशनची' पर्वा न बाळगतां मनास येईल त्या प्रमाणें पेहराव करितात. त्यांची केशकलाप बांधण्याची नेहेमींची तऱ्हाही एकच आहे. त्या पियानो [ पेटी ] वाजविण्यांत मोठ्या पटु आहेत, टेनिस खेळण्यांत मोठ्या प्रवीण आहेत व घोड्यावर बसण्यांतही मोठ्या पटाईत आहेत.

कलकत्ता पोलिसानें लोकांना विषप्रयोग करून ठार मारून त्यांची चीजबस्त लुटणारा हरेन्द्रनाथ मुकरजी नांवाचा एक मनुष्य पकडला आहे. याच्या संबंधाची विशेष चौकशी चालूं आहे. दी. बं.

अमेरिकेंतील इटाली लोकांवर अमेरिकन इंग्लिश लोकांनीं जुलूम चालविण्याची वार्ता उठली आहे.

यंदा कापूस फार पिकल्यामुळें पुढें लागवडच कमी करावी असा विचार अमेरिकेंत चालला आहे.

इराणी आखातांत समुद्र फार खवळला असल्याचें कळतें.

पामीर संबंधानें रशिया व इंग्रज यांच्यातील वांधा मिटला असें कळतें.

नागपूर भोंसले घराण्याशीं इंग्रज सरकारची अन्याय वर्तणूक घडली असल्याबद्दल सर वेडरबर्न हे पार्लमेंटांत तक्रार करणार असल्याचें कळतें. दाद लागली पाहिजे.

जर्मनींत एका गृहस्थानें एक हजार सिगारेटस् विकत घेऊन त्याबद्दल आगीचा विमा उतरला व पुढें आपण त्या विड्या पिऊन विड्या जळून गेल्या बद्दल विमाकंपनीवर फिर्याद लाऊन, सिगारेटसचे पैसे मसूल केले!

सुंदर मुलांचें प्रदर्शन कलकत्ता येथें लौकरच भरणार आहे.

मद्रासची विजेची ट्राम्वे या आठवड्यांत चालू होणार.

राजकोट व जामनगर यामधील रेल्वेचें काम लौकर सुरू होईल.

सिलोन व हिंदुस्थान या दरम्यान तार लावण्याचें काम पुरें झालें.

लाहोर मधील रेलवेच्या १८०० कामदारांनीं संप करून काम बंद पाडल्याचें समजतें.

नाडियादपासून कपडवंजपर्यंत खानगी रेलवे करण्याची तिकडच्या लोकांनीं चळवळ चालविली आहे. पहावें यश कितपत येतें.

चित्रालमध्यें जी बंडाळी उठली आहे ती मोडण्यासाठीं चित्रालचा मेहतर साह्य न होईल तर त्यासही सामना देण्याचा इंग्रजांचा विचार दिसतो. बारा तेरा हजार सैन्य तिकडे तयार होऊन राहिलें आहे.

चित्रालवर आणखी चौदा हजार लष्कर पाठविण्याची जारीनें तयारी चालली आहे. तिकडे थोडीशी झटापटही झाली. नार्थ वेस्टर्न रेलवेवर रावळपिंडी व पेशावर यामधील उतारूंची ये जा बंद करण्यांत आली आहे.

लुटालूट— सोलापूराकडे चालूच आहे. अद्याप बंदोबस्त होत नाहीं. शिवाय खांडव्याकडे हस्तंमपुऱ्यांत तीस हत्यारबंद लोकांनीं येऊन धाड घातली नेमाड जिल्ह्यांत या लोकांची बंडाळी बरीच माजली आहे अटूद गांवापर यांनीं हल्ला केला, तेव्हां तेथील गांवकऱ्यांनीं यांच्याशी सामना केला. पण त्या झटपटींत एक मनुष्य मरण पावला. कित्येक अशा प्रकारच्या बातम्या वरचेवर कानावर येत आहेत. पोलिस मागून निरखानिरख करण्यासाठींच ठेवलें आहे कीं काय? स० वि०

कागदी पायमोजे— निरनिराळ्या रंगाच्या लोकरी तयार करणारे विलायतेंतील जगप्रसिद्ध बर्लिन शहर येथील लोकरीस 'बर्लीन ऊल' असें ह्मणतात. तेथें अलीकडेस कोणी कागदी पायमोजे तयार करण्याची युक्ती शोधून काढली आहे. ज्याच्या पायांस हरहमेश सरदी असते त्याची ती अक्षय्यी नाहीशी होते व पाय गरम होतात. व सरदीच्या मनुष्यानें ते जोड्याबरोबर हरहमेश वापरल्यास त्यांस थंडी मुळींच लागत नाहीं. कागदाचे पायमोजे करते वेळेस त्यांत काय काय जिन्नस मिश्र करतात ते अझून पर्यंत बरोबर समजण्यांत आलें नाहीं.

ब्राह्मण विधवेला केशवपन केल्यापूर्वी दत्तक घेतां येत नाहीं असें ब्रह्मवृंदांनीं पंढरपुरास सभा भरवून ठरविल्याचें समजतें.

मिठावरील कर वाढणार व परदेशांतून येणाऱ्या कांहीं यंत्र सामाना वरील ड्यूटीही वाढणार अशी बोलवा आहे.

न्या० सिं०


## कवाइतीचें पुस्तक

फारचउपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत ( उच्चारासह ) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०१०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनारी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........ ०/४

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०/१/६
दुसरे खेपेस ....... ०/१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as.
Repetition Per line 3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 15 APRIL 1895 NO. 14

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख १५ माहे एप्रील सन १८९५ इ० अंक १४

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कर्डी, लखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

१२०००० वर वि-
कल्या, रोज पुष्कळ
खपत आहेत.



गुण अल्याचे हजारों
दाखले मिळाले आहेत
व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशीशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मूळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुखे निर्विघ्नपणानें निघतात लखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहा वांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लखणास किं रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. ।॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्यांचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असुन आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकास भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हांडवर ( चुका, स्क्रु वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमीशीनें व त्वरित पाठवु एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा मावहि फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे माल मागविणें तो व्हाल्यु पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरिता टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

## कवाइतीचें पुस्तक

फायरउपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत ( उच्चारासह ) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम आमचाय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेलें किमत ०/१०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

## नोटीस

रा. रा. उदेभान कवडाजी पाटील राहणार गोरेगांव तलुके व जिल्हे आकोले यांस नोटीस देणार रायजी मर्द उदेभान पाटील राहणार गोरेगांव तालुके व जिल्हे आकोले नोटीसीनें असें कळविते कीं. तुं माझा लग्नाचा नवरा आहेस मी शाहाणी होऊन अजमासे ९ वर्षे जाहालीं ह्या पाच वर्षांत मजला संसार सुख बापकास जे सर्व प्रकारचे या दुनियेमधील आहे ते तुह्मापासून काही इतके नाहीं. मी शाहणी जाल्यावर अदमासे दोन वर्षे तुमचे जवळ होते परंतु तुमची तबियत नीट न होता मजला व तुह्मास अती त्रास होऊ लागला. ह्मणून मी आपल्या बापाचे घरी असून तीन साडेतीन वर्षे तुमच नावावर कर्ज काढून खाल्लें. आता कर्ज कोणी देत नाहीं व तुह्मी ही माझे पोट पाण्याची तजवीज करीत नाहीं. तुह्मी पोटास घालीत नाहीं व तुमचे पासून संसार सुख मजला मिळण्याचें माइया भाळीं नाहीं असा रंग दिसतो. उपाय नाहीं याजबद्दल आपणास दुसऱ्याकडून कळविलें त्यापैकीं दोन नांव कळविते ती हो कीं रा. रा. देवीसिंग वलद धनसिंग व सोनाजी पाटील राहणार गोरेगांव यास सर्व माहित आहे. तर आता तुह्मास ह्या नोटीशीनें असे कळविले जाते कीं आजपर्यंत खावटी रुपये [१५०] व तुह्मी मजशी संसार कराल अशी खात्री चार जाती भाई पंचाची करून द्यावी मजला उतम रीतीनें वागवून बापकास नवऱ्यापासुन सुख ते देऊन संसार कराल अशी मजला ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत रुपये वगैरे देउन घेऊन जावे, असें जाहले नाहीं तर मी ना इलाज होऊन माझा सर्व जन्म व्यर्थ जाणार ह्मणून मी दुसरा वर ठाव करणार व हीच तुमची सोड चिठी समजून मी दुसरा घर ठाव करीन. हे तुह्मास मी उघड उघड नोटीसीने कळविले ह्मणून दिली नोटीस सही ता. ११ माहे एप्रील सन १८९५ इसवी.

सही.

( सही ) सहीची निशाणी बोगडी
रायजी मर्द उदेभान इच्या
हातची असे.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ६ शके १८१७

## देवो दुर्बल घातकः अथवा जि. आय. पी. कंपनीची मोंगलाई.

आमच्या देशांत रेल्वे सुरू झाल्या नसत्या तर हल्लीं आहे यापेक्षांही उद्योग धंद्या संबधानें किती महगीता झाली असती याचें नुसते कल्पनेनें देखील अनुमान काढू गेलें असतां अंगावर शहारे आल्याशिवाय रहात नाहींत. अल्पस्वल्प ज्ञानानें परंतु सतत श्रमानें, नेटानें प्रामाणिकपणानें आणि धिम्मेपणानें कार्यैकदृष्टी ठेवल्या शिवाय रेल्वेकडील जबाबदारीची आणि कटकटीची नोकरी उरकतच नाहीं. रेल्वे स्टेशनें शहरापासून अगर गांवापासून बरीच दूर असल्यामुळें तेथील नोकराना समाजसुख ह्मणजे काय याची कल्पनाही नसते. आपल्या स्वकीयापासून दूर रहावें लागतें हर प्रसंगीं अडचणीच्या वेळीं अवश्य लागणाऱ्या वस्तु न मिळाल्यामूळें फाजील हाल आणि गैर सोय सोसावी लागते. अमानुष अधिकाऱ्यांच्या गालिदानास शिरस्त्राण करावें लागतें. व इतके हाल सोसून शरीराचा जाग्रणादि व अनियमित काळच्या अशनादि व्यापारांनीं माती करून घ्यावी लागते. एवढे कशा करितां तर उदरकूप भरण्या करितां. बरें, लहानपणापासूनच रेल्वेची नोकरी केली नाहीं तर तिला अत्यावश्य लागणारे श्रमसाहिष्णुत्वादि गुण वार्धक्यस्थितींत संपादन होत नाहींत. या साठीं ज्याप्रमाणें इतर धंद्यांत शिरणारांना पूर्तीपासून एका धोरणावर टपून बसावें लागतें त्याप्रमाणेंच या नोकरांचिही स्थिति असते. अशा प्रकारच्या नोकरांवर त्यांच्या अधिकारी वर्गाचा लोभ असेल तर तेवढाच काय तो उत्तेजनमूलक. यांच्या पगाराच्या बढतीचें मान अतिमंद व सूक्ष्म असतें. तरी हे आपले दिवस ढकलीत असतात.

पर राज्यांतील भांडवलावर एखाद्या दूरस्थ राष्ट्रात एखादा धंदा सुरू झाला असतां जे फायदे आणि तोटे आहेत त्यांचा विचार करण्याची आज आपणास अवश्यकता नाहीं. आज आपणास रेल्वे कंपनीनें सद्यः सुरू केलेल्या मोंगलाईबद्दल आणि तिच्या न्यायान्यायत्वाबद्दल विचार करणे आहे. सबब मुख्य विषयाकडे वळूं.

जि. आय. पी. रेल्वमध्यें दिवसेंदिवस

खर्च अधिक होत असून प्राप्ती कमी होत चालली आहे, असें डायरेक्टर लोकांस आढळून आलें आहे. ही गोष्ट प्रथमतःच मोठी संशययुक्त आहे. तरी भोंवतालच्या दुसऱ्या शाखांची चढाओढ व दुसरे कमी अदूर मार्ग लक्षांत आणले असतां कंपनीला जी नफ्याची हाव आहे तितका नफा होत नाहीं असें ग्रहीत धरणें भाग आहे. तेव्हां अर्थांतच वेतनाचा भाग कमी करून नफ्याचा हिस्सा वाढविणेंही जरूरच आहे. याप्रमाणें डायरेक्टरांकडून येथील अधिकारी वर्गास चाबूक मिळाल्यावर गौरवर्णी अधिकाऱ्यांनीं आपापसांत सल्लामसलत सुरूं केली. व खर्चाच्या काटकसरीचे अनेक उपाय योजून अखेर ज्या कोणाला कसलाही आधार नाहीं अशा बापड्या काळ्या नोकरांवर बालंट आणलें. कोणते लोक कमी केले असतां कंपनीचें काम सुरळीत चालून खर्च कमी होईल याचा विचारच झाला नाहीं. कोठें सिग्नलर्स, कोठें पाइंटस्मन्, कोठें गेटकीपर्स असे हलक्या पगाराचे नोकर कमी करण्यांत आले आहेत. अशांनाच नवरीची रजा देण्यांत आली आहे. ह्मणजे कधींही कोणाच्या अध्यामध्यांत न पडणारे व सालस नोकर दूर होत आहेत. असे वीस पंचवीस कमी करावें ह्मणजे एका मोठ्या अंमलदारास कमी केला असतां जी बचत निघेल तेवढी निघाल्यास निघेल. कमी झालेल्या नोकरांचें काम पूर्वींच्याच कामानें अति रिक्त लादलें गेलेल्या नोकरांवर बसणार हें उघड आहे. आपलें काम जापण योग्य बजावलें असतां आपल्या नोकरीस कधींही धक्का पोहोचणार नाहीं अशी ज्यांची समज होती व या समजावर ज्यांनीं दुसरे उद्योगधंदे केले नाहीत, ऋणादि व्यवहार केले आहेत. अशांना त्यांचा अपराध नसतां कामावरून दूर करणें व अन्नान्न करीत हिंडविणें म्हणजे घोर अन्याय आहे. असे अन्याय हल्लीं गौरकायस्थांत व आमच्यांत माजत चाललेल्या वैमनस्याचें परिपोषकच होतील हें सांगणें ह्मणजे मोठें गूढविस्फोटन करणें असें नाहीं. अशा करण्यानें खर्चाची फारशी काटकसर होत नसून रेल्वे अधिकारी डायरेक्टर लोकांना लहान मुलांना जशी आपण थुंकीची उडाउडव करून फसवतों तद्वत् फसावेल्याप्रमाणें मात्र आहे. रेल्वेच्या नोकरीचा अगर अधिकारी दुष्ट, खुनशी, विरद्वेषी, आणि शीघ्रकोपी असतां कोणत्याही नोकरीचा राजिनामा मोठा दुरापास्त असतो. तरी देखील रेल्वे कंपनीचा असा ठराव आहे कीं कोणत्या नोकरीस कोणत्याही कारणानें राजिनामा देणें असल्यास त्यानें ती नोकरी सोडण्याच्या पूर्वीं एक महिना तरी अर्ज केलाच पाहिजे. पण आतां रेल्वे अधिकारीच आपल्या नोकरांस क्षणार्धांत कामावरून दूर करीत आहेत. कंपनीची व्यवस्था नीट चालावी, नोकरांत असंतुष्टता होऊं नये, नोकरांना आपले अन्नदाते आपले मायबाप असे वाटावेत ह्मणून जे कंपनीचे मोठ्या पगाराचे आणि खात्रीचे अधिकारी नेमलेले आहेत त्यांच्या हातून हल्लीं मोठा अन्याय होत आहे. ते अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत व निरपराधी, सालस, भोळ्या नोकरांना अन्नान्नदशेस लावून त्यांच्याशीं विश्वासघात करून आपल्या मुरूप यजमानांस लज्जा आणि कालिमा संपादन करून देत आहेत.

सेव्य आणि सेवक ह्यांच्यामध्यें एका प्रकारचा करारच असतो. सेवक एक वेळ करार मोडूं शकेल तर तो तितका दोषी नाहीं परंतु सेव्याची संख्या फार कमी असते. द्रव्यसंचयामुळें ह्यांनीं एक प्रकारचा विशेष जबाबदारीचा बोजा मिळविला असतो. धनार्जनालाच सत्ता आणि अधिकार असें ह्मणतात. जी. आय. पी. रेल्वे कंपनीहि सरकारच्या जिम्मेदारीमुळें अस्तित्वांत आलेली आहे. सबब हा सेव्य वर्ग ह्मणजे जवळ जवळ सरकारा इतकाच पवित्र व विश्वासोपगम्य मानला पाहिजे. या वर्गानें आपली जबाबदारी योग्य रीतीनें बजावली नाहीं तर करार पुरा करण्यास भाग पाडणें राजाधिकारांतले आहेच. हल्लींचे मुंबईचे गवनर लार्ड सान्डहर्स्ट हे जशी लार्ड हारीस साहेब इंग्लंडांत जाऊन मी श्रीमंतापेक्षां गरीबांचा कैवारी होतो सबब लोकादरास प्राप्त झालो नाहीं अशी प्रौढी स्वमुखानेंच मारीत फिरत आहेत तसें नसून कृतीनें अनाथ व गरीब प्रजेचा कैवार घेणारे आहेत अशी निदान उमेद तरी आहे. त्यांच्याच भुतदयेची निकषशिला ही मोंगलाई असावी असें दिसतें. ते स्वस्थ रहाणार नाहींत आणि कंपनीस अंजन देऊन आपला करार पाळण्यास लावतील याबद्दल संशय नाहीं.

कंपनीला खर्चच कमी करणें आहे तर भत्यादि खर्च, रिकाम्या झालेल्या व होत असणाऱ्या टोपीवाल्या तिकिट कलेक्टर आणि इन्स्पेक्टरांच्या जागा, देशी स्टेशनरीचा वगैरे उपयोग इत्यादि शेकडोंशें बाबी काटकसरीचीं खरीं साधनें होतील. किंवा शंभर रुपये पगारावरील नोकरांवर शेंकडा कांहीं कर बसविला असतां तो कमी अनर्थमूलक होईल परंतु हाल्लींची मोंगलाई ह्मणजे दुर्बलाला घातक आणि रेल्वेच्याही पलीकडील अधिकाऱ्यास उद्वेजक आहे.

---

## देशसेवक आणि आमचे सन्माननिय राव बहादूर जठार

देशसेवक वर्तमान पत्र सुरू होऊन अवघी तीन वर्षे पुरीं झाली नसतील तोंच तें पत्र आपल्या विचारगांभिर्यानें व आपल्या चालकाच्या श्रतपूर्व लौकिकानें उत्तम प्रकारें लोकादरास पत्र झालें आहे. त्यांतील व्यक्ति विषयक लेखही नेहेमीं निःपक्षपातानें लिहिलेले असतात ह्मणूनच त्या पत्रांत गत सप्ताकीं राव बहादूरांबद्दल जो अनुदार लेख आला आहे, त्याबद्दल आम्हास फार दिलगिरी वाटते.

राव बहादूर जटार अधिकारावर असताना त्यांचें वर्तन इतकें सरळ निःपक्षपातीचें व प्रत्येकास त्यांची इतकी धन्यताच वाटेल असें होतें कीं क्वचित् प्रसंगींच काय तो त्यांच्या नेहेमीच्या ठराविक आणि सदैव अनुलंघित मार्गांत आमच्या दृष्टीनें त्यांचे कडून जरा विसंगता झाली. याचीं कारणें ही आमच्यापेक्षां त्यांस चांगलींच अवगत असतील अशा एक दोन प्रसंगा खेरीज त्यांच्या वर्तनांत कोठेंही विसंगता दिसलीच नाहीं. व ही विसंगतता खरीच दोषार्ह असली तरी ही ती "सागरीं ढेंकूळ" या न्यायाची आहे.

ज्या कोणास राव बहादुरांची असाधारण आणि तीव्र बुद्धि, त्यांची विशुद्ध खलजनानीं अदूषित केलेली स्थिर विचारबुद्धि, त्यांचें प्रसंगावधान, त्यांचें प्रत्येक गोष्टीतील अनाभिव्यक्त लक्षही सदोदित असले तरी सन्मार्गच दाखवितील आणि बोधच करतील. राव बहादुराच्या मनाची समतोलता केव्हां ही व कोणत्या ही प्रसंगीं ढासळलेली नाहीं.

असा कोणताही गुण नाहीं कीं तो लोकांनीं निंदिला नाहीं. सावधगिरीस आणि दक्षतेस लोक भित्रेपणा ह्मणतात. औदार्यास उधळेपणाची संज्ञा मिळते. शौर्यास क्रुरतेची जागा मिळते. राव बहादूर नाना मोरोजी सारख्या गाजलेल्या अधिकाऱ्यांची टेंपल शाहींत कशी राळ झाली वगैरे विचार मनांत आले ह्मणजे राव बहादुरांनीं नेटिवांस कवडीमोल आणि नादान ठरविण्या करितां कुश घेऊन बसलेल्या परकीय अधिकाऱ्यांच्या दोषविस्फोटनास यत्किंचितूही स्थल न देतां ज्यांच्या भवितव्यतेचे ते सूत्रधार होते त्यांची धन्यता व त्यांचे पितृप्रेमच संपादून राव बहादूर या प्रांताचा निरोप घेऊन गेले. या त्यांच्या अलौकिक गुणाबद्दल त्यांचें कोणताही विचारी पुरुष अभिनंदन करून त्यांस उत्कृष्ट प्रतीच्या मुत्सद्यांत घातल्या शिवाय राहणार नाहीं अशी आमची पुरी खात्री आहे, राव बहादुरांनीं आपल्या हाता खालच्या नोकरांत जी महार्हता मिळविली. त्यांचे अपत्यनिर्विशेष पालन केलें, त्या बद्दल नेहेमी अभिमान, कळकळ, व आस्था बाळगली, त्यांच्या गुणदोषांचें यथाज्ञान करून घेऊन त्यांच्याशी निःपक्षपातानें वर्तन केलें इत्यादि सर्व गुण त्यांची लोककार्यनिपुणताच अभिव्यक्त करितात.

लोकांचे व विशेषतः देशसेवकाचे राव बहादुरांवर मोठे दोष म्हणजे वऱ्हाडांतील वयाची इयत्ता ठरविणारें सरक्युलर आणि पुत्राधिकारार्जन. सरक्युलरासंबंधानें आमच्या येथील दोन बंधूंनीं इतका उहापोह केला आहे कीं रावबहादुर जठार याची योग्यता अधिकच थोर ठरेल अशी आमची खात्री आहे. पुत्राधिकारार्जना बद्दल पाहूं गेलें असतां त्यांच्या चिरंजिवाची इन्टरमिजिएट परीक्षा पास झालेली असून बि. ए. च्या टर्मच्या दोन वर्षांपैकींच्या पाउणे दोन वर्षांचें त्याचें अध्ययन झालें आहे. मात्र पदवी घेण्याचा आणि तिलकशेष भाग शिलक राहिला. प्रिन्सिपाल सल्वीची वाईज्पास ऐकून माहित असेल त्यांनी सहज खात्री होईल कीं राव बहादुरांच्या चिरंजीवांचें सर्व अध्ययन पूरें झालें होतें मात्र परीक्षाभाग अवशिष्ट होता. शिवाय आमच्या इकडल्या रेव्हिन्यु खात्यांत ज्या विद्वत्तेचे लोक आहेत त्यांत राव बहादूर यांच्या चिरंजीवाचा नंबर दुसरा लागेल या दृष्टीनें त्यांनीं विद्वानाची त्या खात्यास जोड करून दिली याबद्दल राव बहादुरांचे उपकारच मानले पाहिजेत.

देशसेवक कर्ते ह्मणतात कीं राव बहादुरांच्या हाता खालचे शें पन्नास रुपये मिळविणारे मास्तर कांग्रेसला गेले असतां त्यास बजन आलें नसतें. वा ! खूप विचार ! असें जर खरें आहे तर त्या बद्दल देशसेवक कर्त्यांस इतका विषाद तरी कशा करितां वाटावा ? पुन्हा राव बहादूर व पुसाहेब पटवर्धन यांची आणि रा. व. जठार यांचा एकत्र प्रवचछेदें करून निर्देश करणें ह्मणजे देशसेवककर्त्यांना दृष्टिरोग झाला असून त्यांनीं खद्योत व भास्कर यांचा एकता करण्यासारखें आहे. परंतु व्यक्तिवादांत शिरण्याचें आह्मास कारण नाहीं; राव बहादूर यांच्या विद्वत्संबंधानेंही देशसेवकानें किती अनुदार उद्गार काढले आहेत हें ज्यांना राव बहादूरांच्या सह्राध्यायाची, मार्मिकतेची, गुणांची, त्यांच्या हरएक बाबतीची माहिती आहे त्यांस सहज कळून येण्यासारखें आहे.

अशा दोषमूलक लेखांनीं लेखकांस कमीपणा येतो. त्यांत देशसेवका सारख्या पत्रांत असा लेख आला याबद्दल फार फार वाईट वाटतें. व ह्मणूनच आह्मी त्या लेखावर हा लेख लिहिला; नाहीं तर आह्मास हा लेख लिहिण्याची स्फूर्ति कधींच झाली नसती. अनुदार व असमंजसपणाचीं विशषणें ज्या व्यक्तीस उद्देशून असतात तीं तिचा थोरपणाच वाढवितात.

सारांश, राव बहादूर जठार यांच्या सारखा बुद्धिमान, विचारी, निःपक्षपाती, समयसूचक, कार्यैकदृष्टी, बहुश्रुत, आणि मनुष्यस्वभावज्ञ गृहस्थ हिंदुस्थानच्या सद्यःस्थितींत आढळणें फारच कठीण आहे व त्यांचीं निवड करणें ह्मणजे मध्यभागानें आपला गुणग्राही स्वभाव लोकांत वाखाणून घेणें आहे. व आमची पुरी खात्री आहे कीं बुद्धिमत्तेंत पुढें सरसावलेल्या मुंबई इलाख्यांतील मुख्य भाग अशा सद्गृहस्थाच्या सेवेचा सहज लाभ व्यर्थ जाऊ देणार नाहीं.

---

कलकत्याची कायदे कौंसिलाची बैठक बरखास्त झाली आणि नामदार फेरोजशहा मेथा हे परवा मुंबईस येऊं लागले तेव्हां कलकत्यास व मुंबईस त्यांचा लोकांनीं बहुमान केला आणि विजयी योद्धा स्वगृहीं परत येतांना जसा त्यांचा सर्वत्र जयजयकार व धन्यवाद होतो त्या प्रमाणें नामदार मेथा यांचें स्वागत लोक मोठ्या उत्साहानें करीत आहेत. या श्रेष्ठ, विद्वन्मणि व मुत्सद्दी गृहस्थांनीं व त्यांच्या बरोबरीच्या लोकनियुक्त सभासदांनीं गेल्या बैठकीस मोठी अप्रतिम व अमोल्य लोकसेवा केली आहे अणि त्यांच्या सन्मान्य कृतीनें कायदे कौंसिलाला निराळीच कार्यदिशा लागली. हिंदुस्थानची राजकीय नौका नामदार मेथा सारख्यांच्या परिश्रमानें, सरकारच्या एकतर्फी बाजूला सोडून लोक कल्याणाच्या बाजूला वळत चालली आहे.

कायदे कौंसिलांच्या सुधारणेनें आपल्या राजकीय इतिहासांत एका निराळ्याच सर्गास प्रारंभ झाला आहे. नामदार दादाभाई यांनीं जो नवा राजधर्म शिकविला त्याच योगानें ब्रिटिश राष्ट्राचा हा देश एक भाग असून आपण सर्वजन एका राष्ट्राचे ब्रिटिश प्रजाजन आहों असें सर्वत्र स्पष्टपणें कळून चुकलें. हल्लीं या राजधर्मानें एक विलक्षण संमिलन व एकीकरण सुरूं आहे. नामदार फेरोजशा मेथा यांनीं गेल्या मंगळवारीं एका बड्या मेजवानीच्या वेळीं कळविलें कीं इंडिया हें एक राष्ट्र नाहीं असें ह्मणतात, तें वस्तुतः खोटें आहे, इंडियाच्या एकराष्ट्रीयत्वाची प्रचिती आह्मास पदोंपदीं येते., ते ह्मणाले कीं

कायदे कौंसिलांत आह्मी निरनिराळ्या इला ख्यातून जातों तथापि आह्मी सर्वजण एकत्र-पणाच्या विचारानें असतो; आणि कायदे कौं सिलांत आमचा विजय किंवा पाडाव झाला ह्मणजे सर्व राष्ट्र विजयी किंवा पराभूत झालें असें वाटतें. एका राष्ट्रीय विचारानें आह्मी संलग्न असतो आणि त्याच विचारांची स्फुर्ती सर्व लोकांच्या हृदयांत होत असतें हें पोलीस बिलासारख्या वादग्रस्त विषयवरील विवेचना वरून सर्वांच्या ध्यानांत येईल पण दुःखाची गोष्ट अशी कीं, आंग्लो इंडियन अधिकारी मात्र या एक राष्ट्रीय विचारास प्रतिकूळ असतात. त्यांच्या कृतीवर टीका केली ह्मणजे ते अनावर व उत्सृंखल होऊन अद्वातद्वा बोलतात. त्यांच्या कारभाराची चिकित्सा व परीक्षण त्यांस सहन करवत नाहीं. त्यांस स्वकीय गुणानुवादा शिवाय कोणताच वाद आवडत नाहीं. इंग्लिश अधिकारी व इंडियन लोक हे सारखेच ब्रिटिश प्रजाजन असून उभयतांस एकाच राजधर्मानें संरक्षित केलें आहे हें ते आंग्लो-इंडियन अधिकारी विसरतात. त्यांच्या मनांत द्विधाभाव अद्याप प्रज्वलित आहे आणि तो इतका सतेज आहे कीं वेळ पडली ह्मणजे ते सर डेव्हीड बारबर, व सर आकलंड कालव्हिन सारख्या फडणिसांसही नांवें ठेवण्यास मागें सरत नाहींत. मेसर्स वेस्टलांड, इलियट व ब्राकनबरी यांचीं कौंसिलांतील भाषणें या गोष्टीची चांगली साक्ष देतील. सारांश, नवा राजधर्म लोक मोठ्या आदरबुद्धीनें व उत्साहानें पाळूं लागले आहेत आणि त्यांच्या मध्यें एक राष्ट्रीयत्वाचा अंकूर चांगला फैलावत चालला आहे. नुसत्या धर्मप्रकरणा पुरते हिंदु, मुसलमान, पार्शी, वगैरे भेदाभेद आहेत परंतु राजकीय दृष्ट्या सर्व इंडियन एकच असून इंग्लिश लोका बरोबर हक्कदारानें व राजनिष्ठेनें ते ब्रिटिश प्रजा या संज्ञे खालीं सारखे मोडतात.

---

'राष्ट्रभक्त' नांवाचें मासिक पुस्तक चालूं साला पासून निघूं लागलें आहे. राष्ट्रीय सभेचें जसें 'इंडिया' हें इंग्रजी मासिक पुस्तक विलायतेस निघतें तसें राष्ट्रीय सभेचा इतिवृतान्त कळविणारें हें मराठी पुस्तक आहे. सातारा व सोलापूर येथील कांग्रेस कमिटीच्या आश्रयाखालीं फक्त मराठीच भाषा जाणणाऱ्या प्रचंड जनसमूहाच्या माहिती साठीं हा मासिक पुस्तकाचा स्तुत्य उद्योग आरंभिला आहे. पाहिले तीन अंक आमच्या वाचण्यांत आले. भाषा फार रसाळ व गोड आहे. विषयाची परिस्फुटता अगदीं सुगम असते. मधून मधून उत्तम पद्यसंग्रहही केलेला आहे. सर्व लेखांचा मूळ विषय या राष्ट्रांतील राजकीय चळवळ हा आहे आणि ती इत्थंभूत मराठी वाचकांच्या डोळ्या समोर ठेवावी असा श्लाघ्य प्रयत्न आहे. टळक टळक राष्ट्रभक्तांचीं प्रेमळ चरित्रें, उत्तम इंग्रजी लेखाचीं सोपीं भाषांतरें व प्रासादिक राजकीय काव्यें हीं पाहिल्या तीन अंकांत फार सुरेख साधलीं आहेत. वर्षाची वर्गणी दीड रुपया आहे. सांप्रतच्या स्वरूपावरून हें मासिक पुस्तक लोकांच्या आदरास व आश्रयास पात्र आहे. हें कळवून आह्मी त्याच्या संपादकास चांगलें यश प्राप्त होवो असें इच्छितों.

# The Berar Samachar

MONDAY APRIL, 15, 1895

The Government of India have at last expressed their views upon the report of the Leprosy Commissioners. The Commission was appointed to inquire into the nature, extent and origin of leprosy and to consider and suggest measures to protect the general public from being in any way troubled in their physique or sentiment. The Commissioners unanimously reported their opinions on the above points in the following way:—

"(1) Leprosy is a disease *sui generis*; it is not a form of syphilis or tuberculosis, but has striking ætiological analogies with the latter; (2) leprosy is not diffused by heriditary transmission, and for this reason, as well as because the large extent of sterility among lepers, the disease has a natural tendency to die out; (3) though in a scientific classification of diseases leprosy must be regarded as contagious and also inoculable, yet the extent to which it is propagated by these means is exceedingly small; (4) leprosy is not directly originated by the use of any particular article of food, nor by any climatic or telluric conditions, nor by insanitary surrroundings; neither does it peculiarly affect any race or caste; (5) leprosy is indirectly influenced by insanitary surroundings, such as poverty, bad food, or deficient drainage or ventilation, for these by causing a predisposition increase the susceptibility of the individual to the disease; and (6) leprosy in the great majority of cases originates *de novo*, that is, from a sequence or concurrence of causes and conditions, dealt with in the report, which are related to each other in ways at present imperfectly known."

Leprosy is, in their view only to be feared when it reaches the stage of ulceration. It is harmless and non-contagious in all its minor forms; and hence compulsory segregation is quite uncalled-for. Voluntary segregation should be encouraged and no evil would result by allowing marriages among lepers.

The Commissioners have recommended that lepers should be prohibited from having any direct connection with articles of food, and drink and clothing. The Governor General in Council fully concurs in this view although the recommendation cannot be supported by the Commissioner's finding upon the character of leprosy as non-contagious. The suggestion needs to be given effect to by there being some danger of septic poisoning from any running sore or ulcer. In considering whether this prohibition should be confined to Municipal areas or made of general application, the Government have decided that it should be 'put in force' only in the Municipalites.

The second recommendation relates to the abolition of the prevalent custom of mendicant lepers to leave their homes and crowd the large centers of population. It met with the approval of the Government of India who have in return expressed a wish that measures should be taken to prevent mendicant lepers from obtruding their deformities on the public gaze. The third recommendation is regarding erection of asylums in the vicinity of towns where they do not already exist. The Government though lending its support, is cautious in suggesting that the costs of building should be proportionately divided between the Municipalities and the local boards. The Commissioners lastly recommend that before action under Municipal bylaws is taken medical authority should be consulted.

The Commissioners have done their work and in no distant future bills will be introduced in the several legislative [illegible]ouncils to give to their suggesti[illegible] their proper effects. The in[illegible]tigation has resulted in eliciting [illegible] non-contagious nature of lep[illegible] to the satisfaction of many [illegible]pulous mind. The sight an[illegible] would not now be much abhorre[illegible] as was once the case with respect to these poor and helpless beings. The public sympathy would be roused and the lepers will once more feel that they are not altogether discarded and disowned by the rest of the humanity. The Government would confer a great boon upon them if they were allowed to form their colonies and to cultivate farms allotted to their separate use. Life then would instead of being purely a burden, have its miseries and pains mitigated to a certain extent and hold forth a ray of joy and hope to this disfavoured and humiliated class.

## वऱ्हाड

हवामान—उष्णतेचें मान १०३ अंशावर आहे. पण प्रातःकाळीं थोडी थंडी पडते व वारा मधून मधून बरा सुटतो. गांवांत दुखणीं बरींच जोरावर आहेत.

लेफटनंट मारिस असि० कमिशनर यांची वाशिमहून बुलढाण्यास बदली झाल्यामुळें मि० मीर अनवर अली तहशिलदार, अकोला यांस आफि० एक्टा असि० कमिशवर नेमून वाशिमास बढतीवर पाठविलें.

आणि येथील तहशिलदारीवर रा. रा. दामोदर नानाजी शिंदे क्लार्क आफ कोर्ट यांस, त्यांच्या क्लार्क आफ कोर्टच्या जागीं रा. रा. पुरुषोत्तम व्यंकटेश डेपुटी क्लार्क यांस व त्यांच्या डेपुटी क्लार्कच्या जागीं रा. रा. लक्ष्मण गोविंद ओक यांस बढती देण्यांत आली हें कळविण्यास संतोष वाटतो.

कर्नल स्पान्स्की कमिशनर साहेब यांची स्वारी चिखलदऱ्यास गेली आहे.

उद्यापासून आकोल्यास सेशन सुरू होईल. एकंदर पांच खटले आहेत. रा. रा. विश्वनाथ नारायण दाढेकर व बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए. हे पब्लिक प्रासिक्युटर असल्यामुळें त्यांच्याकडे सोपविलेल्या खटल्यांच्या तारखांस त्यांच्या कोडतांचीं कामें तहकूब राहतील.

---

नोटीस

क्लास ७ कि० मु० नंबर ९

९९

सि० प्रो० कोड कलम ३४४ प्रमाणें.

विद्यमान बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए, इक्स्ट्राअसिस्टेन्सी कोर्टाचे जज्ज ता० अकोलें.

जमाल सुमाल कच्छी वस्ती तेल्हारा तालुके अकोट — वादी

सेख मुनीर वल्लद हमजाभाई वस्ती बेलखेड ता० अकोट — प्रतिवादी

दावा रुपये ९९९८।१०६

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं प्रतिवादी सेख मुनीर वल्लद हमज्या भाई वस्ती बेलखेड ता० अकोट यानें सि० प्रो० कोड कलम ३४४ प्रमाणें नादारींत अर्ज दाखल केला आहे त्याची चौकशीची तारीख २६।४।९५ इ० रोजीं नेमली आहे करितां ज्या कोणास नादारा विरुद्ध आपली तकरार सांगणें असेल त्याणी वर लिहिलेले तारखेस आमचे कोर्टांत सकाळीं १० वाजतां हजर व्हावें कळावें. १३।४।९५ इ०

B. B. Sule
Judge
B. Court
Akola District.

---

नोटीस.

नोटीस बेशमी विश्वंभर नीळकंठ मुखत्यार सारना बाई देशपांडे दर्यापूर यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं यापूर्वीं ह्मणजे तारीख १२ ज्यानेवारी सन १८९५ इसवी रोजीं तुह्मास हिशोबा संबंधानें मुदत तारीख ३०-१-९५ इसवी पावेतों मुदत दिली त्या मुदतींत तुह्मी हिशोब दिला नाहीं व हिशोब देतो देतो असें तुह्मी ह्मणतां व त्या नंतर शास्त्रीबुवा यांचे घरीं देतो असें कबूल केलें परंतु अद्याप पावेतों दिला नाहीं करितां या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी हिशोब ता० ३०-१-९१ पसून ह्मणजे गणपतराव मेले तारखे पासून आज पावेतों एकंदर हिशोब आठ दिवसाचे आत तुह्मी आह्मास समजून द्यावा. न दिल्यास आह्मी दिवाणी कोर्टांत फिर्याद करून कोर्ट मार्फत हिशोब घेऊं. याजबद्दलचा जबाब तुह्मी आह्मास रजिष्टर मार्फत द्यावा कळावें तारीख १२ माहे एप्रिल सन १८९५ इसवी.

त्रिंबक गणेश आज्ञान पालन करणार
मातोश्री चंद्रभागाबाई जवजे
गणपतराव देशपांडे तर्फे मु०
वामन खंडेराव.

---

## वर्तमानसार.

महाभारत ग्रंथाची अशी आख्यायिका सांगतात कीं हा ग्रंथ कोणाही मनुष्याच्या हातून संपूर्णतेस जात नाहीं. कांहीं तरी विघ्न येऊन ग्रंथाची परिसमाप्ती एकाच्या हातून घडत नाहीं. या आख्यायिकेची एक चमत्कारिक प्रचिती अलिकडे आली. कैलासवासी बाबू प्रताप चंद्रराय हे गृहस्थ महाभारताचें इंग्रजी भाषान्तर-कर्ते या नांवानें सर्वत्र मशहूर आहेत. महाभारताची प्रसिद्धी करून जनाचा फायदा करावा या हेतूनें सदर्हू गृहस्थांनीं निस्सीम भक्तिभावानें व उदार बुद्धीनें आपलें आयुष्य खर्ची घातलें. महाभारताचे ९४ भाग यांनीं इंग्रजींत प्रकाशित केले आणि या महा पुराणग्रंथाचा शेवट करावा असें त्यांच्या मनांत अतिशय होतें परंतु मानवी आयुष्याच्या क्षणभंगुरते प्रमाणें त्यांचा मनोरथ मनातच विरला आणि शेवट होण्यापूर्वीं त्यांचें देहावसान झालें. वरील ग्रंथाच्या समाप्ती साठीं त्यांनीं आपल्या जवळ असलेली इस्टेट अर्पण केली आहे. सारांश, महाभारत ग्रंथ संपूर्णतेस जात नाहीं असें ह्मणतात तें कांहीं खोटेंच ह्मणवत नाहीं।

तुर्कस्थानच्या तव्यांतील आर्मीनिया प्रांतांत ख्रिस्ती लोकांवर जुलुम गुजरल्या बद्दल युरोपांत अतिशय तक्रार चालली असून, त्याबद्दल इंग्लंडनें रशियाशी मिळून दाद लावण्याचा प्रयत्न चालविल्याचें कळतें.

आफ्रिकेंतील नाईल नदीवरील मुलखासंबंधीं इंग्रज व फ्रेंच यांच्यांत लढा पडला आहे.

कालरा, कामरान प्रांतांत उत्पन्न झाला आहे, हिंदुस्थानच्या लोकांनीं संभाळून असावें अशी विकडच्या वकिलाची तार आली आहे.

युरोपांत तेराचा आंकडा अपशकुनी समजतात.

फांशीची शिक्षा झालेल्या मनुष्यास ती याचें वर्षें पर्यंत भुयारांत ठेऊन, त्रासवून त्रासवून मारण्याचा क्रम बेल्जियममध्यें आहे.

कागदाच्या तोफा— आंतून बाहेरून धातूचे पत्रे, तारा वगैरे बसवून, मध्यें कागदाचा रांधा करून, त्याचा धातूच्या ऐवजी उपयोग करून तशा तोफा बनविण्याची नवीन कल्पना निघाली आहे. या तोफा वजनांत हलक्या असल्यामुळें नेण्याआणण्यास सोप्या पडून उपयोगांत रीतिप्रमाणें उत्तम असतात.

वजनावर पकडली— जर्मनींत एकाची स्त्री पळून गेली असतां त्यानें संशय होता त्या स्टेशनावर तार करून पोलीसास कळविलें, कीं '१७० रतल वजनाच्या स्त्रीस कैद करा.' त्या प्रमाणें तेथील पोलिसानें ट्रेनमधील सर्व स्त्रीयांचें वजन करून, १७० रतलच्या स्त्रीस अटकून ठेवून, त्या मनुष्यास तार केली. नंतर त्या स्त्रीचा नवरा येऊन, त्यानें आपल्या स्त्रीस ओळखलें.

खेडा जिल्ह्यांत वरचेवर खून होऊं लागले आहेत. पोलीस काय करते?

मि. मेकानकी जुनागडास बत्तीसे रुपये दरमहाचे सेटलमेंट अंमलदार बनले.

यंदाचा हरिद्वारचा मेळा, दरसालाप्रमाणें पुष्कळ मोठा भरला होता. व यंदा सरकाराकडून त्रासही झाला नाहीं.

मि. जान डा. वोस्टा नांवाच्या प्रख्यात राजकार्य कुशल गृहस्थानें आपला असा अभिप्राय प्रकट केला आहे कीं, हिं. सरकारचा कारभार मन:पूत व ब्रिटिश राज्यास अपायकारक चालविला आहे. खरेंच?

श्री. स. वि.

एका मुरलीच्या नांदावर श्रीकृष्ण भगवंताच्यामागें हजारों गाई आपलीं पाडेंस सोडून धाव घेत असत असें हिंदुधर्मांत वर्णन केलें त्याची ख्रिस्तभक्त पट्टा उडवितात. परंतु ता० २८ मार्चचे ज्ञानोदयांत स्कॉटलंडांत एक गाय आहे तिचें दूध काढीत असतां दूध काढणारानें गाणें गात दोहन केलें तर ती नेहमी पेक्षां अधिक दुध देते असें दर्शवून गाईंना गायनलुब्धता असते असें आश्चर्याचे उद्गार काढले आहेत. श्रीकृष्णक्रीडा ख्रिस्तमंडळी वाचील तर याही पेक्षा गाईचे अनेक चमत्कार त्यांच्या वांचण्यांत येऊन हिंदुधर्म अनादिसिद्ध आहे अशी खात्री होईल व त्यामागें अनेक चमत्कार याहीपेक्षां अधिक दृष्टीस पडतील.

हैद्राबादचे नबाब साहेब मुनिसिपाल चर्तीवर शहरवासी लोकांवर कर बसविण्याच्या विचारांत असून त्यासाठीं अनेक खटपटी चालल्या आहेत. मुंबईहून एक फारशी मुद्दाम या हिकमतीची बाजू थटण्याकरितां नेला. कर बसविण्याचें सोपें आहे पण त्याच्या बदला योग्य हक्क देणें फार कठिण आहे इकडे निजाम साहेबांनीं लक्ष पुरऊन नवीन रीत अमलांत आणावी नाहीं तर आधीच बेबंदी राज्य तशांत दाढीवाले लोकांची वस्ती फार, कदाचित हुल्लड होण्याचा संभव आहे.

म मि.

शरिराचा वर्ण सुधारण्याकडे विजेचा उपयोग [illegible] लागण्याची नवीन पद्धत निघाली आ

काटकसर -कोर्टांत बेन्चिफांच्या जागा कमी करून काटकसर करण्याचा सरकारचा विचार आहे.

लेण्यांत मद्य -प्यारीस येथील खाणावळवाले लोण्यामध्यें मद्याचें मिश्रण करीत असतात. त्या योगानें कसलेंही वाइट लोणी असलें तरी खपलें जातें आणि तें रुचकरहीं लागतें.

हिरे--अमेरिकेंत बायकांना हिरे इतके आवडूं लागले आहेत कीं, त्यांचा उपयोग बायकांच्या बुटांवर व मोजांवर होऊं लागला आहे.

लील नामक पदार्थांचे कागद-- स्वीडनमध्यें लील नामक पदार्थांचे कागद करण्याचा कारखाना आहे. हे कागद फारच उत्तम असतात. ते चांगले मजबूत व चिवट असतात, त्यांच्या बोटी तर अगदीं लाकडासारख्या होतात.

मेवाड देशची राजधानी उदयपूर प्रसिद्ध आहे. हार्पर्सम्यागेझइन नामक मासिक पुस्तकांत ह्या शहराला सूर्योदय होण्याचें शहर असें ह्मटलें आहे. हिंदुस्थानांत जो सूर्योदय होता तो ह्या शहरांत पहिल्यानें होऊन नंतर दुसरीकडे होतो अशी ठपाख्या दिली आहे.

एक टन हिऱ्यांची किंमत— एक टन वजनाच्या हिऱ्याची किंमत हल्लीं ११,२०,००,००० रुपये होती.

हल्लीं आगबोट यंत्राच्या साह्यानें वऱ्हांचीं चाकें फिरून पाणी तोडलें जातें परंतु रेल्वे प्रमाणें पाणी तोडण्याचाचूनच गाडी चालावी अशी एक युक्ती फ्रेंच गृहस्थानें काढली आहे. या आगबोटीचा वेग तासांत २० मैलावर होईल ह्मणतात,

ग्यासाची साखर-- दिव्यासाठीं जो ग्यास तयार करितात त्यापासून उत्तम साखर तयार करण्याची युक्ति हल्लीं निघाली आहे.

न्या. सि.

बुद्रवाल येथून एक गुजर नुकताच कुलू येथें आला तो सांगतो कीं थोड्या दिवसांपूर्वी येथें एक मुसलमान मेला असून त्याच्या थडग्यांतुन थोड्या दिवसांपूर्वीं मोठ्या ज्वाला येऊं लागल्या. लोकांनीं त्या ज्वालांवर पाण्याचा मारा केला, पण जसजसें पाणी आंतांत तसतशा ज्वाला अधिक होते. अर्थात धर्मगुरु मौलवी जमले व व्याज घेऊं नका असें ह्मणत असतां जें व्याज घेतलें त्याचा हा परिणाम आहे असें ह्मणूं लागले. कुलू येथें पुरल्या दोघां मुसलमानांच्या थडग्यांचा प्रकारही असाच झाला. हा असा प्रकार पुष्कळ पाऊस पडून कडक उन्हाळा आला ह्मणजे असें होतें असा अनुभव असून तो मूगर्भशास्त्राचा प्रकार आहे, पण तसें नसून हा प्रकार दु:चिन्हसूचक आहे असें या गुजराचें ह्मणणें आहे.

ज्या रेल्वे नोकरांनीं कट करून नोकरी सोडली त्यांच्या मताचें प्रतिपादन करण्याकरितां लाहोर येथें एक वेगळें वर्तमानपत्र निघालें असून तें फुकट वाटण्यांत येत आहे असें सांगतात.

हरिद्वार येथील महावरुणी यात्रा पुरी झाली. सुमारें एक लाख यात्रेकरू होते.

हिंदुस्थानच्या पोलिस खात्यांतील बड्या कामदारास फर्लो रजा देण्याच्या बाबतींत कांहीं नवे नियम होत आहेत.

सरकारी कामदारांनीं कोणत्या एकाद्या कामास वर्गण्या वगैरे जमविण्याचें काम करूं नये असा नायवेस्ट प्रांताच्या सरकारानें पुन: सक्तीचा हुकूम केला आहे. सरकारी अधिकारी वर्गणी जमवूं लागले ह्मणजे त्यांत अधिकाराचा संबंध येतो हें अगदीं खरें आहे.

मालखंड खिंडीत शत्रूंना तटबंदी केली असून तेथें ते सामन्यास येतील असें अनुमान आहे.

काश्मिरी फौजेनें शत्रूवर मारा करून त्यास गप केलें.

स्वाती लोकांनीं मालखंड खिंडींत तळ दिला असून तेथें सामना करण्याचा त्यांचा इरादा दिसतो.

चित्रळच्या किल्ल्यांतून एक हल्ला केला व त्यांत एक इंग्रज कामदार मेला अशी गप आहे.

पुष्कळ मुल्ला लोकांसह सुमारें १०,००० लोकांची एक टोळी मालकंद खिंड रोखून बसली आहे. आमच्या फौजेनें त्यांच्यावर हल्ला केला व त्यास हाकलेंलें. त्यांनीं आपल्या कडून फार मर्दुमकीनें सामना केला.

आमच्या फौजेपैकीं मेले व जखमी मिळून ४०।५० लोक जाया झाले.

क्या. मेकफर्लन, क्या. बेंन, ले. हेराकट, ले. ओमानि हे थोडे जखमी झाले.

आमच्या फौजेनें त्यांचें ठाणें काबीज केलें.

इंग्रजी फौजेचें नुकसान जास्त झालें. ले. कोक फार घायाळ झाले. ले. वाट थोडे घायळ, मे. टोनचा थोडे, क्या. नुजंट थोडे क्या. पंगहसबंड याचा वाहा मेला. या प्रमाणें अफीसरांची जास्त संख्या असून फौजेपैकीं स्काटिश बाहेर पल्टनींतील ८ मेले व १० जखमी झाले, गाईड हेलडर ५ मेले १० घायाळ. ४ थी शिक ९ मेले ३ घायाळ; न. १ तोफखाना १ घायाळ; किंग रॉयल ४ मेले पांच घायाळ. जखमी आफीसर बरे आहेत शत्रूचे प्रमुख असे पुष्कळ मुल्ला मेले.

ले. एडवर्ड व फोलर हे उमराखानानें कैद केले व उमरा हा चित्रळ सोडून बाजोर येथें गेला असें सांगतात.

महमद शरीफखान २,००० फौजेसह सज्ज आहे.

पामीरची बरीच हद्द रशियानें इंग्लंडास दिली. या वरून इंग्रजांशी मित्रत्वानें वागण्याचा रशियाचा इरादा आहे असें होतें.

हिंदुस्थानसरकारास कबूलच्या अमिराचें पत्र एप्रीलच्या आरंभीं येणार व अमीर या वर्षीं विलायतस मोठ्या थाटानें जाणार आणि युरोपांतलीं इतर प्रसिद्ध ठिकाणेंही पाहून येणार असें पिनसाहेबाचें सांगणें आहे.

पामीरच्या संबंधानें इंग्लंड व रशिया यांच्या दरम्यान एक करार झाला व त्याची नक्कल लवकरच पार्लमेंटपुढें ठेवण्यांत येईल असें इंग्लंडच्या परराज्य अंडर सेक्रेटरीनें सांगितलें.

ठा. अ.

मि० ग्यांडाल हा एक अमेरिकन मनुष्य आपण दोन वर्षांत पृथ्वीभोंवतीं पायीं चालून न्यूयार्क शहरीं परत येतो, असा पण करून निघाला आहे तो नुकताच जपान चीन मधुन दिल्ली येथें येऊन, अफगाणीस्थानाकडे चालता झाला. तो अफगाणीस्थान, इराण व तुर्कस्थान ह्या देशामधून युरोपांत जाणार. समुद्र लागतो तेथें मात्र तो तारवांतून जातो. बाकी सर्व पायीं चालत आहे. ता० २६ जानेवारी सन १८९६ तारखेस संध्याकाळीं ६ वाजतां त्यानें न्यूयार्क शहरीं दाखल झालें पाहिजे, अशी अट आहे. हा पण जिंकणारास बक्षिस ४०,००० डालर ह्मणजे सुमारें एक लाख रुपयाचें ठेविलें आहे.

✓युरोपियनची दांडगाई— येथील (सोलापूर) कोर्टाचा एक बेलीफ रेल्वे स्टेशनावरील एका पोर्टराला वारंट बजावण्यास गेला असतां असि. स्टेशनमास्तर मि. सी. स्नेलिंक्स यांनीं आपण कोर्ट ओळखित नाहीं ह्मणून वारंट फाडून व बेलिफास बुटाच्या लाथा मारून धक्के देत देत कंपौंडाचे बाहेर हाकून दिलें. साहेबांच्या मदतीला त्याच्याच जातीचे एक तिकिट कलेक्टरही होते. या बद्दल तुमचेवर फौजदारी खटला करण्यास हरकत कां देऊं नये याचें कारण दाखवावें, ह्मणून कोर्टानें नोटिस काढून ती दुसऱ्या एका बेलिफबरोबर बजावण्यास पाठविली असतां त्याचीही पहिल्या प्रमाणेंच अवस्था झाली! पढें काय होतें पहावें.

न्या. सु.


## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मागरा, कांटे रासतांप्रमाणें, आंकडे ठळक चिनीं काचेचें मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ............ ०४

नोटिशीबद्दल.
आंत रु० १
रोजास.... ०१०६
दुसरे खेपेस ........ ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Pelow 10 lines... 2 Rs
Per line over 10... 4 as.
Repetition Per line 3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 22 APRIL 1895 NO. 15

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख २२ माहे एप्रील सन १८९५ इ० अंक १५



ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

## जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कर्डी, लेखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धाशीशी, मस्तक शूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा-गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रह वांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरें झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | वि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईंत फार दिवसांपासून चालू असुन आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कापिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रकम आगाऊ पाठविली पाहिजे ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकिट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.


नोटीस

नोटीस—बेशमी रामगोपाल रायनाथ मारवाडी राहणार शिंगनापूर ता० दर्यापूर जि० इलिचपूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मांस आह्मी आपले दुकानचे कोर्टाचे कामा करितां मुक्त्यारपत्र तारीख १२ माहे आगष्ट सन १८९४ इ. रोजीं करून दिलें होतें परंतु तुह्मी आमचें काम बरोबर करीत नाहीं असें नजरेस आल्यावरून तुमचे मुक्त्यारपत्र ता० ९ माहे डिसेंबर सन १८९४ इ० पासून मुक्त्यारपत्र रद्द करण्यांत आलें आहे तुमचे जवळचे मुक्त्यारपत्र मी पुष्कळ वेळा मागितलें असतां वापस दिलें नाहीं तर या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मांस जें मुक्त्यारपत्र दिलें आहे तें वरील तारखे पासून रद्द केलें आहे सबब तुह्मी आमचे वतीनें कोणतेही प्रकारचे काम करूं नये केल्यास त्याजबद्दल जबाबदार तुह्मी व्हाल कळावें. तारीख १०।४।९५ इ०

दस्तुर गंगाराम बळवंत राहणार शिंगनापूर दस्तुर खुद.

) सही )

संतोकीराम छोटमल मालक छोटमल
संतोकीराम दुकान शिंगनापूर
ता० दर्यापूर जिल्हे
इलिचपूर द. खु.

## सोन्याहून चांगलें

"Better than grander, bettuer than gold
Than ranks or titles a hundred fold."
Alexander Swart.

चित्त स्वास्थ्य, निरुग्णता, सरळश्या भोगांत संतुष्टता,
साऱ्या भूतगणीं ममत्व, सुजनोत्कर्षांत सानंदता
सत्ता श्रेष्ठपदापरीस गुण हे लाखोपटीनें बरे,
सारें वैभव नीच ह्मास तुळितां सोन्याहुनी साजिरें. १
नित्याचे श्रम सारिल्यावर मिळे विश्रांति देहास ती,
निद्रा गाढ गरीब जी अनुभवी, जें चित्त घे जागृति,
अभ्यासांत गढे, पुराण कथनीं जें रम्य तेथें जडे,
हे सारे स्पृहणीय ! तुच्छ गमते सोनेंहि यांच्या पुढें. २
शांति प्रीति वसे, सुमातृ भगिनी कांतादिकीं शोभते,
आतिथ्यादर होतसे, गृह असें भूस्वर्ग जें भासतें,
येवो दुःख वसो दरिद्र असल्या गेहीं परी क्षमती
द्रव्याप्राप्त सुखें, ह्मणूनि बरवें सोन्याहूनी हें किती ! ३

येता संकट काळ प्रीत निववी जी दुःखितात्म्या प्रत,
माथा सावरिती करांबुज क्रमू जातां यमाचा पथ;
होतें क्षीण शरीर, मान गळतो सारी अहंता नळे,
वेळीं ह्या असल्या हरी स्मरण; हें सोन्याहुनी चांगलें ! ४

अकोला.

BEE.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य १३ शके १८१७

चालू सालच्या बजेटावर पुष्कळ भवति न भवति झाली आणि निरनिराळ्या कौंसिलदारांनीं आपापल्या मताप्रमाणें हिंदुस्थानच्या खजिन्याची स्थिति समाधानकारक करण्याविषयीं अनेक उपाय सुचविले. या सूचनामध्यें एक सुचना अगदीं सर्वमान्य होती. तिच्या संबधानें द्विधामत असण्याचें कारण नाहीं. पोस्टखातें व तारायंत्रखातें हीं दोन्ही एकत्र करावीं ह्मणजे बराच खर्च कमी होऊन तारायंत्रें व पोस्ट आफिस याचे तपासणारे अंमलदार एकच असले म्हणजे पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. नामदार जेम्स यांनीं आणखी एक निराळी विनंती केली कीं. पोस्टखात्याचें उत्पन्न यंदा खर्चापेक्षां कांहीं अधिक आहे आणि गेल्या चाळीस वर्षांत हा जमकडील शिलकीचा योग प्रथमच आला आहे तथापि हिंदुस्थान सरकारनें पोस्टखात्याचें उत्पन्न बादशाही खजिन्यांत ओढण्याकडे नजर ठेऊं नये. आणि हल्लीं या देशाची स्थिति नादानीची व भारी निकीरीची आहे व अशा वेळीं सरकार ज्या मार्गानें पैसा गोळा होईल तो शोधण्याच्या तारंबळींत आहेत तेव्हां पोस्ट खात्याची शिलक लांबऊन तूर्तातूर्तची नड भागविण्याची कल्पना सरकारच्या मनांत वारंवार खेळेल ह्मणून मुद्दाम वरील गोष्टीचा बुद्धिपुरस्पर सूचनेच्या रूपानें उल्लेख केला आहे. हा काल पावेतों पोस्टाचें उत्पन्न त्याच खात्याकडे खर्चण्यांत आलें ह्मणून जर्मन राष्ट्रांतल्या अत्युत्तम पोस्टल राज्यकारभारा प्रमाणें पोस्टखातें इंडियांत अगदीं सुयंत्र व सुरळीत झालें आहे. पत्रें पोंचविण्या शिवाय मनी आरडरी, सेव्हींग ब्यांक, व्हाल्यूपेबल पार्सल, आयुष्याचा विमा व कीनायच्या औषधाची विक्री इत्यादि गोष्टी पोस्ट खात्यानें आपल्या ताब्यांत घेतल्या आहेत. तथापि या खात्यांत पुष्कळ

सुधारणा होण्या सारख्या आहेत, आणि मुख्यें करून पार्सलचे दर फार कडक आहेत ते उतरले पाहिजेत. या गोष्टी होण्या साठीं पोस्टाचें उत्पन्न दुसऱ्या कामाकडे लागतां कामा नये. पोष्टकडील दर भारी ठेविले म्हणजे एका प्रकारें लोकांच्या शिक्षणावर कर बसविल्या प्रमाणें आहे या सिद्धान्ताचें प्रत्यंतर माजी प्रोफेसर फासेट पोस्ट मास्तर जनरल, इंग्लंड यांनीं उत्तम प्रकारें लोकदृष्टीस आणून दिलें आहे. पोस्ट खातें हें लोकांच्या सोयी साठींच असून तें काहीं उत्पन्नाची बाब नाहीं. या खात्याची लोकप्रियता जितकी होईल तितकी थोडीच आहे. सर्व प्रकारच्या लोकांस अगदीं गरीब व सोयस्कर असें खातें म्हणजे पोस्ट खातें असलें पाहिजे. तेव्हां या खात्याच्या सुव्यवस्थेकडे सर्व शिल्लक वेंचली जाईल अशी खबरदारी घेतलीच पाहिजे.

सन १८९२ सालीं कायदे कौंसिलाचा आक्ट सुधरला आणि लोकनियुक्त प्रतिनिधीस काहीं नियमित प्रमाणानें सभासद नेमण्याचा ठराव झाला तेव्हां पासून सर्व प्रांतिक व मुख्य गव्हर्नर जनरलच्या कायदे कौंसिलांतून एका प्रकारची चळवळ उडून गेली आणि लोकमत सरकारच्या नजरेस विशेष खुलावटीनें येऊं लागलें. सरकारी अधिकारी वर्गाच्या स्वेच्छाचारी वर्तनास दिवसेंदिवस व्यत्यय येतो, नानाविध गोष्टी पूर्वीं गुप्त राहत होत्या त्या उजेडांत आल्या आणि लोकांच्या कल्पनांच्या गोष्टी उत्तरोत्तर मान्य करण्याचें सरकारला भाग झालें. कायदे पसार होतात तेव्हां देखील वादविवाद तडाख्याचा होतो आणि सरकारी सभासदांस आपलीं कार्यें जपून करावीं लागतात.

वायव्य प्रांताच्या सरकारानें वर्तमानपत्रें वश करून घेण्याची विलक्षण युक्ति लढविली आहे असें आतां उजेडांत येतें. पंजाब पेट्रीयट, अलिगड-ग्याझेट इत्यादि वर्तमानपत्राच्या पुष्कळ प्रती प्रांतिक सरकार विकत घेतें आणि या प्रकारें त्या त्या पत्राचे पोशिंदे बनतें. ३२५ प्रती अलिगड-ग्याझेटच्या सरकार विकत घेतात असें कळतें. हें पत्र प्रसिद्ध राष्ट्रीय सभेचे द्वेष्टे सर सय्यद अहमद यांचे आहे किंवा त्यांचा त्या पत्राच्या द्रव्यार्जनाशी संबंध आहे असें म्हणतात. ही गोष्ट खरीच असल्यास सरकारचा राष्ट्रीय सभेविषयीं त्रयस्थपणा कोणीकडे अस्तास गेला कोण जाणे! राष्ट्रीय सभेच्या द्वेष्ट्यास वर्तमानपत्र द्वारा गुप्त रितीनें मदत देणें म्हणजे पक्षपात होऊन सरकारचें वर्तन दोषास पात्र होत नाहीं काय? वायव्य प्रांताच्या कायदे कौंसिलांत वरील विषयावर सवाल जबाब झाले तेव्हां सर्वजण चकित होऊन गेले. नानाविध लंचांड अलिकडे बाहेर पडूं लागली आहेत!

कोणत्याही गोष्टींची चिकाटी बळकट धरणें हेच यशाच्या मार्गानें अवलंबन होय सिव्हील सरव्हिसची परीक्षा इंग्लंडा प्रमाणें इंडियांत होत जावी म्हणून गेल्या दोन वर्षांत भगिरथ प्रयत्न झाले व ते निरर्थकच झाले म्हणून सर्व राष्ट्र उदासीन व हतवीर्य झालें होतें. पण बहुत आनंदाची गोष्ट कीं त्या प्रश्नाचा पिच्छा नामदार दादाभाई यांनीं बिलकूल सोडला नाहीं आणि त्यांनीं तो प्रश्न पुन्हा काढला आहे ‘फिरून प्रयत्न करून पहा’ हा धडा ते पक्का स्मरतात. आणि हीच जय मिळविण्याची गुरुकिल्ली. आहे परमेश्वर करो आणि त्यांचा यत्न लवकर फलप्रद होवो!

## हिंदुमुसलमानाच्या तंट्या पासून घेण्यासारखा बोध.

सन १८९४ सालभर देशांत परस्पर जातीचा लढा माजला होता. त्या लढ्यामध्यें बरेंच ठिकाणीं हिंदु म्हणूनच आग पाखडली गेली. महा अग्नि पेटून गेल्यावर क्वचित ठिकाणीं जरा खणूं गेले असतां धूर धुमसत असतो तद्वत हे तंटे अद्याप धुमसतच आहेत परंतु मुख्य अग्नि शमून गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. अद्याप ज्या सज्जनांचा आणि निरपराध्यांचा वाईट छळ झाला त्यांच्या छळाची पूर्णता झाली नाहीं. येवल्याचें प्रकरण पूर्णपणें विझलें नाहीं. पुण्यांतील बाद्याच्या नियमाची शहानिशा झाली नाहीं. एखाद्या कमानीवर दडपण घालून तिला दाबांत ठेवावें त्या प्रमाणें हिंदु लोक ठिकठिकाणीं दाबांत ठेवले गेले आहेत. ही गोष्ट खरी आहे तरी पण प्रभासपट्टण, श्रीरंगम, पाटणा मुंबई वगैरे ठिकाणचें रण आणि प्रस्तुतची शांतता मनांत आणल्यावर एकंदर रणाची अखेर झाली असेंच म्हटलें पाहिजे. झाला हा प्रकार कोणासही अभिनंदनीय वाटल्यावांचून राहणार नाहीं तरी पण यावरून काहीं अनुमानें काढल्यास तीं चुकीचीं होणार नाहींत,

मुख्य अनुमान हें कीं इंग्रज सरकारची हिंदु लोकांवर स्वतःच्या मुलांवर जितकी प्रीती असावी तितकीच आहे. त्याच प्रमाणें लोकाधिकारतंत्रनिपुणावर सरकारचा नेहेमी रोष रहाणार परंतु या अनुमानापासून बोध म्हणून इतकाच घ्यावयाचा कीं आपल्या राजकर्त्यांची प्रियता अगर अप्रियता, त्यांचा राग अगर लोभ याजबद्दल जे निस्पृह होऊन आणिबाणीच्या वेळीं लोकांचें बिकारण छळा पासून रक्षण करण्याचा यत्न करतील ते ज्या प्रमाणानें सरकारास त्याज्य वाटतील त्याच्या अंतपटीनें लोकादरास प्राप्त होतील. कैदेची शिक्षा म्हणजे पूर्वीं एका प्रकारचें लांछनच होतें परंतु ज्या प्रमाणें ग्रीक लोकांमध्यें आणि विशेषेंकरून आथेनिअन लोकांमध्यें अस्ट्रेसिझम (हद्दपार करणें) हा बहुमान गणला जात असे त्या प्रमाणें अशा कामीं शिक्षा झाली असतां देशसुधारणा इतकी होत आहे कीं शिक्षा झालेले लोक जनादरास प्राप्त होऊन कविवर बायरनच्या चिलनच्या कैद्यावरील काव्याची सत्यता स्थापन करतात.

दुसरें आणि खऱ्या महत्त्वाचें विधान हें आहे कीं लोकांची धर्मप्रीति अद्याप जागृत आहे. हिंदुस्थानांतील सर्व सामाजिक आणि राजकीय सुधारणाचें अधिष्ठान धर्म होता. मराठेशाहीची स्थापना, बौद्ध आणि यवन धर्मांच्या सक्ती पासून रक्षण इत्यादि अनेक उत्क्रान्तीच्या वेळीं देशाची एकता राखण्यास धर्मच कारणीभूत झाला लोकांचें धर्मप्रेम आणि त्यांची धर्मशक्ति जोंपर्यंत कायम आहेत तों पर्यंतच देशाचें अस्तित्व कायम राहील. कोण याही देशाच्या इतिहासांतरीं जोंपर्यंत देश असंस्कृत आणि मागसलेल्या स्थितींत असतो तों पर्यंत धर्मबंधन इतर सर्व बंधनापेक्षां अधिक प्रबल असतें आणि तेंच त्याच्या अस्तित्वास साधनीभूत होतें. सुधारकांनी धर्मांतील काहीं चाली रीती अगर संस्कार बदलण्याचा यत्न केला म्हणजे त्यांनीं धर्माची रांगोळी केली अगर धर्म बुडविला असें कधींही होत नाहीं आणि झालेंही नाहीं. धर्मा करितां आपल्या प्राणाची आहुती देण्यास तयार झालेल्या ज्ञानेश्वर मुक्तेश्वरादि सुधारकांनीं धर्मास प्रस्तुतचें रूपांतर दिलें आहे ही गोष्ट ग्रॅज्युएटनृपति रा. ब. न्यायमूर्ति रानडे यांनीं गेल्या महिन्यांत सप्रमाण सिद्ध करून दिलेलीच आहे. सर्व महाराष्ट्र कवींनीं श्रुति आणि स्मृति मध्यें बद्ध केलेलें धर्मप्रकरण देशी भाषा मध्यें आणून धर्मज्ञान सर्वांपुढें मांडून ठेविलें. या लहानसान सुधारणा नव्हत. हल्लीं कित्येक सुधारकांच्या नांवानें कोल्हेकुई उठवीत आहेत तिच्यांत फारसें तथ्य नाहीं. परंतु इतकें खरें आहे कीं देशबंधनास आणि त्याच्या एकीकरणास धर्म मुख्य आहे. जों पर्यंत कर्तव्यकर्माची जबाबदारी जनसंघांस कळूं लागली नाहीं तोंपर्यंत धर्मबंधन शिथील न होऊं देण्या करितां समाजाग्रणींनीं झटलें पाहिजे. आता ही गोष्ट निर्विवाद आहे कीं लोकांची धर्मप्रीति अद्याप जागृत आहे. आमच्या मुसलमान बंधूंची धर्मप्रीति इतकी तीव्रतेनें जागृत आहे याबद्दल आम्हांस जितका गौरव वाटतो तितकाच आनंद आमची ही बुद्धि जागृत आहे म्हणून आम्हास होत आहे. गेल्या वर्षीं माजलेलें रण लोकस्वास्थ्य विघातक, व वेडगळपणाचें होतें हें कोणीही कबूल करील. पण त्याच बरोबर हें ही कबूल केलें पाहिजे कीं हिंदु लोकांच्या धर्मप्रीती बद्दल जी वारंवार शंका उत्पन्न होत असे ती केवळ भ्रमाची होती.

तिसरें अनुमान हें कीं, हिंदु लोकांत ऐक्य नाहीं म्हणून जो आरड होत आहे तो [illegible] खरें आहे [illegible] तें ऐक्य [illegible] नाहीं पण [illegible] फार गूढ आहे. त्याप्रमाणें आज पर्यंत जातिभेद हा हिंदु लोकांच्या दुर्बळतेच्या मुख्य कारणांपैकीं गणला जात होता. परंतु जातिभेद हा दुर्बळतेचें मुख्य कारण नाहीं असें ही अनुभवावरून सिद्ध झालें. आहे कारण परवांच्या दंग्या मध्यें हिंदु या नांवालाही मोडणाऱ्या सर्व जाती म्हणजे पुरभय्ये, रांगडे, ब्राह्मण, परभु, सूतार, सोनार कदाचित्, रंगारी वगैरे हरएक जाती एकत्र जमा होऊन सर्वांनीं आपलें ऐक्य केलें. या वेळीं तुमचा जातीभेद कोठें गेला! गेल्या वर्षीं या जातींनीं हें ऐक्य केलें म्हणून ब्राह्मणांत आणि कोणब्यात रोटी व्यवहार अगर बेटी व्यवहार झाला काय! जाती संबंधानें हे सर्व वर्ग पृथक् ते पृथक्च राहिले परंतु जशी स्कोबळ साहेबांच्या संमती वयाच्या बिलानें सर्व हिंदुस्थानभर हिंदूंची आणि मुसलमानांची मिळून चळवळ उडवून दिली तशीच या धामधूमीनें हिंदु पदवाखालीं येणाऱ्या सर्व जातींची एकता करून धांदल उडऊन दिली. अतएव जातिभेद आमच्या दुर्बळतेचें कारण नसून आमची एकता होणें शक्य आहे. ती व्हावी कशी? हा प्रश्न साहाजिक उद्भवतो, याचें उत्तरही सुलभ आहे. व हा विषय आम्ही दुसरे एखादे वेळीं हातीं घेऊं. तुर्त इतकें सांगणें बस्स आहे कीं आमची एकता होणें सर्वथैव शक्य असून जर ती होत नसेल तर तो दोष आमच्या समाजाग्रणींचा आहे. आपल्याबद्दल समाजाचा ग्रह चांगला असणें, आपण जें त्यांस सांगूं तें त्यांच्या हिताचेंच व फायद्याचें असेल अशी त्यांची खात्री करून देणें, व समाजाच्या घटकावयवांतील प्रत्येकाशी जरी आपणास मिसळतां येत नाहीं तरी प्रत्येकावर निरपेक्ष व अव्याज प्रेम हीं ज्या पाशीं असतील तो केव्हांच हजारो जाती असल्या तरी समाजाचें एकीकरण करून ईश्वरापक्षे जसा अग्नी त्या प्रमाणें त्यांस हस्तक करून ठेवील. अशा प्रकारच्या अग्रणीची आणि पुढाऱ्यांची आपणास अवश्यकता आहे. जातिभेदाचें खूळ देश बुडवितें. त्याच्या मुळे देशांत दुही माजली आहे वगैरे आरड पोकळ असून आरड करणारे कुचकामाचे आहेत एवढें खास सिद्ध आहे.

चवथें अनुमान हें कीं प्रसंग पडल्यास आपण एकमेकांमधील द्वेषभाव विसरून यथाशक्ति एकमेकांस सहाय करण्यासारखे आहों असें समाजाच्या सर्व जातीच्या कनिष्ठ प्रकारच्या लोकांनीं जितकें जोरानें सिद्ध करून दाखविलें तितकें वरिष्ठ प्रतीच्या व श्रीमान लोकांनीं दाखविलें नाहीं.

या प्रकारचीं कित्येक अनुमानें निघण्यासारखीं आहेत परंतु मुख्य मुख्य अनुमानांचा आम्ही उल्लेख केला. या तंट्यांचें बीज वेडेपणाचें होतें या पासून देशाची शांतता मोडली. विनाकारण गरिबांचे जीव धोक्यांत पडले. सरकारची झांकली मूठ उघडी पडून त्यांच्या निःपक्षपातीपणाची परीक्षा होऊन रयतेचा विश्वास सरकारावर राहिला नाहीं. या सर्व गोष्टी वाईट झाल्या खऱ्या, पण पांचवें मुख्य अनुमान याच तंट्यांनीं स्थापित केलें तें हें कीं शिवाजीचें व पहिल्या बाजीराव साहेबाच्या मऱ्हाट्यांचेच वंशज हल्लींही मराठे आहेत. त्यांची मर्दुमकी गेली नाहीं. सनातन हिंदु धर्माची होत असणारी दशा पाहून त्यांच्या पूर्वजांना त्वेष आला व ज्याचें रक्त त्यांच्या वंशजांच्या अंगीं खेळत आहे असे लोक अद्याप देशांत आहेत.

---

The Berar Samachar

MONDAY APRIL, 22, 1895

It is a fact to be noted that in the last quarter of the century we have been making some progress towards our political and social regeneration by adopting the ways of our rulers. In educational matters we are amply successful although much remains to be done. The Western nations have been convinced that there is some aptitude among us of imbibing wholesome lessons and putting them to correct use. In our opinion all this prosperity and progress is merely outward and does not in reality improve the heart of the nation. The fountain of

wealth that is agriculture instead of showing any marked progress in point of cultivation or amount of products is on the wane and manifests signs of perceptible deterioration. All our political, social and industrial activities would count for nothing if they are not accompanied with similar growth and developement of our agricultural resources.

The Indian soil ranks very high in respect of quality and if it proves less productive or loses its fertility the blame shall have to be thrown either upon the Government for their inaction or the labouring peasants for their idleness. The condition of the farmer in the present times is really pitiable and some substantial relief in the way of granting remissions in rent is required to be administered to better it.

How the deficit in the revenue thus caused is to be met with this is no proper place to consider. The Government although very anxious from the first about the material prosperity of the nation has totally ignored up to now to impart in abundance agricultural and technical instruction. In this connection the example of the Baroda State is worth following by the other States as well as by the British Government. It has started institutions where students are trained in agriculture. Large plots of lands of various descriptions are attached thereto to facilitate and promote practical teaching. The course of study extends over a period of three years and scholarships are established to enable poor students to benefit by the institutions. This branch has been rendered the more attractive by the State guaranteeing places of good remuneration according to merit to the successful candidates.

In the Bombay Presidency we find agricultural training only in classes, secondarily attached to the High Schools. We do not know how far the services of these people are availed of for purely agricultural purposes.

In Berar the necessity of some such institution has been urged upon, too often but the prayer is as yet barren of any result.

We take this oppurtunity to suggest one more effective mode of developing our [illegible] ...ould in individ[illegible] Works of high magnitude and large complications owe their birth to this principle. If a large area of land be brought and kept under the management and supervision of an efficient body continuously for a number of years, both the land and the investing capitalists are sure to benefit. Individual farmers cannot afford to manure and plough up the land at suitable intervals, owing to the pressing demands of the Government and bankers. Another advantage consists in the distribution of any loss if sustained. Single farmers come to the verge of ruin if the crops fail for a year or two and take years to return to their original status.

Why agriculture is found in its present state is due to its being solely and exclusively confined to the illiterate and low classes of society. It is a habit with ignorant people to move in old grooves and serious attempts shall have to be made before they can be persuaded to leave off their objectionable ways, if any, of cultivation.

Agriculture is at present an empirical and traditional branch of life and some years will pass before it assumes something of a scientific character. To effect this resolution, agriculture must no longer be looked upon as a low kind of occupation intended merely for manual labourers and unworthy of attention of the more gifted in the community. It must be included in the category of honorable professions. The educated classes would do well in devoting their time and energies to the improvement of peasantry.

---

## NEGLECTED WATER—SUPPLY

Last year, we did the pleasant duty of congratulating the local municipality upon the success achieved in the grand and expensive scheme of a water supply. Our popular President Mr. Hare was then the moving angel of the water-works. He was bent heart and soul upon an early introduction of the new well-water. We are even persuaded to remark that the improved sanitation and a strong check over the epidimics are the outcome of his active and energetic exertions. He gave no rest to the engineers of the Public Works Department and got into the town a very healthy water-supply. But it is to be regretted that the works have almost come to a stand still. Many portions of the town are left without water-pipes and without general water stands. The people who have not got water-stands in their mahalas feel most for their grievances and their pain is accentuated by the fact that most of such localities are quarters of poor inhabitants. We hope that Mr. Hare will push on the water-works and give every satisfaction to the masses. We donot know the causes of this extraordinary delay and we think an explanation is due to the public of this sluggish state of affairs.

This is the season when cholera breaks out and it is assigned to the use of the river-water which has now become worse that what it [illegible] ...maxim that prevention is better than cure will remind the proper authorities of their responsible duties in connection with the early circulation of the water supply throughout the town.

We hope that we shall not have to harp on the same unpleasant chord in our next issue.

---

It is a curious piece of English politics that when once a statesman like the Hon'ble Mr. Fowler finds no safe loophole to take shelter therein he is bold and shrewd enough to draw upon the nobler qualities of human nature and to secure a proud stand upon them to trumphet in one strain all the good points of the Parliamentary interest in the Indian Empire. When the Government of India showed to the Secretary of State that [illegible] plausible view will defend the exemption of the English cotton-goods from the custom duties Mr. Fowler yields to the Governor General with good grace and finds material for glory when he asserts that Lancashire cannot govern Indian problems. He remarks:—

"My right hon. friend (Sir Henry James) has said that India has no representative in this House. I deny the accuracy of that allegation. The representatives of India in this House are not one or two individuals, not even the section of members who are thought to be experts on the one hand, or those men who have a profound, a deep, and a special interest in Indian affairs on the other. Every member of this House, whether elected by an English, or by a Scotch, or by an Irish constituency, is a member for India. All the interests of India—personal, political, commercial, financial, and social—are committed to the individual and collective responsibility of the House of Commons. I ask the House to discharge that gigantic trust uninfluenced by any selfish or party feeling, but with wisdom and justice, and generosity."

Where does this high ideal of the British rule go when other Indian questions are discussed in the Parliament?

"Thus 'restraining the use and improving the revenue by the imposition of suitable taxation,' discouraging the consumption by placing restrictions on the cultivation, preparation, and retail, and imposing on their use as high a rate of duty as can be levied without inducing illicit practices,' 'limiting the production and sale by a high rate of duty without placing the drug entirely beyond the reach of those who will insist upon having it' 'restricting consumption as for as practicalbe minimising the evils, and discouraging the use of the drug wherever it is a source of danger to consumers,' have from time to time been the watchwords of the Government in the matter of the hemp drugs, a policy only once definitely abandoned, viz, in the case of Burma, where total prohibition [illegible] introduced in 1873.

---

[illegible] ...ऊस पडत्या [illegible] ...हाटप थंडीही पडते. हवा [illegible] नाहीं. किरकोळ दुखणी जोरावर आहेत.

---

मे. आवर्ड सिव्हिल आणि सेशन जडज यांची स्वारी मे महिन्यांत रजेवर जात आहे.

गेल्या मंगळवार पासून येथें सेशन कोर्ट बसलें आहे. अद्याप महत्वाचे खटलें निकालास लागले नाहींत. वाशिमच्या डाकेच्या मोकदम्यांत रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे वकील असून तो येत्या ३० ता. रविवपर्यंत तहकूब आहे.

---

वाशिमच्या डाक्याची चौकशी चालू असतांना पोलिसांनीं एका आरोपीच्या बायकोपाशीं विचारपूस केली आणि त्यानंतर तिनें लागलीच विहिरींत जीव दिला असें बाहेर आलें आहे. या बाईच्या मरणाची

गोष्ट मोठी बहिमानी व सशयास्पद आहे. खरें परमेश्वरास ठाऊक!

---

अकोल्यास पाण्याचे नळ गुदस्ता आले. पाणी स्वच्छ, गोड, पाचक व गुणकारी आहे पण नळाचा फैलाव पुष्कळ भागांतून अद्याप न झाल्यामुळें लोकांचे फार हाल होतात. या दिरंगाई बद्दल व अन्यायाबद्दल जबाबदार कोण? बंदोबस्त नसल्यामुळें नदीचे पाण्याचा सांठा अगदीं बिघडला आहे तो मुनसिपालिटीनें नीट ठेविल्यास पुष्कळ ठीक पडेल.

---

काल रोजीं येथील लायब्ररीची जनरल सभा भरली होती. लायब्ररीची इमारत दुरुस्त करणें, वाढविणें, आवार घालणें इत्यादि गोष्टींचा विचार होऊन एक सब कमिटी नेमण्यांत आली. लायब्ररींत अलिकडे पुष्कळ जण मन घालून काम करितात असें पाहून रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं परम आनंद प्रदर्शित केला.

---

अलिकडे या जिल्ह्यांत डाक्यांचा पुष्कळ सुळसुळाट झाला आहे. रोज रोज नव्या खबरा ऐकूं येतात. इकडे वरिष्ठांनीं अवश्य लक्ष पोंचवावें.

---

गेल्या गुरुवारीं उमरावती हायस्कुलचे विद्यार्थी मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग करून दाखविणार आहेत.

---

### नोटीस.

रा. नाथीराम वल्लद सदोबा गोरे राहणार मौजे पारडी प्रगणें व तालुके पुसद जिल्हे वाशिम यास खालीं सही करणार बाळाजी वल्लद बाबनाजी पाटील मौजे पारडी प्रगणें व तालुके पुसद याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुम्ही माझेपासून तारीख ९-४-९५ इसवी रोजीं मौजे [illegible] प्रगणें पुसद येथील आमंत्र [illegible] ...मिळकत [illegible] ...स खरेदी घेऊन रकम घरी पारडीत देतो असें वचन दिलें वरून तुझ्या म्हणण्या प्रमाणें नोंदणी अमलदारापुढें कबूल करून दस्तैवज नोंदल्या नंतर करारा प्रमाणें तुजला घरी रुपये पांचशें मागितले असता दिले नाहींत. सबब नोटीसीनें कळविलें जातें कीं, तूं करून घेतलेले दस्तऐवजाचा भरणा रुपये पांचशें ही नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आत मजला अदायी करून माझी पावती घ्यावी नाहींपेक्षां झालेला सदरील दस्तऐवज पोकळ होउन बातल असे. त्या दस्तऐवज वरून काहींएक अमल चालणार नाहीं सबब रुपये मजला देऊन पावती घ्यावी. नाहीं तर तें खरेदीखत पोकळ बातल आहे असें समजावें. तारीख १६ माहे एप्रील सन १८९५

(सही)

बाळाजी बाबनाजी पाटील

---

## वर्तमानसार.

le copy........

चित्रालकडे इंग्रजी लष्कर झपाट्यानें लढाई करून जात आहे व उमरखानाला स्वतःला लौकरच तयार व्हावें लागेल असें दिसतें.

जपान सरकार व चीनचा व्हाइसराय हे तह करण्याच्या विचारांत गुंतले आहेत, पण जपानामधील लढाई करण्यास उत्सुक लोक हा तह जमू नये अशी खटपट करीत आहेत.

इंग्रजांची 'चिकसंग नांवाची आगबोट, जपानच्या लोकांनीं पकडली आहे. ती शैंघाइ येथून निघाली होती हीती बंदुकांची काडतुसें भरलेलीं असल्यामुळें पकडलीं असें कळतें.

चित्रालच्या किल्ल्यांत डा. राबर्टसन यांस स्वाहा झाला या गोष्टीस केटा येथें बळकटी मिळत आहे. खरें काय असेल तें असो!

हिंदुस्थानांतील हायकोर्टास जो स्वतंत्र अधिकार देण्यांत आला आहे तो लौकरच हिरकावून घेण्याचा नव्या कायद्याच्या विचारा करितां स्टेट सेक्रेटरीच्या प्रधान मंडळीची सभा भरणार आहे असें इंडियन डेली न्यूज पत्रावरून कळतें.

नवीन रेल्वेसंबधीं व रेल्वेच्या शाखा खानगी कंपन्यांच्या स्वाधीन करण्यासंबंधी बराच मोकळिकीचा एक नवा कायदा बाहेर पडला आहे. व्यापारी लोकांनीं लक्ष्य द्यावें.

काबूलच्या अमिराला नजर देण्याकरितां जे हत्ती पाठविण्यांत आले आहेत, ते तूर्त पेशावरासच ठेवले असून चित्रालची लढाई संपल्यावर पाठविण्यांत येण्याचा रंग दिसतो. यांतही कांहीं कारस्थान नाहीं ना?

पामीरसंबंधानें रशियाशीं इंग्रजानें जो तह केला आहे, त्यामुळें चित्राळ प्रकरण फार बिकट होण्याची भिती आहे असें पायोनिर ह्मणतें.

हल्लीं लाहोरास चोऱ्या लुटालुटी व खून यांची गर्दी उडाली आहे. सरहद्दीवर इं... गुंतल्यामुळें तर असें होत नाहीं ना?

कोरियांत सोन्याच्या खाणींचा शोध चालू झाला असून त्यांत यश मिळण्याचा संभव दिसतो.

काळ्या रंगाचे सतेज मोती दक्षिण कालोफोर्नियांत सांपडतात; त्याची किंमतही फार असते.

घोड्याच्या लगामालाच विजेचे दिवे लावण्याचा प्रघात, बर्लीन शहरांत तूर्त फार पडला आहे.

हल्लींच्या सर्व प्रख्यांत शहरांत बर्लीनचे आरोग्यसंरक्षण फारच चांगलें आहे असें ह्मणतात.

आफ्रिकेंतील मुलखासंबंधी फ्रेंच व इंग्रज यांच्यांत पडलेला लढा अद्याप मिटला नाहीं, फ्रेंच लोक अहंकारानें वागत आहेत; व इंग्रजांनां मुकाट्यानें किंवा कांहीं चारल्पाशिवाय वश होण्याचा रंग दिसत नाहीं.

इंग्रजांच्या स्वाधीन असलेल्या नाताळ देशांतून हिंदुस्थानच्या गेलेल्या लोकांना हांकून देऊन आपलाच व्यापार वाढविण्याचा इंग्रज लोकांचा जुलूम होत आहे असा गवगवा फारच झाला आहे; पहावें, कितपत दाद लागते!

खुद्द लंडनमध्यें प्रत्यक्ष हिंदुस्थान— मे महिन्याच्या २९ साव्या तारखेस लंडन येथें 'हिंदुस्थानचा देखावा व पदार्थ' यांचे एक मोठें प्रदर्शन, अर्ल्स कोर्ट या भागांत भरणार आहे. त्या बद्दल सर्व तयारी झाली आहे. तेथें हिंदुस्थानचीं निरनिराळ्या जातीची घरें, देवळें, बाजार वगैरे अगदीं हुबेहुब केलीं असून, त्या साठीं हिंदुस्थानांतून सुमारें एक हजार माणसेंही तिकडे पाठविण्यांत येणार येण्याची तजवीज झाली आहे. हें प्रदर्शन फारच मोठें होणार असून, तें प्रति हिंदुस्थान भासविण्याचा सर्व प्रकारचा यत्न झाला आहे. तेथें एक नाटकगृह केलें असून त्यांत इकडच्या प्रमाणेंच नाटकें करण्याची तजवीज केली आहे. एकंदरींत सर्व हिंदुस्थानची देखावा या ठिकाणीं होणार आहे यांत संशय नाहीं. तथापि आमच्या मतें, हा देखावा अगदींच अपुरा व कदाचित् खोटाही होण्याचा संभव आहे. कारण, या ठिकाणीं फक्त हिंदुस्थानच्या कांहीं कर्मणुकीचा व गमतीचा देखावा दाखविण्यांत येईल. परंतु हिंदुस्थानचें अठरा विश्वे दारिद्र्य; लोकांची हीन स्थिति; राष्ट्रीय सभेच्या थोरवी प्रमाणें हिंदुस्थानची कारभारी स्थिति, इत्यादि हिंदुस्थानच्या तूर्तच्या वास्तविक स्थितीचें हुबेहुब चित्र तेथें उभारण्यांत येणें कठीणच आहे, किंबहुना ते त्यांनां इष्टही वाटणार नाहीं! तर मग हा प्रकार केवळ आमच्या चेष्टापुरताच आहे या पेक्षां जास्त कांहीं दिसत नाहीं.

काळजी मिटत नाहीं ती नाहींच!— अनेक प्रकारच्या भानगडी मिटवीत आणल्या तरी रशिया बद्दल इंग्रजांची भीति मिटल्याचें दिसत नाहीं. कारण, चीनच्या उत्तरेकडील व्लाडीवो हें बंदर, भर पावसाळ्यांत किंवा भर बर्फ पडण्याच्या मोसमांत सुद्धां उत्तम रीतीनें उपयोगांत आणण्याची तजवीज, रशियनांनीं केली असून, त्यांत तें सफळ झाले असल्यामुळें, तिकडून कदाचित् हिंदुस्थानावर संकट येऊं शकेल अशा प्रकारची चर्चा हल्लीं इंग्लंडांत फैलावली आहे. व ती लंडन टाइम्सच्या ओडेसा येथील खास बातमीदाराच्या बातमी वरून समजली असल्यामुळें, केवळ निरर्थक असेल असें ह्मवत नाहीं.

"इंग्लंडच्या मोठेपणाचा आधार केवळ हिंदुस्थानावर अवलंबून आहे; हिंदुस्थान आपल्या हातचें निसटलें तर अवला मोठेपणा गेला" असें, सेक्रेटरीचे मदतनीस सेक्रेटरी मि. कर्झन यांनीं नुकतेंच आपल्या एका व्याख्यानांत सांगितलें. त्या वेळीं अध्यक्षस्थानीं, मुंबईत काळी प्रतिमा बनलेले प्रसिद्ध सर रिचर्ड टेंपल साहेब होते. स० वि०

नवी टूम— मुंबईतील 'बांबे ग्याझेट' पत्राच्या वर्गणी दारांपैकीं व त्यांत जाहिराती देणारां पैकीं जर कोणी हिंदुस्थान, ब्रह्मदेश किंवा सिलोन येथें आगगाडीच्या अपघातांत मरण पावला तर, त्याचे कायदेशीर वारसास सनलाइफ इन्शूअरन्स कंपनी कडून ५० हजार रुपये मिळण्याची सोय सदहू पत्राचे मालकांनीं केली आहे.

मद्रासची विजेची ट्रामवे या आठवड्यांत चालू होणार.

मिठाचें उत्पन्न— गेल्या फेब्रुवारी अखेर संपणाऱ्या अकरा महिन्यांत ३,०६, १९,००० पण मिठावर ७,४१,६००,०० रुपये जकातीचें उत्पन्न झालें.

रतिमन्मथक्रीडा— आग्र्यास एक वैश्य जातीचा मनुष्य एका भंग्याचे तरूण मुलीवर आषक्त होऊन, तिच्याशीं आपला जन्माचा संबंध घडावा ह्मणून त्याणें तिचे बरोबर लग्न करण्याची आपली इच्छा तिला कळविली तेव्हां तिणें त्याला कळविलें कीं, तूं जर माझे जातींत येशील तर मी तुजबरोबर लग्न लावण्यास खुषी आहे. आणि त्याप्रमाणें त्या आषकानें आपल्या माशुकाच्या प्राप्तीसाठीं आपल्या जातीचा त्याग करून भंग्याचे जातींत प्रविष्ट होऊन तिचें पाणिग्रहण केलें. रतिमन्मथांच्या क्रीडा आषकमाशुकां कडून काय काय चमत्कार घडवितील तें कोणी सांगावें. न्या० सु०

कोर्ट फी— १० रुपयाहून कमी फी आकारणाऱ्या फिर्यादि अर्जास जुन्या तऱ्हेचीं किंवा नव्या तऱ्हेचीं कोर्टफीचीं टिकिटें आज पर्यंत लाविलीं तरी चालत असत; परंतु ता. १ जुलई सन १८९५ पासून फक्त नव्या तऱ्हेचीं ह्मणजे ज्यांवर मध्यभागीं ३ रेषा व बाजूस किंमत व महाराणी सरकारचा मुखवटा असतो, ती कोर्ट फीचीं टिकिटें मात्र चालतील, दुसरीं चालणार नाहींत असा नंबर १४९७ ता. २९ मार्च १८९५ चा हिंदुस्थान सरकारचा ठराव ग्याझेटांत प्रसिद्ध झाला आहे. दी० बं०

विद्या व्यसनी लोकांच्या नाकाचा शेंडा गोलाकार असतो.

हाउस आफ कामन्स मध्यें नागपूरचे पदच्यूत भोंसले यांचे संपत्तीचा नायनाट कोणी केला या बद्दलचा विचार मोठ्या जोरानें चालणार आहे.

हिंदुस्थानांतील राजकीय खर्च अव्यवस्थित आहे अशी खातरी होत चालल्यामुळें पार्लमेंट तर्फे कमिशन नेमणार अशी गुमकी निघाली आहे.

स्टेट सेक्रेटरीच्या कौन्सलांत एक जागा रिकामी झाली ती हिंदुस्थानवाशी यांस मिळावी ह्मणून खटपट चालली आहे. व मि० डब्ल्यू सी० बानरजी यांचें नांव पुढें गेलें आहे. म० मि०

निझामांचे राज्यांत खाणींतून सोनें काढण्यासाठीं ३ कंपन्या विलायतेंत हल्लीं भांडवल जमवीत आहेत.

हावरोगिरी—मद्रासेंतील मि. एल्स नांवाच्या व्यापारी साहेबांनीं बनाऊ दस्तेवज केला ह्मणून त्याला सेशन कमीट करण्यांत आलें आहे, असें तारेची बातमी सांगते.

त्रावणकोर व कोचीन संस्थानचे रेसिडेंट मि० ग्रीग हे मरण पावले.

भोंसकलें—लेफ. पार्कर नांवाच्या युरोपियन लष्करी हपिसरास एका गाझीनें शस्त्रानें भोसकून घायाळ केलें असें ता. ९ची सिमल्याची तार सांगते.

एकीचें फळ—सोलापूर जिल्ह्यांतील रेल्वे नोकरांचे पगार कमी करण्याचा विचार चालला होता पण त्यांनीं "आपल्यास कंपनीची नोकरी नको" ह्मणून २४ तासांच्या नोटिसा दिल्या व एक दिवस घरीं बसले, त्याबरोबर त्यांचे पगार कमी करूं नयेत ह्मणून लगेच तारेतून हुकूम आला. एवढेंच नाहीं, तर कामावरून काढणार नाहीं व कामाप्रमाणें बढती देऊं अशा कबुलीची त्यांची अट होती तीसुद्धां रेल्वे अधिकाऱ्यांनीं कबूल केल्याचें समजतें.

चित्रळची लढाई—इंग्रजी फौज जाईल तिकडे फत्ते, अशी तूर्त तिची सलावत आहे; त्या प्रमाणेंच चित्रळच्या मोहिमेंत ती विजयश्री मिळवीत आहे. आजपर्यंत शत्रूबरोबर दोन सामने झाले त्यांत आमच्या फौजेचा दिव्य पराक्रम दिसल्यामुळें अमरखानाची घाबरगुंडी उडालेली दिसूं लागली आहे. इंग्लिश फौज अमरखानाच्या किल्ल्याजवळ जवळ जाऊन पोंचली असून तेथें चकमक उडेल असें धोरण आहे. अमरखानानें कैद करून नेलेले लोक परत पाठवून दिल्याची बातमी आहे. स. शो.

हैद्राबादचे निजाम सरकारानें कैलासवासी मि० एच. पी. हॉडसन प्रिन्सिपाल हैद्राबाद कालेज, यांच्या कुटुंबास दरमहा ३०० रुपयांची व त्याच्या मुलीस अभ्यासाकरितां तितक्याच रुपयांची नेमणूक करून दिली ही फार उदार देणगी होय. मि० हाडसन हे थोड्याच दिवसापूर्वीं पटकीच्या आजारानें मरण पावल्याचें वाचकांस माहित असेलच.

रावबहादूर आनंद चार्लू यांस मद्रासच्या यतीनें व्हाइस रीगल कौन्सिलचे मेंबर निवडण्यांत आलें आहे

न्या. सु.


## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत (उच्चारासह) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०।०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनारी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

अंकास ................ ०४

Single copy.......................... 4 as

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ........ ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as.
Repetition Per line 3 a

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX — AKOLA MONDAY 29 APRIL 1895 — NO. 16

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख २९ माहे एप्रील सन १८९५ इ० — अंक १६

## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळे. उमेद धरा आणि खात्री करा. असे वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकले नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक

नमुना ( जी )

नादारी मुकद्दमा नंबर ११ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हे अकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येते कीं गणपत वल्लद यादोजी कुणबी राहाणार अकोट हा नादारी आहे असा आज तारीख ६ माहे ४ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २९ माहे ६ सन १८९५ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. १८।४।९५ इ०

B. B. Sule.
Judge
Bankruptcy Court
AkolaDistrict.

## "SIMULTANEOUS EXAMINATION.

Notice of Motion
The House of Commons
1895

Mr. Naoroji—Civil Service (India) (Simultaneous open Competitive Examinations in England and India),—That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यांची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यातील, १८७७ च्या दिल्ली दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळली पाहिजेत आणि १८९३ च्या जुन्या ३ र्‍या तारखेस सिव्हिलसर्व्हिस परिक्षा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत एकसारखी घेत जावी असा जो ठराव आपण पास केला तो अमलांत आणिला पाहिजे. "

नोटीस

अमृत त्रिंबक हेड मास्तर शाळा नांदुरे जिल्हा बुलढाण यास खालीं सही करणार याजकडून या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं दांडेकर साहेब यांचे समोर आह्मी जो दावा केला होता तो मयताचे पाठीमागें शिल्लक राहिलेली जिनगी ताब्यांत मिळण्याचा केला होता व तुमचे सामूची मालकी नुसती अन्नवस्त्राची आहे या प्रमाणें केला होता व ह्या दाव्याचे निकालाचे संबधानेंच तो करारनामा आह्मी आपणास लिहून दिला आहे. परंतु मयतानीं विभक्त राहिल्या नंतर जिवंत असे तों वेळेस जी स्थावर जंगम जिनगीची विक्री केली त्याज बद्दल आह्मी पुढें दावा करणार नाहीं असा उल्लेख आह्मी मुळींच करारनाम्यांत केला नाहीं. करितां या नोटिशीनें आपणास असें कळविण्यांत येत आहे कीं तारीख २१ माहे जून १८९५ इसवी रोजीं तुह्मास प्रतिवादी करून मयतानी ठेविलेली अमानत रकम रुपये २१७५ ची पुन्हां नवीन फिर्याद दाखल करण्यांत येईल. सदर्हु रकमेची फिर्याद सदर्हू तारखेस आपलेवर दाखल न व्हावी अशी जर तुमची इच्छा असेल तर सदर्हु मुदतींत आमचें घर खालीं करून द्यावें. नाहीं तर फिर्याद दाखल झाल्या खेरीज रहाणार नाहीं हें खात्रीपूर्वक समजोन कळावें तारीख २५ माहे एप्रील सन १८९५ इ०

[ सही ]
सोनाजी गणेश देशपांडे
प्रगणे जळगांव
दातुर खुद्द

वऱ्हाडसमाचार

मिती बैशाख शुद्ध ५ शके १८१७

## हिंदुस्थानची राजनीती

( १३ वे अं. व. पुढें चालू )

जातिभेदामुळें सरकारानें न्यायाच्या बाबतींत आणि इतर सरकारी कामांत पक्षपात कधींही करितां कामा नये—३. हिंदुस्थानच्या लोकांत आणि राज्यकर्त्यांत परस्पर प्रेमभाव उत्पन्न करणें, सरकार व न्यायासनापुढें वर्णभेद न करितां लोकांत सुधारणेची प्रगती करणें आणि मांडलिक संस्थानाच्या ठरीव हक्का आड न येतां त्यांची उन्नति करणें ह्या गोष्टी ब्रिटन लोकांची भावना जागृत झाली असतां होण्या सारख्या आहेत. ह्या अधिकाऱ्यांच्या मेहेर नजरेनें होणें शक्य नाहींत.

४ इंग्लंडानें पतकरलेली जबाबदारी आणि इतर अधिकारी लोकांकडून पूर्णपणें बजावली जाणार नाहीं. ग्रेटब्रिटनांतील लोकांनीं पूर्वात्य देशाविषयीं जी महत्वाची कामगिरी करण्याचें पतकरिलें आहे ती गैरमाहितगार अशा येथील लोकांकडून अथवा जे सरकार आपल्या हाताखालील कामगाराकडून मिळविलेल्या माहितीवर अवलंबून असतें अशाकडून कधींही होणार नाहीं. हिंदुस्थानच्या गरजा आणि संकटें, ब्रिटिश लोकांच्या चुका आणि लोभ हें तेथील थंड हवेंत स्वतंत्र रीतीनें पाहू जाणारास जसें दिसेल आणि समजेल तसें कलकत्त्यास असणाऱ्या व्यापाऱ्यांस अथवा अधिकाऱ्यांस समजणार नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीची माहिती करून घेतां येईल. आणि ही माहिती असण्याची अवश्यकता दिवसेंदिवस वाढत जात आहे.

५ शासनपद्धति उदार तत्वांस अनुसरून असून सुधारत जाणारी पाहिजे. ती प्रतिगामी आणि प्रतिरोधक नसावी—ड्यूक आफ आरगाइल यांनीं हिंदुस्थानाकरितां ज्या शासनपद्धतीचें मंडन केलें आहे ती निदानीं अयोग्य असून अप्रशस्त आहे आणि तिचा परिणाम आजपर्यंत झालेल्या सुधारणेची पिछेहाट होणें हा होईल. हिंदुस्थानच्या लोकांचें कल्याण व्हावें अशाविषयीं ह्या ड्युक साहेबांची उत्कट इच्छा असल्यामुळेंच त्याच्या हातून ही चूक झाली आहे असें मला वाटतें. इंग्रजांच्या सत्तेखालीं आणि तालमेखालीं हिंदुस्थानचे लोकास ठेविलें असतां त्यांची सुधारणा होऊन त्यांना उन्नतावस्था प्राप्त होईल परंतु दुर्दैवाची गोष्ट कीं मानवी स्वभाव ह्या परोपकारजनक उपपत्तीच्या (Theory) विरुद्ध आहे. हिंदु अथवा ब्रिटिश मनुष्य ह्या संबंधानें जी आपली कल्पना आहे तसा ब्रिटिश मनुष्य ह्या भूतलावर नाहीं. यद्यपि हिंदु अथवा ब्रिटिश मनुष्य घेतला असतां त्याची बुद्धि अगदीं विमल आहे असें आढळून येणार नाहीं. हिंदुस्थानांतील कोणत्या ही जातीचे अथवा पंथाचे लोक असोत त्यांची कर्तृत्व शक्ति आणि मनोविकार हे आपल्या सारखेच आहेत कोणत्याही वस्तूची जोरदार वाढ होण्यास मोकळी जागा आणि अनुकूल साधनें पाहिजेत. हा नियम प्राणिगुणधर्म शास्त्रा प्रमाणेंच Physeology समाजशास्त्रासही Social Science लागू आहे, ह्या नियमानुरोधानें त्या लोकांच्या कर्तृत्व शक्तीस व्यापार घडावा ह्मणून. मोकळीक जागा आणि विषय पाहिजे. याशिवाय त्यांची कायमची सुधारणा होणार नाहीं. अतिशय प्रतिरोध अथवा सर्वतोपरी सहाय केलें असतां [ मग असें सहाय्य करण्यांत आप-

चा उद्देश कितीही परोपकाराचा असो ] चालूं असलेली प्रगति प्रतिगामी होईल, तिचा प्रवाह क्षुब्ध होईल आणि त्या प्रगतीच्या ओघाचे घातक पाट भलतीकडे सैरावैरा धावूं लागतील.

पुढें चालेल

'बांबे प्रसिडेन्सी आसोसिएशन' नांवाची मुंबईस एक जुनी व सुप्रसिद्ध सार्वजनिक सभा आहे. बहुतेक थोर व विद्वान गृहस्थ तिचे सभासद आहेत. या सभेनें देशकार्यांत पुष्कळ पुढारीपण घेतलें असून मुंबईस तिच्याच आश्रयानें राजकीय चळवळी चालल्या असतात. या संस्थेच्या चालकांनीं हल्लीं नवीन कार्यास आरंभ केला आहे. महत्वाचे लेख, व्याख्यानें, इत्यादि प्रसिद्ध करून त्यांची सर्वत्र माहिती करून देतात. विषयांचें प्रतिपादन उत्कृष्ट व राजमान्य आहे असें पाहून नंतर ते येथे या सभेच्या द्वारें लोकांसमोर येतात. वादग्रस्त व अत्यंत महत्वाच्या विषयावर भिन्न मतांचा संग्रहही लोकोपयोगा साठीं करून ठेवितात. ही संस्था उत्तरोत्तर लोकांस चांगली मार्गदर्शक व यशस्वी होवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

या सार्वजनिक मंडळीच्या निमंत्रणानें नामदार फेरोजशहा मेथा सी. आय. इ. यांस मानपत्र देण्यासाठीं मुंबईस एक जंगी जाहिरसभा भरली होती. नामदार मेथा सारखें अनर्घ्य रत्न आपल्याला लाभलें आहे हीच आपल्या देशाच्या भाग्यकाळाची खूण आहे असें सर्वतोमुखीं ऐकूं येतें. नामदार मेथा यांच्या कार्यमालेची प्रस्तुत व्याप्ति स्थलविशिष्ट नसून सर्व देशमय आहे. व्हाइसरायच्या बड्या कायदे कौन्सिलांत त्यांनीं जी अतुल लोकसेवा केली त्या मुळें सर्वत्र त्यांचे धन्यवाद लोक गात आहेत. किंबहुना 'पायोनिअर' सारखे नेटिवद्वेष्टे पत्रकर्ते देखील त्यांचे अलौकिक गुण वर्णूं लागले. पोलीस बिल, जकातीचा कायदा, बजेटावरील वादविवाद इत्यादि सहस्त्रावधि गोष्टी मध्यें त्यांची पारंगतता विलक्षण दिसून आली. यांचे हृदयंगम वक्तृत्व ऐकून यांचे प्रतिपक्षी देखील माना डोलावितात. विचारगांभीर्य वर्णनीय असून यांच्या बोलण्यांत न्यायबुद्धीची समता नित्य दिसून पडते. मतप्रकाशन करण्यांत यांच्या मनीं किंतु किंवा भितीचा पदर तिळप्राय नसतो. स्पष्टवक्तृत्व आणि सत्यवादित्व हे उभय गुण एकत्र आहेत. यांच्या या नानाविध सद्गुणानीं कायदे कौन्सिलांत एक राज्यक्रांतीच झाल्या प्रमाणें होऊन गेलें आहे. किंवा बहुविध सारखी यांची लोकसेवा आहे. असें पाहून मुंबईच्या प्रेसिडेन्सी आसोसिएशनें नामदार मेथा यांच्या गळ्यांत मानपत्रद्वारा विजयश्रीची माळा घालण्याचा विचार केला आणि त्या प्रमाणें जाहिरसभेंत संकल्पही ठरला आहे.

नामदार मेथा हे मुंबईचेच गृहस्थ आहेत तेव्हां त्यांच्यांशीं आपल्या प्रांताचा संबंध नाहीं अशी एकदेशीय गोष्ट आतां उरली नाहीं. त्यांच्या कार्यमालेवरून सर्व देशभर त्यांचें वास्तव्य प्रसृत झालें आहे. त्याच्या सारख्यांच्या लोकसेवेचे उपकार अनंत, अमौल्य, व बहुव्यापक आहेत तेव्हां त्यांस अर्पण होत असलेल्या मानपत्रांत पूर्ण संमति न दर्शविण्या इतका गुणग्राहकपणाचा लोप व कृतज्ञतेचा अभाव आमच्या प्रांतस्थ लोकांमध्यें आहे असा मात्र खोटा ग्रह होऊं नये ह्मणून आह्मी मुद्दाम हें लिहीत आहों. वऱ्हाडच्या लोकांच्या मुखांतून नामदार मेथा यांचा नामनिर्देश जयघोषानें होत असतो. अशा देशाभिमानी गृहस्थांचा गौरव सर्वत्र होईल हें निर्विवाद आहे. मुंबईच्या मानपत्रास या प्रांताची पूर्ण अनुकूलता आहे आणि अशा अर्थाचा निरोपही वऱ्हाड सार्वजनिक सभेमार्फत लवकरच धाडला जावा असें आह्मी ह्मणतों.

राव बहादुर श्रीराम भिकाजी जठार बी० ए० सी० आय० इ० हें नांव आमच्या प्रांतीं घरांतल्या आवडत्या वडिलधाऱ्या माणसाच्या नावा प्रमाणें अत्यंत वंद्य व संस्मरणीय झालें आहे. यांचा नामनिर्देश जेव्हां जेव्हा मुंबई इलाख्यांत कार्यपरत्वें होतो तेव्हां आमचें चित्त त्यांच्याकडे लागलीच वेधतें. राजकीय उन्नतिविषयक गोष्टींमध्यें पेनशन घेतल्यापासून राव बहादुर विशेष लक्ष्य पुरवीत आहेत. या प्रांतीं जो पर्यंत ते होते तो पर्यंत ते राजकीय गोष्टी पासून इतके अलिप्त व मुग्ध रहात असत कीं यांच्या त्या स्तब्धतेचें व निश्चलतेचें आह्मास नवल वाटे. परंतु सांप्रत त्यांची वर्तनदिशा जों जों पहावी तों तों त्यांच्या आलुप्त व गुप्त मताविषयीं आमच्या मनांत चांगला प्रकाश पडूं लागला आहे- पेनशन घेतल्या नंतर ते इतक्या वर्णनीय उत्साहानें सार्वजनिक कार्यांत शिरले हें पाहून विशेष आनंद वाटला राव बहादुर जठार हे कायदे कौंसिलदार होण्यासाठीं मताधिकारी लोकापुढें उमेदवार ह्मणून उभे आहेत ही गोष्ट फार अभिनंदनीय होय. इतर उमेदवाराच्या नानाविध गुणांची योग्य पारख करून लोक आपल्या इष्ट गृहस्थास मताधिक्यानें निवडतीलच यां निवडी संबंधानें आह्मी कांहीं च लिहूं इच्छित नाहीं.

मुंबई युनिव्हरसिटीच्या पदवीधरांची एक मंडळी आहे त्या मंडळीच्या वार्षिक समारंभाच्या वेळीं मुख्य स्थान राव बहादुर जठार यांस दिलें होतें आपल्या त्या स्थान महिम्या प्रमाणें राव बहादुरांनीं एक सुगम बोधपर व विस्तृत व्याख्यान दिलें. व्याख्यानाचा विषय शिक्षण संबंधानें होता. राव बहादुरावर त्यांच्या मित्रेपणा संबंधानें आमच्या प्रांतस्थ लोकांचा आरोप कधीं कधीं होत असे पण या व्याख्यानांत त्यांनीं स्वकीय मतें स्पष्टपणें कळविलीं आणि आपल्या विचारांची दिशा सर्वजणास अगदीं खुल्लवटीनें दाखवून दिली. त्यांच्या भाषणाच्या उपोद्घातांत फर्ग्युसन कालेजाच्या पुरस्कर्त्यांच्या देशसेवे बद्दल आभारदर्शक उद्गार होते. हल्लीच्या पाठशाळांतील शिक्षणाचा बोजा फार मोठा असून विद्यार्थ्यांच्या शरीरप्रकृतीस हानिकारक होतो, असें त्यांनीं कळविलें. नामदार न्यायमूर्ति रानडे यांच्या अभिप्राया प्रमाणेंच यांचा विचार आहे. विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत देशी भाषाचा प्रवेश करण्याविषयीं त्यांनीं विस्तारपूर्वक प्रतिपादन केलें. आणि त्यांनीं नेटिव वर्तमान पत्रकर्त्यास जो बोध केला आहे तो प्रत्येक देशाभिमानी विद्वानानें शिरसावंद्य मानला पाहिजे. त्यांच्या भाषणाच उत्तरार्धं प्राथमिक व वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणाच्या परिमित अभिवृद्धी संबंधानें होता आणि त्यांत सरकारचा कल व लोकांचें कर्तव्य यांचा सौंदर्यतेनें उल्लेख केला आहे सर्व व्याख्यान इंग्रजींत आहे तेव्हां त्याचा रसास्वाद स्थलावकाशाच्या मानानें आह्मी मराठी वाचकांस देण्याचें योजिलें आहे.

## भपको

लिहून आलेला मजकूर

एके दिवशीं राव साहेब लुटपुटे शास्त्री आपल्या पूर्वीच्या धन्याकडे गेले आणि एखाद्या मुर्ख शिरोमणीशी गाठ पडली असतां ब्राह्मणपणाचा आंव घालून कितेक अगीं मोठी ऐट आणतात त्याप्रमाणें करून ते आपल्या पूर्वीच्या धन्याच्या शुष्क तोंडाकडे पाहून ह्मणाले:—

"हें पहा. अण्णा वैद्य ! जगांत अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या युक्त्या आहेत. रावणानें अग्नि, वायु, वरुण इत्यादि देवांस आपले बंदीवान करून त्या करवीं सेवा चाकरी करून घेतल्याचें पुराणांतरीं वर्णन आहे ह्याविषयीं पाहिजेल तर कोणी संशय घेवोत; परंतु वरील देवतांपासूनच मानवी प्राणी आपलीं असंख्य कामें करून घेऊन त्यांना आपले बंदीगुलाम करून ठेवल्याचें आपण आजला पहात आहोंत. ताम्रमुखे मुठभर इंग्रज लोक १८ कोटी लोकांवर अप्रतिहत सत्ता चालवीत असल्याचेंही आपण आजला पहातच आहोंत. हीं फळें कश्याचीं आहेत! याबद्दल विचार कराल तर तुह्माला कबूल करावें लागेल कीं, तीं निव्वळ युक्तीचीं आहेत. युक्तीची उत्पत्ति आजकालची नसून पुराण काळापासून तिचा प्रार्दुभाव विख्यात आहे; ह्मणून ज्या प्रमाणें जुन्याविषयीं आपला पूज्यभाव असतो त्याप्रमाणेंच या युक्तीविषयींही असला पाहिजे. आपण या युक्तीचा आश्रय केला असतां आपली पुराणप्रियता व्यक्त होणार आहे. व्यासवाल्मिकादि आर्य महाकवींनीं आपल्या रसाळ वर्णनें युक्तीचा थोर महिमा गावून तिची कीर्ति अजरामर करून ठेविली आहे, ब्रह्मा विष्णु महेशादि देवांनीं युक्तीचा आश्रय केल्याबद्दल पुराणें साक्ष देत आहेत. परम सुकुमार, शृंगार रसाचें आद्य स्थान, भृभंगें करून भस्मीभूत झालेल्या मदनाचें पुनरुज्जीवन करणार, तारुण्य रसानें मुसमुसलेली आणि सौंदर्यकलिका केवळ गौतमाच अशी अहल्या जार एका कोंगड्यास प्राप्त झाल्यानें ज्याचा संभोगकाम पुरा झाला नाहीं अशा इंद्रानें त्या अहल्या सुंदरीशीं आपली संभोग कामेच्छा युक्तीनेंच पुरी केली. दाशरथी रामचंद्रास "त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं त्वं कौमुदी नयनयोरमृतं त्वमंगे !" अशी असलेली जनकजा सिता देवी काढून नेण्याकरितां, रावणास कनक मृगाचीच युक्ती योजावी लागली. इतिहास स्पष्ट शद्बांनीं सांगून राहिला आहे कीं, राज्यकारस्थान ह्मणजे वरिष्ठ प्रतीची सफाइदार लुच्चेगिरी ! पुराण अथवा इतिहास पाहिला असतां, अण्णा, तुह्माला दिसून येईल कीं कपटाची उर्फ युक्तीची उत्पत्ति पुराण पुरुषा इतकी जुनी आहे. कपटाच्या जयापजयावर मानापमान अवलंबून आहे. असा कोणताही धंदा अथवा कला नाहीं कीं, जींत युक्तीची मदत मुळींच घेतली नाहीं. धर्म, कायदा, युद्ध, वैद्यक यांस निरनिराळ्या प्रकारानें युक्तीची मदत घ्यावी लागते; ( वरील कोटींत वैद्यकीची गणना केलेली पाहून अण्णा वैद्यानें तिरस्कारयुक्त मान हालविली ) आणि ही युक्ति योजतांना ज्या मानानें साहस अथवा भेकडपणा दाखविला जाईल त्या मानानें त्या त्या धंद्याची भरभराट अथवा कमीपणा होईल आतां तुह्मी ह्मणाल कीं अशी युक्ती योजणारांचे जगांत फजिती होऊन त्यास लोक नांवें ठेवितात; पण लोक जें नांव ठेवतात, तें कांहीं अशा सर्वांनाच नाहीं, कांहीं विवाक्षित लोकांसच नांवें ठेवितात आणि तेंही एखादी बेमालूम युक्ती योजण्यांत चूक होऊन कार्य फसलें ह्मणजेच; एरव्ही नाहीं. माझें स्वतःचें तर असें ठाम मत झालें आहे कीं, आपली स्थिति सुधारण्यास युक्तीसारखा दुसरा राजमार्ग नाहीं आणि भोळ्याभाबड्या लोकांवर आपला पगडा बसविण्यास हिजसारखें दुसरें साधन नाहीं, अशा भोळवट लोकांत तुमची गणना केली असतां मनवर रागाऊं नका; कारण फार लांब कशाला! तुमचें नांवच घ्याना "अण्णा" हें नांव जरी वाईट नसलें तरी या नांवापासून मनुष्याच्या कल्पनाशक्तीस आल्हाद होत नाहीं ! जेणेकरून लोकांचें लक्ष आपल्याकडे सहज वेधलें जाईल असें ऐटबाज नांव पाहिजे ! याला थोडक्यांत दाखला असा कीं, एखाद्या नवीन वर्तमान पत्रास अथवा मासिक पुस्तकास साधारण प्रचारांतील नांव दिलें असतां लोकांचें तिकडे लक्ष लागत नाहीं; पण तेंच, "गुलजार गुलहौसी" "विचित्र विषयसुधा" "वृत्त मंजुषा" असें मनोहर अथवा संस्कृत शद्बप्रचुर नांव असलें ह्मणजे लोकांचें चटकर लक्ष वेधलें जाऊन त्यांनां जिज्ञासा उत्पन्न होते. माझें नांव पहिल्यानें धोंडभट्ट होतें पण मग मी हें दगडा सारखें शुष्क नांव टाकून देऊन "लटपटे शास्त्री", असें नांव धारण केलें.

( पुढें चालू. )

# The Berar Samachar

MONDAY APRIL, 29, 1895

It is a pleasure to note that Rao Bahadur Shriram Bhikaji Jathar B. A. enters, after retirement, a sphere of public activity and promises to make his life highly useful to the cause of public good. We are glad as well to see him deliver an interesting and instructive lecture at the annual meeting of the Graduates Association in Bombay. We recommend to our English readers to read, study and inwardly digest the full text of his learned lecture. He dwells upon a number of subjects of vital importance and it needs no mention that the opinions embodied in it are highly valuable from the weight of his authority, long experience and direct contact with the inner working of the educational system in India. We are not in a position to do full justice to his long and discursive lecture in these columns but we are obliged to him when he reminds us of the possible improvement in the moral tone of the vernacular newspapers and justly

claims to them the dignity and efficiency of a high public functionary who is to pose between the rulers and the ruled as the best index of popular opinion. We are heart and soul in harmony with his strong and powerful advocacy of the entrance of the vernacular languages in the University curriculum. We hope to take up this subject on a second occasion.

---

## LEADERS OF MASSES
### NO. V
( Communicated )

What universal and grand ideas, it is possible for us to lay the foundation of. What wonderful enthusiasm we can successfully and profitably impart to the whole mass. We are to turn a new leaf; we yarn to the future. From the past we derive no help for the formation of our future. Hence these questions are of vital importance. Hitherto it seems many of the leaders of masses history has seen, have been shown to have led them to temporary success. Time has rendered their immense activity fruitless. The past has shown that enthusiasm of an erroneous cause and an erroneous idea, however universal, is so much human power wasted, barring certain coordinate advantages. The power of Mohomet is dying out; Idolatry is perishing. The Roman Empire has long since been dead. Popery is on the eve of total extinction. In our homes, the various sectarian philosophies and creeds are loosing force. So much enthusiasm, so much intellect, so much effort of the leaders of those ideas has been shown to be series of errors fruitless of the primary object—the happiness and good of mankind. Let us hope we do not repeat the blunders, and fight over again the battles mankind has fought. It would certainly be difficult to ascertain what shape should be given to the future. But there are circumstances which warrant a belief that prudence would show us the right path. For the great conflict which regenerates a nation has commenced with us. And here let us bow to our forefathers for one invaluable patrimony they have left us after centuries of religious meditation and ecstacy. That intellect or development of the brain, which is capable of penetrating deepest problems, fathoming deepest truths, with the fresh light of the nineteenth century and its marvels around. I consider the conflict has come rather too late. I consider that Alexander's successors were a lot of bad fellows. They did not remain in the country for a century or so, and went to destruction leaving us alone and free to contemplate and make our own a larger number of excellant ideas of the type embodied in one single epic sentence uttered by Porus in the agony of defeat—'Give me my monarch's rights.' I will not be surprised if one were to accuse Providence of partiality in reading asunder the Malbar coast from the Perrenes or the Coromondel from the Rhine. But the conflict has happily come and our intellect is fitted to make the best of that conflict And happily too our antagonist is worthy of us. He is a grand athelete whose destiny seems to make a still grander athelete of his antagonist. England's contact with us is fraught with perhaps the best promise. It is a country whose institutions, traditions and instiints care the result of a long and steady development—an unbroken contiunity of experiment, elimination, and sustained spectacle of an honest struggle for progress combining and co—ordinating the ideas about the glorious future destiny of man. In politics, literature and science she has yearnings of the purest kind. It is true oft times she has gone astray, but it cannot be denied that the normal aspect of her activities and motives are the best that can be found among the different nations. And further her existence has not lost touch of the general European progress in the affairs of men. Through her literature through her modes of thought and feeling is communicated to us the progressive genins of the European race. The grip of England on India is such as to foster and develop some of the progressive ideas of the age. The time therefore is extremely favourable for the nation to commence a new career.

---

We see the view of common sense, triumph in the elaborate and scientific discussion of the Opium and Ganja Commissions. Every measure of Government can not at best, certainly promote public good but acts as a medium to check the evils of a drink or smoke. One can find from the following paras the same result arrived at by the Ganja Commission:—

"Coming to the recommendations of the Commission they do not recommend the total prohibition of *ganja*, *charas* or *bhang*. The following paragragh in the resolution shows the Government's view: The prohibition of *ganja* is an interference with liberty which the Government of India is not justified in undertaking, except upon evidence which clearly establishes the fact that the harm permitted by non-prohibition is great and manifest.

Not only is this not the case, but the evidence has rendered it abundantly manifest that those who have hitherto recommended the prohibition of *ganja* have done so under an erroneous, or, at least, a greatly exaggerated impression as to its real effects. To a million people in India *ganla* a harmless pleasure, and in some cases even a beneficial stimulant. It would be in the opinion of the Governor General in Council, amount to oppression to take active measures to suppress it, on the mere ground that it is possible to quote isolated instances in which individuals have received injury from its use. Nor can the Government commit themselves to so unequal a measure as the suppression of the use of *ganja* ( which is the form in which the poor man uses the drug ) and the permission of the use of *bhang* ( which is the mide—form in which the better situated classes enjoy it. ) There seems to the Governor General in Council no argument in favour of the prohibition of ganja which would not equally apply to the enforcement by State agency of total abstinence from intoxicating or stimulating liquors and drugs throughout India—a proposal which is not within the range of practical politics."

G. I.

## वऱ्हाड

जळगांवकडील निरोड येथें गाहिणीच्या नांवाच्या औरतेनें आपल्या नांवपास होळीच्या विवशीं सोमळ घातलें असें शाबीत झाल्यावरून तिला फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. मुलीचा दुसरा पाट लाऊन पैसे मिळविण्यासाठीं किंवा मुलीचे जार कर्म मनसोक्त होण्यासाठीं तिनें हें कृत्य केलें हें कळत नाहीं?

वाशिमकडील पिंप्री गांवीं कुकी नांवाच्या वयोवृद्ध कलावंतिणीचा खुन तिच्या आंगावरील दागिन्याच्या लोभानें बाबूजी फुकट व बाळाजी या दोघा इसमानीं केल्याबद्दल खात्री वाटल्यावरून उभयतांस देहान्त शिक्षा देण्याचा निकाल झाला.

धेसांग येथील डूमन्या नांवाच्या १८-२० वर्षांच्या मुलानें आपल्या नऊ वर्षांच्या बापकोस रागानें मारलें आणि ती मारण्यानें मरण पावली ह्मणून त्यांस तीन वर्षांची सजा झाली.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन डायरेक्टर यांची स्वारी रजेवरून परत येऊन गेल्या सोमवारीं आपल्या कामीं रुजूं झाली.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे एक्स्ट्रा असि. कमि. यांचे कोडतास असि. कमिशनरचे मुलकी अधिकार मिळाले. आणि त्यांस पहिले वर्ग माजिस्त्रेटचे अधिकार देण्यांत आले.

मि सुब्रायलु नायडू एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस ५०० पर्यंतचे दिवाणी अधिकार व पहिले वर्ग माजिस्त्रेटचे फौजदारी अधिकार मिळाले.

रा. रा. धोंडजी कोंडजी पोलीस इन्स्पेक्टर आकोला यास गेल्या १९ वे तारखेपासून तीन महिन्याची रजा मिळाली. आणि त्या रजेंत रा. रा. विनायकराव चाफे यांस इन्स्पेक्टर नेमिलें.

रा. रा. बळदेवसिंग इन्स्पेक्टर येवतमाळ यांस चलु महिन्यापासून पेनशन मिळालें.

इन्स्पेक्टर रा. रा. भगवनादिन वाशीम यांस तीन महिन्यांची रजा मिळून त्यांचे जागीं मि. हैदरअली यांस नेमिलें

मि० इलियट हे कांहीं दिवसाच्या रजेवर गेल्यामुळें त्यांच्या यवतमाळच्या डेपुटी कमिशनरच्या जागीं येथील असिस्टंट कमिशनर मि० सिम्पसन यांस नेमण्यांत आलें. रा० रा० पंढित सुरज नारायण यांचा त्या जागीं हक्क असून त्यांस कां वगळलें हें समजलें नाहीं.

गेल्या शुक्रवारीं उमरावती हायस्कूलच्या विद्यार्थिगणांनी संस्कृत मृच्छकटिकाचे पहिले पांच अंक करून दाखविले. प्रयोग चांगला झाला. शर्विलक आणि वीट या पात्रांचा अभिनय उत्कृष्ठ होता आणि गाण्यानें तर बहारच झाली. चारुदत्ताचा शेवटील माग फार चांगला झाला. मदानिकेचा अभिनय विशेष रमणीय वाटला, व वसंतसेनेचा भाग ही बरा झाला. नाटक एकंदरींत उत्कृष्ठ झालें. वेळेची कमताई व इतर गोष्टी संबधानें पाहतां मुलांचीं कामें अभिनंदनीय आहेत परंतु नाटकाबरोबरच जे दुसरे कित्येक तऱ्हेनें तोटे होतात त्यांच्याकडे लक्ष दिलें तर एकंदरीनें फायदा होतो किंवा नाहीं याची आह्मास शंका वाटते, तर हे दोष जाऊन नाटकाचे सर्व तऱ्हेनें फायदे लाभतील अशी चालकांनीं खबरदारी घेतलीच पाहिजे आणि तरच नाटकप्रयोग ही विहित गोष्ट होईल.

---

### नोटीस

अहमदखां,इसूफखां, व याकुबखा वल्द बहादरखा वस्ती आकोला, ताजनापेठ, यास.

नोटीस करणार चत्रभूज देवजी भाटे वस्ती आकोला, ताजनापेठ तालुका व जिल्हे आकोला यांजकडून नोटीस देण्यांत येते आहे कीं मी महमद जैनुल आबेदीन वल्द महमद टिपू माजी सुभेदार यांचे मकान आकोला ताजनापेठेंतील नानाभाई यांचे घराजिकचे सुभेदार यांजपासून तारीख २९ एप्रिल सन १८९१ इसवी रोजीं खरेदी घेतलें त्या घरांत तुह्मी अन्यायानें ह्मणजे संमतीवाचून राहत आहा. करितां ही नोटीस पावल्यापासून चोवीस घंट्यांच्या आंत सदरहू मकानापैकीं जितका भाग तुमच्या ताब्यांत आहे तो आमचे ताब्यांत खाली करून द्यावा. याप्रमाणें तुह्मी करण्यास चुकलां तर सदरहू मकानांपैकीं जितका भाग तुमचे ताब्यांत आहे तो आमचे ताब्यांत येईपावेतों त्याजबद्दल भाडे दररोज रुपये दोन प्रमाणें महिन्याचे साठ रुपये प्रमाणें द्यावें लागेल. व सदरहू जागा ताब्यांत घेण्यासाठीं कायदेशीर इलाज वगैरे करावा लागेल त्याबद्दल व दुसरे प्रकारचे नुकसानी बद्दल तुह्मी जबाबदार व्हाल. कळावें तारीख २८–४–९५ इसवी.

सही ( गुजराथींत ) चतुर्भुज देवजी
दस्तुर नैनसीभाई.

---

### नोटिस

अहमदखा, इसूफखा व याकूबखा वल्द बहादरखा राहणार अकोला, ताजनापेट यांस.

नोटीस करणार महमद जैनुल आबेदीन वल्द महमद टिपू माजी सुभेदार पेनशनर, हल्लीं वस्ती निजाम हैद्राबाद, व हल्लीं मुक्काम अकोला.

आबासखा वल्द दौलतखा मास्तर, अकोला मंगळवारा तालुके व जिल्हे मजकूर यांजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं आह्मा पैकीं सुभेदार यांनीं आपले मालकीचें घर नानाभाई पारशी यांचे नजिकचे चत्रभूज देवजी भाटे यांजला तारीख २९ एप्रिल सन १८९१ इसवी रोजीं खरेदी दिलें आहे. त्या घरांत तुह्मी माझे आज्ञे वाचून राहण्यास गेला माझे मार्गे घराची वहिवाट मास्तर करीत होते. त्यांचे आज्ञे वांचून तुह्मी घरांत अन्यायानें राहण्यास गेला. सबब आतां तुह्मांस कळवितों कीं ही नोटीस पावल्यापासून चोवीस घंट्याच्या आंत सदर्हू घर चत्रभूज देवजीच्या ताब्यांत देऊन निकाल करावा. याप्रमाणें तुह्मी करण्यास चुकला तर मशारनिल्हे चत्रभूज देवजी यांचे हर एक प्रकारचे नुकसानीस तुह्मी जबाबदार व्हाल. कळावें तारीख २८–४–९५ इ०

( सही फारशींत )
( १ ) महमद जैनुल आबेदीन वल्द
महमद टिपू सुभेदार
पेनशनर.
(२) आबासखा वल्द दौलतखा
मास्तर.

---

## वर्तमानसार.

आतां मात्र पंचाईत खरी.

चीन व जपानच्या तहाचें काम संपून चीनचा व्हाईसराय बहुशः जपानमधून निघाला देखील असेल.

[ १ ] कोरीया स्वतंत्र करून, [ २ ] चिनांतील जिंकलेला प्रदेश व लिआओ नदीच्या पूर्वेचा भाग जपानेनें ठेवावा. व ( ३ ) फोर्मोसाचा मोठा प्रांत जपानानें हमेशाचा आपल्या स्वाधीन ठेवावा, शिवाय[४) अदमासें २० कोटी रुपयापर्यंत चीननें जपानला दंड देऊन ( ५ ) चीन व जपान यांच्याशीं जो कोणी शत्रू उभा राहिल त्या बरोबर उभयतांनीं लढाईस उभे राहावें. या प्रमाणें बहुतेक अटी ठरल्या आहेत. यामुळें रशिया व इंग्लंड यांच्या मुलुखांत जपानचा व्यापार व चळवळ वाढेल. त्यामुळें या दोन्ही राष्ट्रांना ही गोष्ट मुळींच पसंत पडत नाहीं, रशिया तर याबद्दल लढाई करण्यास उभा राहील असें चिन्ह दिसतें. परंतु इंग्रजानां मोठीच अशी पंचाईत पडली आहे कीं. रशियाला साह्य करावें तर रशिया अगोदर यूरोपांत वरिष्ठ झालाच आहे आणि त्यांत एशियांतही वरिष्ठ झाला तर पुढें काय होईल कोणजाणें! बरें, जपानला वाढूं द्यावें तर चीन व जपान एक होऊन त्यांचें ऐक्य वाढल्यास एशियांत त्यांचा जोर वाढेल इतकेंच नव्हे तर ते कदाचित यूरोपांत देखील आपला मोर्चा फिरवितील. 'दोन दिवस सासूचे व दोन दिवस सुनेचें 'ह्मणतात तेंसेच पूर्व दिशेचा उदय होण्याची वेळ आली असल्यास काय होईल तें सांगवत नाहीं.

चीन व जपान यांच्यांत जो तहनामा झाला आहे त्याबद्दल अनेक ठिकाणच्या अनेक बातम्या येतात. त्या सर्वांवरून तहनामा झाला ही गोष्ट खरी ठरते. फरक इतकाच कीं, टिनटसीन सुद्धां नवीन आणखी पांच नवीन बंदरें जपानला देण्याचें कबूल केलें आहे व चीन देशांत जपानी लोकांनीं व्यापाराची जास्त सवलत करून देण्यांत आली आहे ही बातमी विशेष आहे. तथापि खरी बातमी कळेपर्यंत इंग्लंडची पत्रें याबाबतींत आपलें कांहीं मत देत नाहीं. एक चमत्कार हा आहे कीं, चीन जपान बरोबर व्यापारांत गुंतलेल्या एका व्यापारी पेढीचें असें मत आहे कीं, व्यापाराला जपानेनें आपल्यास मोकळीक करून घेतली असल्यास त्यापासून इतर देशांतील व्यापाऱ्यांनांही नफाच होईल एकंदरींत सगळे देश आजला चीन देशास खाण्यास बसले आहेत असें दिसतें. फ्रेंच वर्तमान पत्रांनीं आपलें मत असें प्रसिद्ध केलें आहे कीं, चीनला एकटा जपानच खाण्यास मागेल तर तसें करूं देऊं नये.

अफगाणिस्थान किंवा कदाचित तिबेटाचा सुद्धां ताबा रशिया, थोड्याच दिवसांत, फ्रेंचांच्या मदतीनें घेईल असा एक लेख, माहीत नांवाच्या फ्रेंच पत्रांत डेलानकल नांवाच्या एका मोठ्या फ्रेंच गृहस्थानें लिहिला आहे; त्याच लेखांत तो गृहस्थ ह्मणतो कीं, हिंदुस्थानचे लोक आपल्या स्वातंत्र्याकडे वळत चालले आहेत; आणि लौकरच तेथून इंग्रजांना आपलें चंबूगबाळें आटोपावें लागेल. सदहू फ्रेंच गृहस्थ इंग्रजांचे विरुद्ध नेहमीं असतात.

सयामांत कवड्या व जपानांत लोंखडाचे तुकडे, नाण्याच्या बद्दल वापरण्यांत येतात.

कोरियांतील ज्या भागाचा कबजा जपानेनें घेतला आहे, तेवढ्यांत विजेची रेलवे करण्याची वगैरे बरीच व्यवस्था चालू आहे.

चीनमध्यें तार पाठविण्याची एक मोठी सोय करण्यांत आली आहे. शद्बाला आंकड्यांची संज्ञा देऊन, आंकड्यानें तारा पाठविल्यास शद्बांचा भरणा कमी होऊन, बातमी पुष्कळ गुप्त राहते. परंतु ही सोय फक्त सरकारी तारां पुरतीच झाली आहे.

जपानांत, चोरांना पकडण्यासाठीं, कमेट्या नेमण्यांत येतात. व त्यांच्या मताप्रमाणें चोर पकडण्याचें काम चालत असतें.

कागदाच्या पाण्याच्या नळ्या करण्या बद्दल अमेरिकेंत बरीच खटपट होऊन, त्यांत त्यांना यश मिळालें आहे. स. वि.

निर्लज्ज शर्यत— जुन्नर येथील दोघा बायांनीं नागव्यानें पळण्याची शर्यत लावून त्या प्रमाणें वस्त्ररहित होऊन धूम ठोकिली. तों इतक्यांत एकीचा नवरा समोरून आला आणि त्यानें आपल्या बायकोचें शौर्य डोळेभर अवलोकन केलें आणि त्यानें तिची निर्भत्सना करून तिला घराबाहेर हाकून दिलें.

हजार एकर इनाम— मि. डोसाभाई फ्रामजी यांस ठाणे जिल्ह्यांतील मुकुंद गांवची एक हजार एकर खारी जमीन सरकारानें इनाम दिली.

लोखंडी नाणीं— जपानमध्यें लोखंडी नाणीं आहेत. योजना चांगली नाहीं. कारण लोखंड हा धातु मृत्तिकारूप होणारी आहे.

हल्लीं ६ मासे पर्यंत वजनाचीं पत्रें ८॥ आण्याच्या दरानें जातात, तीं १ तोळ्यापर्यंत जावींत, असें करण्याचें सरकारच्या मनांत आहे.

उत्तर अमेरिकेंतल्या एका फुलझाडाला फूल येतें त्यावर माशी बसली कीं, तें कळी सारखें मिटतें व कांहीं वेळानें पुन्हां उगवतें माशी खाणारें हें झाड असेल तर याचें तोंड ह्मणजे फूल असें ठरलें. वनस्पति शास्त्रांत याचा वर्ग कोणता ?

नेपोलियनचें युद्धसत्र— नेपोलियनच्या युद्धसत्रांत १०,००,००० सधवा स्त्रिया विधवा झाल्या आणि तीस लाख पोरें बाप नाहीं अशी पोरकीं झालीं. व्या०

चिनांत प्रत्येक धंद्याचा एक एक देव मानिला आहे.

नारिंग उत्पन्न होत नाहींत असें खेड नाहीं.

जमावर दरसाल सरासरीनें- २२०० तारवें, जहाजें, चागबोटी वगैरे मिळून नष्ट होतात.

चिनांत रीतीभातीचें विद्यापीठ आहे. या विद्यापठाचे सभासद सगळ्या चीन साम्राज्याला रीतीभाती शिकवीत असतास.

चीनांत तुरुंगावरील अधिकाऱ्यांस सरकारांतून पगार नाहीं; तुरुंगांतील कैदी व त्या कैद्यांच्या मंडळींनीं मिळून त्या अधिकाऱ्यांचे कुटुंब पोषण करावयाचें.

चिली व ब्यूएनोस एरिस् या दोन देशांत घोडे इतके मबलग आहेत की, भिक्षा मागत दारोदार हिंडणारे भिकारीसुद्धां घोड्यांवर बसून हिंडत असतात. भिक्षा मात्र पुष्कळ मागावी लागत असेल, कारण आपलें व घोड्याचें दोघांचीं पोटें भरलीं पाहिजेत.

आस्त्रिआंत स्टोर्नेस नांवाचें खेडें आहे. तेथील लहानमोठ्या सर्व राहिवाशास बुद्धिबळें खेळतां येतात. शाळेंत ज्याप्रमाणें लिहिणें वाचणें त्याचप्रमाणें बुद्धिबळें खेळणेंही शिकविलें जातें. अवश्य शिकलेंच पाहिजे अशा विषयांपैकीं तो एक विषय आहे!

आस्त्रियांतील पोलिसास पोहायला येणें होडी हालवितां येणें. व तारायंत्राची पूर्ण माहिती असणें अगदीं अवश्य आहे.

चिचुंद्री आपलें बीळ नेहमीं जमिनींत करतें, परंतु त्याला निदान पांच किंवा सहा आंत बाहेर जातां येण्याची द्वारें ठेवितें. तीं द्वारें तिला संकट समयीं फार उपयोगीं पडतात.

आफ्रिकेंत अद्यापि गुलामांचा व्यापार सुरूं आहे. आणि तो इतक्या जारोनें कीं, गेल्या वर्षीं टिंबकटू शहरांतून ४००० गुलाम मोरोको शहरास पाठविण्यांत आले !

मुंग्या फारच उद्योग निमग्न दिसल्या ह्मणजे पावसाळा फार थोड्या दिवसांनीं सुरू होणार ह्मणून समजावें.

मुल निदान एक वर्षाचे होईपर्यंत त्यास मुळींच नहाण्यास घालूं नये अशी मिसर देशांतील लोकांची समजूत आहे.

चीनांत, भर सभेंत किंवा एखाद्या समाजांत रागावणें हा एक मोठा गुन्हा धरला जातो. त्या गुन्ह्याला पांच दिवसांची शिक्षा आहे. आमचेकडे असा कायदा सुरू केल्यास सर्व सभा बंद ठेवण्याची पाळी येईल.

स्पेन देशांत बोलाटा नांवाचा एक वृक्ष सांपडला आहे, त्याचा चीक अगदीं रबरा प्रमाणें उपयोगांत आणतां येतो. रबर हल्लीं नष्ट होत चालला आहे, तेव्हां हा शोध फारच उपयोगाचा आहे. करमणू.

हैद्राबादेंतील सालरजंगांच्या इस्टेटीबद्दल आपसांत भांडणें लागलीं आहेत. सालरजंगाचे अल्पवयी वारस पुत्र त्यांचे खरे पुत्रच नव्हत, इस्टेटीची मालकीण मी आहे, असा सालरजंगांच्या मुलीनें दावा चालविला आहे. निझाम साहेबांनीं तो सर्व दावा रद्द करून टाकला; तरी पण रेसिडेंटांपुढें व जरूर पडल्यास स्टेट सेक्रेटरीपुढें हें प्रकर्ण नेण्याचा बेत असून मि० ग्रिव्ज ह्मणून एक साहेब मुद्दाम विलायतेस रवाना करण्यात आले आहेत असें समजतें. तर्तूं दलालांची पंढरी पिकली आहे एवढें खरें ! !

स० शो०

लवकरच निजामच्या राज्यांत तीन चार सोन्याच्या खाणी चालविणाऱ्या कंपन्यांचीं कामें सुरू होऊन मजुरांच्या उद्योगाला तेजी येईल.

साठ हजार रुपयांची गाडी—लांब लांबच्या प्रवासासाठीं कित्येक वेडे लोकांच्या सोईस्तव फ्रान्स देशांत एक थोरली गाडी नवीन तऱ्हेची एका मेस्तरीनें घडली आहे. तिची किंमत साठ हजार रुपये आहे. ह्या गाडींत रेलवेच्या गाडी प्रमाणें खाण्यापिण्याची व निजण्याची सर्व सोयी केली आहे. गाडीला चार घोडे जुंपावे लागतात. ह्या गाडींत बसलें ह्मणजे घरांतच आपण आहों असें वाटतें, व त्यामुळें अती लांबचा प्रवास करण्याचा कंटाळा वाटत नाहीं. मुक्काम वगैरे सर्व गाडींतच. घोड्यांस व घोडेवाल्यांस विसावा देण्यास्तव मात्र रात्रीं चांगलेंसे स्थान पाहून थांबावें लागतें, व असें उपास पतकरंत नसेल त्याणे घोडे बदलण्याचा विशेष खर्च करावा ह्मणजे रात्रंदिवस एकसारखा प्रवास करण्यास हरकत पडत नाहीं. दी. बं

मोठा वटवृक्ष— सहाराणपूर ( पंजाब ) जिल्ह्यांत एक मोठा वटवृक्ष आहे. त्याच्या १२७ पारंब्या भुईंत शिरून त्यांचे उपवृक्ष बनले आहेत आणि त्या वडाच्या एकंदर झाडांचा मिळून २६२ हात घेर आहे असें इंडियन फारेस्टरी नामक पत्रावरून समजतें.

गेल्या कांग्रेसचा जमाखर्च— गेल्या मद्रासच्या कांग्रेसकरितां ह्मणून ६०००० रुपये वर्गणी गोळा झाली. पैकीं कांग्रेससाठीं ३०००० रुपये खर्च होऊन ३०००० रुपये शिल्लक आहेत. कांग्रेस भरविण्याचें एकादें मध्यें ठिकाण ठरविलें गेलें असतें तर हा पैसा कायमची इमारत बांधण्यासाठीं उपयोगी पडला असता.

ब्रह्मदेशांत वसाहत—ब्रह्मदेशांत जे गुरखा लोक मिलिटरी पोलिस आहेत त्यांच्या आसांनीं वसाहत करण्यासाठीं आपल्यास जमिनी द्याव्या असे अर्ज केले आहेत असें समजतें. ब्रह्म देशाचा विस्तार एवढा मोठा आहे, व त्यांत वस्ती इतकी पातळ आहे कीं त्या देशांत पुष्कळ वसाहत करण्यासाठीं सरकारांत विचार चालू आहे. ह्या देशांत निदान ८ कोट नव्या लोकांची वसाहत होण्या पुरती जागा आहे.

मंडाले येथील जनरल पोस्ट आफिसास आग लागून तें जळून खांक झालें.

पत्ते खेळणारा शोकी— पत्ते खेळणारे आंकट शोकी आमच्या इकडे पुष्कळ आहेत. पण आह्मी जें उदाहरण पुढें देणार आहों तसा निस्सीम शोकी इकडे एक तरी सांपडेल काय ! अमियन्स येथें पत्ते खेळणारा एक निस्सीम शोकी नुकतांच वारला. त्यानें करून ठेविलेल्या मृत्युपत्रांत असें लिहिलें होतें. "ज्या पेटींत घालून आपल्यास पुरावयाचें तींत पत्याचे कांहीं डाव ठेवावे. उत्तम पत्ते खेळणाऱ्या चौघा गृहस्थांनीं ती पेटी वाहून स्मशानांत न्यावी. ह्या पत्ते खेळणाराची पत्ते खेळण्याची जी नेहमींची जागा आहे तेथें प्रेत गेल्यावर तिरडी खालीं उतरून त्यांनीं कांहीं डाव खेळावे" वगैरे ह्या शोकी गृहस्थानें कित्येक वर्षे पत्ते खेळण्याशिवाय दुसरें कामच केलें नव्हतें. शु० सू०

मक्कास महामारीचा वाखा फार झपाट्यानें सुरू असून बहुत लोक मरत आहेत. तिकडे लेलेले यात्रिक या महामारीच्या सपाट्यांत त्याचा पटारा उडत आहे. ज्ञा० चं०

---

## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शद्ब मराठींत व इंग्रजींत ( उच्चारासह ) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ८१०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळ्या, कडीं, लखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठीतील अशक्तपणा, निद्रा न लागणें, मुत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गलकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळें निर्विघ्नपणानें निघतात लखणी— हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी लवकर चुकविणाऱ्या वस्तुंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्यावद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूंची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केवर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचें, व एजंट व्यापारी दराचें पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक मालाबरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असुन आम्ही पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर (चुका, स्क्रू वगैरे) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आम्ही पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां तिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

नोटीस.

ज्यानकी मर्द पंढरी राहणार कोऱ्हाळी तालुके खामगाव इजला नोटीस देणार राघोजी वलद नारायण पाटील राहणार कोऱ्हाळी तालुके खामगांव नोटीशीनें असें कळवितों कीं, माझा भाऊ नामें पंढरी हा मयत होऊन तुजवर व आह्मावर दैवानें उन्हाळा केला. यावद्दल कोणाचा इलाज नाहीं. तु काहीं काळजी करूं नयेस. आमच्या घराच्या रीतीप्रमाणें देवानें अन्नवस्त्र दिलें आहे तर घराची व पंढरीची इज्जत राखून मरेपर्यंत आनंदानें असावेंस तू लोकांच्या चिथवण्या वरून स्थावर जंगम इस्टेट कोणास खरेदी, गहाण, तारण वगैरे देऊन रुपये काढू नयेत, कारण तुजला अन्नवस्त्रा शिवाय बाकी बाकी कोणताही धंदा करण्याचा अधिकार नाहीं. हे तुजला अगोदर कळवित आहों. तर तूं कोणतीही भानगड न करितां आनंदानें घरांत असावेस हें तुजला कळावें. ह्मणून लिहून नोटीस सही तारीख २३-४-९५ इ०

सही सहीची निशाणी वरूवर राघोजी वलद नारायणजी पाटील कोऱ्हाळी कर यांच्या हातची असे

नमुना (जी)

नादारी मुकदमा नंबर ८ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज जिल्हे अकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येते कीं तपाली वलद सिवराम सुतार राहाणार अकोला हा नादारी आहे असा आज तारीख १३ मांह ४ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २९ माहे ६ सन १८९५ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जीचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्यावद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं, ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. १८।४।९५ इ०

B. B. Sule.
Judge
Bankruptcy Court
AkolaDistrict.

नमुना (जी)

नादारी मुकदमा नंबर १० सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज जिल्हे अकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येते कीं पितांबर वलद बाळाजी रहाणार शेगांव हा नादारी आहे असा आज तारीख ६ माहे ४ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २९ माहे ६ सन १८९५ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमुन देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जीचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधानें ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्यावद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटिशींत ज्या आधारावरून तकार सांगणें असेल ते व त्यावद्दल ज्या साक्षास समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचें स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपरी सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. ता० १८।४।९५ इ०

B. B. Sule
Judge
B. Court
Akola District.

नोटीस.

मनुशा वलद अनेशा फकीर राहणार नरूड तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा यास नोटीस देणार ज्यानबी मर्द मनुशा राहणार खंडाळे तालुके चिखली जि० बुलडाणा इजकडुन नोटीशीनें असें कळवितें कीं, तूं मजबरोबर मोहतुर लाविल्यास त्यावेळेपासुन आज पावेतों चार वेळां तुज पाशीं मी येऊन राहिलें. तुह्मी मजशी चांगले रीतीनें वागवित नाहीं. माझे पोटपाण्या बद्दल कांहींएक तजवीज तुह्मी करीत नाहीं. मझा सर्व जन्म व्यर्थ जात आहे. मी पांच सात वेळां तुह्मास कळविलें व सांगितलें कीं माझे पोटापाण्याची तजवीज ठेवावी. व मजला चांगले वागवावें. नाहीं तर मजला सोडचिठ्ठी द्यावी. वगैरे. परंतु तुह्मी कोणत्याही प्रकारानें मजबद्दल कांहीं इलाकी तजवीज तुह्मी करीत नाहीं. मजला आतां कोणी कर्जही देत नाहीं. मी उपाशी मरत आहे याजकरितां तुह्मास मी नाइलाज होऊन ही नोटीस देत आहे. तर नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसांचे आत तुह्मी मजला इतके दिवसाचे खावटीचे रुपये ३५० देऊन मजला चांगल्या रीतीनें वागवून रीती प्रमाणें संसार करावा. व माझे जीवाभावास कोणत्याही प्रकारानें दगा होऊं नये. अशाबद्दल चार जातभाई पंचाची खात्री करून देऊन मजला घेऊन जावें. असें झालें नाहीं तर मी सर्व प्रकारानें नाइलाज होऊन दुसरा घरठाव करीन मग तुमचा मजवर कोणतेही प्रकारचा नवरेपणाचा कांहीं इतका हक्क राहिला नाहीं. मी हे आपल्यास उघड उघड ह्या नोटीशीनें कळविलें आहे. तर कायदेशीर निकाल सरील मुदतींत करून माझा रस्ता मोकळा करावा. कळावें. ह्मणून लिहीली नोटीस सही तारीख २२।४।९५ इ.

[सही]

सहीची निशाणी बांगडी. ज्यानबी मर्द मनुशा हीच्या हातची असे.